ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी,
कृतिशीलता जोपासणारे मासिक !

छात्र प्रबोधन

सौर ज्येष्ठ, शके १९३४
वर्ष १२ अंक ९
मूल्य रुपये वीस

अनुवाद विशेषांक

साहित्यपंढरीचे वारकरी

(ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त मराठी साहित्यिक)

ज्ञानपीठ पुरस्कार – १९७४	ज्ञानपीठ पुरस्कार – १९८७	ज्ञानपीठ पुरस्कार – २००३
		
ज्येष्ठ कादंबरीकार कै. वि. स. खांडेकर (जन्म १८९८, मृत्यू १९७६)	ज्येष्ठ नाटककार, कवी कै. वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) (जन्म १९१२, मृत्यू १९९९)	ज्येष्ठ कवी कै. गो. वि. (विंदा) करंदीकर (जन्म १९१८, मृत्यू २०१०)

(ज्ञानपीठ पुरस्कारांच्या अधिक माहितीसाठी पान क्र. ३९ पाहा.)

ओळखा बरं या भाषा!!

१) छात्र प्रबोधन

२) Chhatra Prabodhan

३) ಛಾತ್ರ ಪ್ರಬೋಧನ

४) ఛాత్ర ప్రబోధన

५) છાત્ર પ્રબોધન

६) ਛਾਤ੍ਰ ਪ੍ਰਬੋਧਨ

७) ছাত্র প্রবোধন

८) چھاترا پرابودھن

(वरील चौकोनात 'छात्र प्रबोधन' वेगवेगळ्या लिपींमध्ये लिहिलेले आहे. तुम्ही त्या लिपी ओळखू शकाल का?)

(१.देवनागरी २.इंग्रजी ३.कन्नड ४.तेलगु ५.गुजराती ६.पंजाबी ७.बंगाली ८.उर्दू)

मराठी झेंडा एव्हरेस्टवर!

पुण्याच्या गिरिप्रेमी संस्थेच्या एव्हरेस्ट मोहीमवीरांचे 'छात्र प्रबोधन'तर्फे मन:पूर्वक अभिनंदन !

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

छात्र प्रबोधन
सौर ज्येष्ठ, शके १९३४। वर्ष १२ अंक ९
(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४ (जुलै - ऑगस्ट १९९२) २३९ वा अंक, वर्ष २० अंक ११
प्रकाशन दिनांक - ११ ज्येष्ठ, शके १९३४/१ जून २०१२

अनुक्रमणिका

अनुवाद विशेषांक

२.	**संवाद**	- महेन्द्र सेठिया
३.	कथा... **पारंपर्य** (बंगाली)	- डॉ. सुरुचि पांडे
५.	कथा... **सौदा** (हिंदी)	- नीलिमा करमरकर
१०.	कविता... **बालदिन** (हिंदी)	- डॉ. अलका पोतदार
११.	कथा... **भोला** (उर्दू)	- माधव शाळिग्राम
१६.	**शब्दकोडे**	- मीनाक्षी केतकर
१७.	कथा... **नापास नाही, पासच !** (गुजराथी)	- अंजनी नरवणे
२१.	ललित... **स्वत:चे पुस्तक** (तेलुगु)	- डॉ. तुलसी भारत
२५.	लघुकथा ... **खुशालीचे पत्र** (गुजराथी)	- केतकी जानी
२७.	माहितीपर... **भाषांतर व अनुवाद क्षेत्रातील संधी**	- अमित धर्म
३०.	ललित... **संवादाची सर्कस**	- श्रीनिवास शारंगपाणी
३३.	कथा...**सुवर्णगुण संपन्न मोलकरणीचे रहस्य**(इंग्रजी)	- डॉ. धनवंती हर्डीकर
३८.	कविता... **छोट्या निग्रो मुलाची प्रार्थना** (फ्रेंच)	- माधुरी पुरंदरे
४०.	कविता... **उडणं** (इटालियन)	- मेघना पळशीकर
४१.	कथा... **मोटरसायकलवरच्या चित्तथरारक कसरती** (रशियन)	- अनघा भट-बेहेरे
४४.	चित्रपट परिचय... **Where Is My Friend's Home?** (इराणी)	- शैलजा देशमुख

पद्य... स्वदेश विदेश मूळ बंगाली (मलपृष्ठाच्या आतील पानावर)-स्वामी अभेदानन्द

याशिवाय... मैत्री भाषेशी (९, ४७),
ही अनुवादीत पुस्तके जरूर वाचा (२०), अनुवादातील गमतीजमती (२४),
साहित्य अकादमी परिचय, नेतृत्व संवर्धन शिबिर (२६),
मुखपृष्ठ चित्रकार परिचय, 'क्लिक'करण्यापूर्वी ,
स्वेदश विदेश बंगाली पद्याचा अनुवाद (४८)

* समर्थ रामदासांच्या 'मुलांना शिकवण' मधील मराठी श्लोक आणि त्याची श्री. भि. वेलणकर यांनी केलेली संस्कृत समश्लोकी तसेच काही प्रसिद्ध संस्कृत श्लोक आणि त्याची मराठी समश्लोकीही देत आहोत.
* प्रायोजक ओळींमध्ये साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त काही मान्यवर साहित्यिक आणि त्यांच्या पुस्तकांचा परिचय देत आहोत. ही पुस्तके मिळवून तुम्ही जरूर वाचावीत.

संपादक, प्रकाशक, मुद्रक
महेन्द्र सेठिया

कार्यकारी संपादक
जयश्री काटीकर

संपादक मंडळ
शैलजा देशमुख, नीलिमा करमरकर
डॉ. कांचनगंगा गंधे, आश्लेषा महाजन

मुखपृष्ठ - ऋजुता घाटे

मलपृष्ठ प्रकाशचित्र - अमृता

आतील चित्रे
गिरीश सहस्रबुद्धे, ओंकार इनामदार,
कुडल हिरेमठ, अभय पुरंदरे, ऋजुता घाटे

या अंकाची किंमत : ₹ २०
पुण्याबाहेरील धनादेशासाठी -
₹ २० जादा,
घरपोच दिवाळी अंकासाठी -
प्रतिवर्षी ₹ ४० जादा

वार्षिक वर्गणी : ₹ १८०
द्वैवार्षिक : ₹ ३४०
त्रैवार्षिक : ₹ ५००
दशवार्षिक : ₹ १,५००

मुखपृष्ठाविषयी - भारताच्या उत्तरेकडील बिहार राज्यातील मधुबनी आणि मिथिला या चित्रशैलीतील हे मुखपृष्ठ आहे. पिवळ्या रंगाच्या पातळ हॅण्डमेड पेपरवर शाई, जलरंग आणि स्केचपेन्स वापरून हे चित्र काढले आहे. यात एक मुलगा पावा वाजवतो आहे. बाजूला गाई बसल्या आहेत. हा मुलगा म्हणजे अलीकडच्या काळातील ग्रामीण जीवनातला निसर्गाशी समरस झालेला कृष्णच आहे.
- ऋजुता घाटे

संपर्क पत्ता - छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे 411030 ☎ (०२०) २४२०७ १७४/१७९
संकेतस्थळ - www.chhatraprabodhan.org **ई-मेल** -chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतील असे नाही.

छात्र प्रबोधन : निव्वळ मासिक नव्हे !... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ !!

संवाद

प्रिय बहुभाषाप्रिय, संकल्पवीर प्रबोधकांनो,

अनेक भाषांमधलं निवडक साहित्य अनुवादित स्वरूपात तुमच्यापर्यंत पोहोचवणारा हा ***अनुवाद विशेषांक!*** *तुमच्या मनातलं विविध भाषांबद्दलचं प्रेम, आपुलकी, आदर वाढवायला हा अंक तुम्हाला निश्चितच मदत करेल, असा विश्वास वाटतो.*

या अनुवाद विशेषांकात संस्कृत, बंगाली, हिंदी, उर्दू, गुजराथी आणि तेलुगु या भारतीय भाषा आणि इंग्रजी, फ्रेंच, इटालियन, रशियन, इराणी आणि चिनी या विदेशी भाषांमधील कथा, कविता, ललित लेख, अनुभव, चित्रपट परिचय, पुस्तक सूचि, सुभाषिते इ. साहित्य मराठीत अनुवाद करून दिले आहेत. तुम्हाला ते नक्कीच आवडतील.

आपले अनुभव, आपले विचार प्रभावीपणे इतरांपर्यंत पोहोचवण्याचे भाषा हे एक अत्यंत प्रभावी माध्यम आहे. आपले रंजनविश्व, विचारविश्व अन् प्रेरणाविश्व अधिकाधिक समृद्ध होण्यासाठी आपल्या मातृभाषेतलं विविधांगी साहित्य तर आपण वाचलं पाहिजेच; पण त्याचबरोबर आपल्या देशातील विविध प्रादेशिक भाषांमधलं साहित्यही आपण वाचायला हवं. त्या त्या प्रदेशाशी जवळीक, आत्मियता वाढवायला असं साहित्य निश्चितच उपयोगी पडेल. प्रथम अनुवादित साहित्य वाचायला प्रारंभ करा अन् मग टप्प्याटप्प्याने त्यातल्या १-२-३ भाषा शिकून घेत त्या भाषेतलं मूळ साहित्यही वाचायचा प्रयत्न करा. निव्वळ 'करिअर'साठी वा पैसे मिळविण्यासाठी उपयोगी पडेल इतक्या मर्यादित हेतूंसाठी भाषा शिकू नयेत तर त्या भाषेतलं मूळ साहित्य वाचून तेथील संस्कृती, विचारधारा, माणसं समजून घेता यावीत, त्यांच्याशी जवळचं नातं निर्माण करता यावं यासाठी विविध भाषा आवर्जून शिकायला हव्यात असं मला वाटतं. यापुढे मीही यासाठी विशेष प्रयत्न करायचं ठरवलंय, तुम्हीही करणार ना सुरुवात? हे जसं भारतीय भाषांबाबत करायचं तसं विदेशी भाषांबाबतही करायचं.

येत्या शैक्षणिक वर्षात तुमच्या भाषा प्रकल्पांमध्ये विविध भाषांमधील अनुवादित साहित्याचा अन् साहित्यिकांचा अभ्यास तुम्ही नक्कीच करू शकाल. त्यासाठी तुमच्या आसपासच्या अन्य प्रांतातील/अन्य देशांतील व्यक्तींशी स्वत:हून जाऊन दोस्ती करा. त्यांची मातृभाषा शिकण्याचा प्रयत्न करा. त्यांच्या मातृभाषेतील लेखकांचा व त्यांच्या कथा, कवितांचा परिचय करून घ्या. यासाठी तुम्हाला काही मदत लागली तर 'छात्र प्रबोधन'शी जरूर संपर्क करा.

६ जूनला ***शुक्राचे अधिक्रमण*** *होणार आहे. म्हणजे काय? आणि त्याचे काय महत्त्व आहे? हे समजून घेण्यासाठी 'राष्ट्रीय रेडिओ खगोल भौतिकी केंद्रा'च्या (NCRA-TIFR) साहाय्याने ८ पानांची पुरवणी या अंकात देत आहोत. ती वाचून ६ जूनची ही विशेष खगोलीय घटना पाहायला विसरू नका. 'छात्र प्रबोधन'च्या धडपड्या वाचकांपर्यंत ही पुरवणी पोहोचवल्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार.*

हा संवाद लिहित असतानाच अत्यंत आनंदाची बातमी समजली. ***''मराठी झेंडा एव्हरेस्टवर!''*** *पुण्याच्या* ***गिरिप्रेमी*** *संस्थेच्या ८ गिर्यारोहाकांनी श्री. उमेश झिरपे यांच्या नेतृत्वाखाली गेले वर्षभर मोठ्या मेहनतीने, जिद्दीने, संघभावनेने अन् योजनाबद्धरीतीने राबवलेली व खऱ्या अर्थाने नागरी असलेली ही एव्हरेस्ट मोहीम यशस्वीरित्या पूर्ण केली. त्याबद्दल त्या* ***सर्व संघाचे 'छात्र प्रबोधन'तर्फे मन:पूर्वक अभिनंदन!*** *त्याचबरोबर 'सागरमाथा' संस्थेच्याही ४ गिर्यारोहकांनी एव्हरेस्ट मोहीम यशस्वी केल्याबद्दल त्यांचेही अभिनंदन!*

नवीन शैक्षणिक वर्षात कोणकोणते संकल्प करणार? विविध बाबतीत अधिकाधिक स्वावलंबी होण्याचे... उत्तमतेच्या दिशेने ठरवून वाटचाल करण्याचे... स्वत:च्या क्षमता ताणण्यासाठी प्रयत्न करण्याचे... काही नवीन गोष्टी/कौशल्य शिकण्याचे... स्वभावामध्ये विधायक बदल घडविण्याचे... विविध पद्धतीने इतरांच्या उपयोगी पडण्याचे... रोजचं वागणं अधिकाधिक प्रमाणात पर्यावरणाला पूरक/पोषक बनविण्याचे... शारीरिक तंदुरुस्ती अन् सामर्थ्य वाढविण्याचे... यांपैकी/यासारखे ३-४ संकल्प करा. ते मोजता येतील किंवा त्याचे परिणाम जाणवतील अशा भाषेत ते मांडा अन् वर्षभर ते पूर्ण करण्यासाठी मनापासून प्रयत्न करा. त्यातून होणारे शिक्षण तुम्हाला खऱ्याअर्थाने मोठं व्हायला मदत करेल. त्यासाठी भरभरून शुभेच्छा!

सस्नेह तुमचा,

(महेन्द्र सेठिया)

। अभिमानास्पद - ज्येष्ठ कादंबरीकार कै. रणजित देसाई (१९६४) - 'स्वामी'
(कर्तबगार माधवराव पेशवे यांच्या जीवनावरील ऐतिहासिक कादंबरी)।
प्रायोजक – शंतनू पटवर्धन, टेक्सास अमेरिका

बंगाली

पारंपर्य

मूळ लेखक : मणिलाल गंगोपाध्याय, स्वैर अनुवाद : डॉ. सुरुचि पांडे

श्यामचांदबाबू मोठे हिकमती, कामसू. घरातल्या कर्त्याची भूमिका खूप वर्ष त्यांनी सांभाळलेली. त्यांना काम अगदी बरोबर, अचूक लागायचं. पण आता त्यांचं वय झालं होतं. घरातल्या माणसांची कामानिमित्त पांगापांग झाली होती. ते एकटेच राहिले होते. त्यामुळे त्यांना एका स्वयंपाकी माणसाची गरज होती. पण त्यांना पसंत पडेल असा स्वयंपाकी आणि थोडीफार मदत करणारा माणूस मिळायला जरा वेळ लागत होता. त्यांना कसा माणूस हवा होता माहित्ये? जो स्वत: समजून उमजून काम करेल; स्वत: श्यामचांदबाबूंना त्याच्या मागे लागावं लागणार नाही. बऱ्याच दिवसांच्या शोधाशोधीनंतर चटपटीत स्वभावाचा, कामाचा उरक असणारा एक स्वयंपाकी त्यांना मिळाला. त्यानं स्वत:ची माहिती देताना सांगितलं की 'एका नबाब बाबूंच्या घरी त्याच्या 'खानसामेगिरी'च्या शिक्षणाला प्रारंभ झाला. मग त्यानं चोरकाँटा येथल्या जमीनदारांच्या घरी काम केलं. त्यानंतर घूघूचरच्या महाराजांच्या महालात काम केलं. या सर्वांकडे काम केल्यामुळे त्याचा हात कामासाठी चांगलाच तयार झाला आहे. अगदी जोडे शिवण्यापासून चंडीपाठ करण्यापर्यंत कोणतीही कामं करण्यात तो स्वत: अगदी वाकबगार झालेला आहे.'

खानसाम्याचा हा 'स्व-परिचय' ऐकून श्यामचांदबाबू भलतेच खूश झाले. ते म्हणाले, ''वा, वा! तूच आता इथं राहा हो! माझं सगळं काम सांभाळ.''

श्यामचांदबाबूंनी त्याला आपल्यासाठी कुठली कुठली कामं करावी लागतील हे सांगितलं. त्यावेळी त्याला विचारलं,

''तुला कामाचं स्वरूप तर सांगून दिलं. पण तुला कामाचं पारंपर्य ठाऊक आहे का?''

खानसामा डोकं खाजवत म्हणाला, ''नाही बुवा, हे काय ते मला ठाऊक नाही.''

श्यामचांदबाबू म्हणाले, ''पारंपर्य म्हणजे आता बघ एक उदाहरण सांगतो. मी जेव्हा तुला तेल आणायला सांगेन, त्याच वेळी तुला कळायला पाहिजे की आता यानंतर स्नानाचं पाणी काढायला हवं, त्यानंतर भात शिजायला लावायला हवा; त्यानंतर तंबाखूची तयारी करून ठेवायला हवी, त्यानंतर माझ्या झोपण्याच्या तयारीसाठी अंथरुण तयार करून ठेवायला हवं.

बरें सत्य बोला यथातथ्य चाला । बहू मानिती लोक तेणें तुम्हांला ॥
धरा बुद्धि पोटीं विवेकी मुलें हो । बरा गूण तो अंतरामाजि राहो ॥१॥ (मराठी)

प्रायोजक – डॉ. मुकुंद करंबेळकर, चाळीसगाव

बघ, एका आदेशावरून तुला पुढची पुढची कामं कळत जायला हवीत. यालाच म्हणतात कामाचं पारंपर्य. कळलं ना?''

खानसाम्यानं हात जोडून म्हटलं, ''होय, कळलं मला.''

श्यामचांदबाबू म्हणाले, ''हे पाहा, इथं जर नोकरी टिकवायची असेल तर हे पारंपर्य कळायलाच हवं बरं!'' खानसाम्यानं मान डोलावली.

नेमकं अगदी खानसाम्याच्या नोकरीच्या पहिल्याच दिवशी रात्रीच्या वेळी श्यामचांदबाबूंचं डोकं जरा दुखायला लागलं. आपलं डोकं जरा चेपून द्यायला म्हणून त्यांनी या नव्या खानसाम्याला बोलावलं. दोन मिनिटं गेली; दहा मिनिटं गेली; अर्धा तास सरला; एक तास आटोपला. खानसाम्याचा जाम पत्ताच नव्हता. श्यामचांदबाबू भलतेच रागावले. फणफण करत त्यांना डुलकी लागली. रात्र सरत आली तेव्हा हा खानसामा दरवाजा ढकलून खसफस करत त्यांच्या - जवळ आला. श्यामचांदबाबूंना जाग आली. ते खेकसले, ''काय रे?''

''मी आलो आहे, मालक.''

बाबू रागावून म्हणाले, ''आता यायला तुला फुरसत सापडली काय? पाजी कुठला!''

''रागावू नका मालक. कामाचं पारंपर्य तर पूर्ण करत बसलो होतो ना, म्हणून उशीर झाला.''

''काय रे, एवढा वेळ कुठलं पारंपर्य सांभाळत बसला होतास?''

खानसामा सारं स्पष्ट करू लागला, ''मालक, तुम्ही निरोप पाठवलात ना की, तुमचं डोकं दुखतं आहे, तेव्हाच मला अंदाज आला की मग डॉक्टरांना बोलावून आणावं लागेल. गेलो तडक डॉक्टरांच्या घरी. डॉक्टरांना बोलावलं की नंतर तुम्हाला औषध द्यावं लागेल, या विचारानं मी थेट सुटलो औषधांच्या दुकानाकडे. तिथल्या दुकानदाराला सांगितलं की लवकर दुकान बंद करू नकोस बाबा, म्हणून. औषध घेऊनही समजा तुम्हाला बरं वाटलं नाही तर काय; कदाचित् तुम्हाला मृत्युपत्र करावंसं वाटेल. त्यासाठी मी घाईने गेलो वकीलबाबूंकडे. मग स्मशानाची व्यवस्था नको का बघायला? तिरडी बांधायला हवी, त्यासाठी बांबू आणायला हवेत, लोकांना बोलावून घ्यायला हवं! त्यानंतर श्राद्ध नको का? त्यासाठी पुरोहितांना सांगायला हवं, वस्तूंची जुळवाजुळवी करायला हवी. एवढं सारं सारं एका रात्रीत मी करून टाकलं बघा! पाहा ना, तुमच्या दिवाणखान्यात लोक जमले आहेत. तुमचं काही देणं-बिणं शिल्लक असेल तर द्या पैसे. आपण तेही मिटवून टाकूया. मग मला पुन्हा काही निमंत्रणं द्यायला जायला लागेल.''

हे सारं पुराण ऐकून, खानसाम्याचा उरक पाहून श्यामचांदबाबूंची बोलतीच बंद झाली. मग ते गंभीर होऊन म्हणाले, ''बाबा, पारंपर्य तर अजून पूर्ण कुठे झालंय्?''

आता खानसामा अवाक् होऊन म्हणाला, ''पूर्ण झालं नाही? आता तर कुठलंच काम राहिल्याचं माझ्या डोक्यात येत नाहीये...''

''सांगतो ना तुला. बस जरा,'' श्यामचांदबाबू म्हणाले, ''मालकाचा मृत्यू झाल्यानंतर त्याचा खानसामा कुठे राहील रे?''

खानसाम्याचा चेहरा आता उतरला. श्यामचांदबाबू म्हणाले, ''असं कसं चालेल बाबा? पारंपर्य जर एवढं माझ्या मृत्यूपर्यंत ताणून धरलं आहेस तर आता ते शेवटापर्यंत नेलेलंच बर!''

''ठीक ठीक'', म्हणून खानसाम्यानं त्यांच्याकडे टक लावून पाहिलं आणि तिथून पाय काढता घेतला. आता हा पठ्ठा कुठलं पारंपर्य पूर्ण करून परत येतो आहे, या विचारानं श्यामचांदबाबू चिंतेत पडले!

– स्वैर अनु. डॉ. सुरुचि पांडे
सी/९, भोसले पार्क,
सहकारनगर क्र. २, पुणे 411009
suruchipande@gmail.com

बंगाली भाषेत मुलांसाठी जे उत्तम वाङ्मय लिहिलं गेलं, ते लिहिणाऱ्या लेखकांच्यात **मणिलाल गंगोपाध्याय** (जन्म १८८८, मृत्यू १९२९) हे एक मोठं नाव आहे. त्यांनी काही काळ 'भारती' या पत्रिकेच्या सहसंपादकपदीही काम केलं होतं. 'मने-मने', 'मोमेर फूल', 'जलछबी', 'जापानी उपकथा', 'कायाहीनेर काहिनी' आदी त्यांची पुस्तके बंगाली साहित्यात ख्यातनाम आहेत.

। साहित्य अकादमी पुरस्कार - ज्येष्ठ लेखक, नाटककार, अभिनेते कै. पु. ल. देशपांडे (१९६५)
'व्यक्ती आणि वल्ली' (व्यक्ती व्यक्तींमधले वल्लीपण अधोरेखित करणारी व्यक्तिचित्रे)।
। कै. प्रभाकर बळवंत करंदीकर स्मरणार्थ। **प्रायोजक – श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे**

हिंदी

सौदा

मूळ लेखक – सुदर्शन, स्वैर अनुवाद – नीलिमा करमरकर

परीक्षेत नापास झालेले विद्यार्थी रडतात असं दिसून येतं. पण सर्वदयाळची गोष्टच वेगळी होती! तो परीक्षेत पास झाला म्हणून रडत होता. कारण जोपर्यंत त्याचं शिक्षण सुरू होतं, तोपर्यंत त्याला कसली चिंताच नव्हती. चांगलं चुंगलं खाणंपिणं, ऐटबाज कपडे अशा झोकात तो राहात होता. त्याचे आईवडील गरीब होते. कॉलेजचा खर्च करण्याची त्यांची ऐपत नव्हती. पण त्याच्या मामांना चांगली नोकरी होती. मामांनी त्याच्या शिक्षणाचा, चार वर्षांच्या खर्चाचा भार उचलला होता. त्यांनी सर्वदयाळला बजावलं होतं, ''हे बघ! शहरात जातो आहेस. वाईट मित्रांच्या संगतीनं बहकून जाऊ नकोस. तब्येत सांभाळ. खाण्यापिण्याकडे लक्ष दे. माझ्या कानावर तुझ्याबद्दल वाईट काही आलं की लगेच तुला पैसे पाठवणं बंद करून टाकीन.''

सर्वदयाळने मामांच्या सूचनेचं पालन केलं. मामा एकटेच होते. खुश होऊन स्वत:हून जास्त पैसे देऊ लागले. सर्वदयाळचं राहणीमान आपोआपच वधारलं. अशा प्रकारे आरामशीर विद्यार्थिदशा उपभोगून बी. ए. पदवी मिळाल्यावर सर्वदयाळ आपल्या घरी वडिलांकडे आले. त्यांचे वडील शंकरदत्त जुन्या जमान्यातील होते. त्यांना वाटायचं, आपला मुलगा 'येस-फेस' इंग्रजी बोलतो, नेकटाय लावतो; त्याला चांगली नोकरी मिळायलाच हवी. पण अनेक महिने सर्वदयाळ नोकरीविना घरीच पडून होता. वडिलांनी विचारलं तर म्हणायचा,

''माझ्या लायकीची नोकरीच मिळत नाही. माझ्यासारखा पदवीधर फालतू पगाराची लहानशी नोकरी कसा करणार?''

वडील बिचारे सांगायचे, ''अरे, जी मिळेल ती नोकरी धर. चांगली मिळाल्यावर ही सोडून दे.'' असे वादात दिवस चालले होते.

एक दिवस वर्तमानपत्रातील 'वाँटेड' सदरातील एका जाहिरातीने सर्वदयाळचं लक्ष वेधून घेतलं. अंबाल्यातील 'हिंदुस्तान' मासिकाचे मालक हनुमंतराय यांनी ती जाहिरात दिली होती. त्यांना या मासिकाच्या संपादक पदासाठी एका युवकाची आवश्यकता होती. तो युवक अभ्यासू, लेखन करणारा, सामाजिक समस्यांची जाण

वरं ब्रूत सत्यं, यथातथ्यमीत, जनैः संमताः स्यात संमानिता हि ।
मतिं धारयध्वं विवेकेन बालाः ! वरं सद्गुणं धत्त चित्ते सदैव ॥१॥ (संस्कृत)

प्रायोजक – श्री. अमर परांजपे, सांगली

असणारा हवा होता. पगार पण चांगला मिळणार होता. सर्वदयाळ आनंदून गेला. त्याला आठवलं की कॉलेजात तो साहित्य मंडळाचा सेक्रेटरी होता. त्याचे लेख कॉलेजच्या मासिकात छापून येत असत. त्याच्या वक्तृत्वाची तर मित्र नेहमीच वाहवा करत. सर्वदयाळने संपादक पदासाठी वळणदार अक्षरात अर्ज लिहिला व पाठवून दिला. आता तो उत्तराची आतूरतेने वाट बघू लागला.

सर्वदयाळच्या मनात यायचं, 'मी उगाच अर्ज करण्याची घाई केली. माझ्यासारख्या अनुभव नसलेल्या सामान्य पदवीधराला कोण नोकरी देणार?' पण लगेच दुसरं मन म्हणायचं, 'मला संधी मिळाली तर मी तिचं सोनं करीन. कितीही काम करायला लागलं तरी मागेपुढे पाहणार नाही. शेवटी अंगावर जबाबदारी पडली म्हणजे माणूस सर्व काही शिकत जातो असं म्हणतात. मला अनुभव नसला तरी मी उत्तम काम करून दाखवेन.' पोस्टमनची वाट बघण्यात तीन आठवडे गेले. आता सर्वदयाळने मनातून नोकरीचे सर्व विचार झटकले. तो निराशेने अंगणात झाडाखाली बसला होता, तोच तारवाला आला. ''अंबाला येथे त्वरीत या'' असे त्या तारेत मजकूर होता.

सर्वदयाळने सायंकाळची गाडी पकडली. मनात आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. विचारांची गर्दी झाली होती. 'मी खरेच भाग्यवान आहे. कुठेतरी कारकुनी करत बसलो असतो. आता संपादकाच्या खुर्चीत मानाने बसेन.' बॅगेतून कागद पेन्सिल काढून सर्वदयाळने मासिक पत्रिकेचा आराखडा बनवायला सुरुवात केली. पहिल्या पानावर काय असेल, दुसऱ्यावर काय असेल? संपादकीय मजकूर कुठे लिहायचा? मासिकाचे मुख्य शीर्षक कुठे आणि कशाप्रकारे लिहायचे? अंकात वैचारिक लेखांबरोबर एखादी कविता पाहिजे. त्याशिवाय अंकाला शोभा नाही आणि संपादकाचे नाव कुठे छापून येईल? सर्वदयाळने वळणदार अक्षरात लिहिले,

''पंडित सर्वदयाळ बी. ए.
संपादक हिंदुस्थान, अंबाला''

हे लिहिताना एखाद्या अपराध्यासारखे त्याचे हात थरथर कापत होते. क्षणात वाटून गेलं, आपलं हे स्वप्न भंग तर पावणार नाही ना? नकारात्मक विचार झटकण्याचा निश्चय करता करता अंबाला स्टेशन आले. स्टेशनवरून सर्वदयाळ थेट मासिकाच्या कार्यालयात पोचला. हृदयात धडधडत होतं. बोलावणं आल्यावर मालक हनुमंतराय यांच्या केबिनमध्ये तो पोचला. मालक म्हणजे एक देखणा युवक होता. त्याने सर्वदयाळचे स्वागत केले. तो युवक म्हणाला,

''तुमच्यासारख्या थोर लेखकाची आम्हाला गरज होती. आमचं भाग्य की तुम्ही संपादक पदाची जबाबदारी घेणार आहात. आजपर्यंत मी तुमचे अनेक लेख, कथा वाचल्या आहेत. तुमच्या लेखणीची ताकद औरच आहे.''

सर्वदयाळला काय बोलावे सुचेना. आपल्याला वेगळीच व्यक्ती समजून तर हे मालक बोलत नाहीत ना? हुशारीनं संभाषणाला वेगळं वळण देत सर्वदयाळ म्हणाला,

''पहिला अंक केव्हा बाहेर पडणं अपेक्षित आहे?''

हनुमंतराय म्हणाले, ''हा प्रश्न तर मी तुम्हाला विचारायला हवा.''

तो दिवस १५ फेब्रुवारी होता. सर्वदयाळ म्हणाले, ''एप्रिल १ ला अंक निघेल''

''पण इतक्या थोड्या अवधीत तुम्हाला लेखकांकडून चांगले साहित्य मिळेल ना?''

उत्तर मिळाले, ''त्याची आपणास चिंता नको. मी आजपासूनच कामाला सुरुवात करतो.''

हनुमंतराय म्हणाले, ''तुम्हाला एक आश्चर्याची गोष्ट सांगतो. या पदासाठी २००० अर्ज आले होते. पण सर्व तकलादू वाटले. शब्दांचे फुलोरे होते नुसते. स्वतःच्या कर्तृत्वाचे गुणगान करणारे ! फक्त तुमचा अर्ज मला साधा, स्पष्ट शब्दांत आणि प्रामाणिकपणे लिहिलेला वाटला. मी आयुष्यात खरेपणाला खूप महत्त्व देतो. तो तुमच्या लेखनात, व्यक्तिमत्त्वात जाणवतो आहे, म्हणून तुम्ही या पदाला पात्र आहात.''

। साहित्य अकादमी पुरस्कार - ज्येष्ठ समाजसेविका कै. गोदावरी परुळेकर (१९७२)
- 'जेव्हा माणूस जागा होतो' (आदिवासींच्या हक्कांसाठी लढताना आलेल्या अनुभवांचे कथन) ।

प्रायोजक – श्री. निखिल रामचंद्र कात्रे, डोंबिवली

एक एप्रिलला 'हिंदुस्तान' च्या पहिल्या अंकाचे थाटामाटात प्रकाशन झाले. पंजाबच्या साहित्य वर्तुळात अंकाची म्हणजे सर्वदयाळ यांची चर्चा सुरू झाली. वाचक आणि समीक्षक यांनी अंक डोक्यावर उचलून घेतला. वाचकांच्या पत्रांचा तर पाऊस पडू लागला. वाचकांनी सर्वदयाळच्या मागे 'पंडित' उपाधी लावली.

अशा प्रकारे वर्षभरात अंकाचा बोलबाला संपूर्ण देशभर झाला. मनोरंजन, देशभक्ती, सामाजिक न्याय, उत्तम साहित्य याने अंक परिपूर्ण होता. पंडित सर्वदयाळ आता एक प्रतिष्ठित व्यक्ती होते. त्यांचे वाईट दिवस सरले. आता पैसा आणि प्रतिष्ठा दोन्ही हात जोडून समोर उभी होती.

अंबाला नगरपालिकेच्या निवडणुकांचे दिवस जवळ येत होते. मालक हनुमंतराय एका पक्षाची उमेदवारी मिळवण्याच्या खटपटीत होते. पाण्यासारखा पैसा खर्च करण्याची त्यांची ऐपत होती. त्यांच्याविरुद्ध उभे राहणारे हशमतराय हे एका शाळेचे हेडमास्तर होते. जरुरीपुरता पगार घेऊन साधे खादीचे कपडे वापरणारे, गल्लीच्या कोपऱ्यात छोट्या घरात राहणारे; पण जनतेची सेवा करण्यात कायम तत्पर असणारे ते साधे गृहस्थ होते. वास्तविक त्यांची निवडणुकीच्या रणधुमाळीत उतरण्याची इच्छा नव्हती पण मित्रपरिवाराच्या आग्रहाने ते उभे राहिले. त्यांची पंडित सर्वदयाळ यांच्याशी मैत्री असल्याने, या कामात त्यांना मदत करण्याचे सर्वदयाळांनी ठरवले.

मालक हनुमंतराय जनतेची सेवा करायचे; पण त्यांची सेवा भाषणे झोडणे, लेख लिहिणे, ठराव पास करून घेणे यापुरती मर्यादित होती. देखावा जास्त होता आणि प्रत्यक्ष कार्य करण्यात कमतरता होती. पंडित सर्वदयाळ सूज्ञ असल्याने दोन्ही उमेदवारांचे गुणदोष जाणून होते. त्यांच्या मते हशमतराय हेडमास्तर हेच योग्य उमेदवार होते. पुढच्या रविवारी पंडित सर्वदयाळ यांचे निवडणुकीसंबंधी व्याख्यान होते. ऐकण्यासाठी हजारोंच्या संख्येने लोक जमा झाले. लोकांना उत्सुकता होती की पंडितजी कोणाची बाजू घेणार? पंडित सर्वदयाळ म्हणाले,

''लोक हो, मी तुम्हाला कोणाला मत द्या असे काहीही सांगणार नाही. पण मतदान करण्यापूर्वी विचार अवश्य करा. उमेदवार कोणत्या जातिधर्माचा, किती पैसे खर्च करणार आहे याचा विचार करू नका. तर त्याच्या हृदयात देशप्रेम, गरिबांसाठी कळवळा, समाजाचे हित आहे का याची चाचपणी करा. दुष्काळ, प्लेगची साथ यांसारख्या येऊन गेलेल्या संकटात त्याने रुग्णांची, कंगाल लोकांची सेवा, मदत केली होती का? तो कोणत्या पक्षाचा उमेदवार आहे हे बघू नका, तर तो

प्रथम उर्दू व नंतर हिंदीतून लेखन करणारे, सुधारणावादी दृष्टिकोन असणारे, प्रेमचंद परंपरेतील **सुदर्शन** (१९३४-२००८) हे लेखक आहेत. समाज आणि राष्ट्रघडणीच्या कार्यात हातभार लावण्याच्या उद्देशाने त्यांनी कथालेखन केले. सहज सोपी, वाक्प्रचारयुक्त भाषा ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये आहेत. 'हार की जीत', 'आठन्नीका चोर', 'सायकल की सवारी', 'पृथ्वीवल्लभ' इ. त्यांच्या कथा प्रसिद्ध आहेत.

या पदासाठी लायक आहे ना हे बघा.''

हनुमंतराय यांना वाटत होतं की सर्वदयाळ आपले नोकर असल्याने आपलाच प्रचार करतील. पण भाषण ऐकून ते क्रोधित झाले. शिवाय सर्वदयाळांविषयी कान भरणारे त्यांचे चमचे होतेच. हनुमंतराय यांनी सर्वदयाळना बोलावून घेतले, ''आपण भाषणात माझ्या बाजूने बोलला नाहीत. हे योग्य झाले नाही.''

सर्वदयाळ म्हणाले, ''प्रश्न तत्त्वाचा आहे. मी आपला योग्य तो आदर करून सांगतो की आपल्यापेक्षा हनुमंतराय हे योग्य उमेदवार आहेत.''

हशमतराय म्हणाले, ''हे वागणं आपणास फार महागात पडेल. तुमची नोकरी, प्रतिष्ठा याचा विचार करा.''

सर्वदयाळने उत्तर दिले, ''मी सत्याची बाजू घेणारा आहे. कायम

बरें दांत घांसोनि तोंडा धुवावें । कळाहीण कां शूद्रमुखी नसावें ।।
सदा सर्वदा यत्न सांडूं नको रे । बहूसाल हा खेळ कामा न ये रे ।। २।। (मराठी)

प्रायोजक - डॉ. गीतांजली, डॉ. सिद्धार्थ पटवर्धन, नॉटिंगहॅम, इंग्लंड

पंडितजी म्हणाले, ''सर्व ठीक आहे.''

''हे दुकान आपले आहे का?''

''होय, ७-८ महिने झाले.''

हनुंतराय म्हणाले, ''हे काम आपल्या योग्यतेचं नाही.''

सर्वदयाळ म्हणाले, ''या जगात अनेकांना स्वत:च्या आवडीविरुद्ध काम करावे लागते. मी त्यांच्यापैकी एक आहे. त्यात विशेष काही नाही.''

''धंद्यातून प्राप्ती चांगली होते का?''

सर्वदयाळ ताठ मानेने उत्तरले, ''उदरनिर्वाह होतो.''

हनुमंतराय यांना माणसांची पारख चांगली होती. त्यांनी विचार केला, 'जीवनात संकटाच्या प्रसंगी जो माणूस सत्याचा सौदा करत नाही, तत्त्वापासून ढळत नाही तो खरंच थोर होय. अशा व्यक्ती अंध:कारातसुद्धा जीवनमार्ग बदलत नाहीत.' ते म्हणाले, ''पंडितजी, आपण खरंच धन्य आहात.''

इतका वेळ पंडितजी समजत होते की हनुमंतराय आपल्याला खिजवण्यासाठी आले आहेत. पण आता त्यांनी हनुमंतरायांच्या चेहऱ्याकडे बघितलं तर तिथे त्यांना प्रेमभाव आणि पश्चात्तापाची भावना जाणवली. सर्वदयाळ संकोचाने म्हणाले, ''मी एक सामान्य माणूस आहे, स्वत:ला थोर वगैरे अजिबात समजत नाही.''

हनुमंतरायांनी सर्वदयाळ यांना प्रेमाने जवळ घेतले व म्हणाले,

सत्याचा पाठपुरावा करेन.''

परिणामत: दुसरे दिवशी सर्वदयाळने आपणहून राजीनामा दिला. त्याचा स्वीकार झाला.

आता मालक हनुमंतराय यांनी प्रचारार्थ भरपूर पैसे, मिठाई व इतर अनेक गोष्टींचे वाटप सुरू केले. पण झाले मात्र उलटेच. हशमतराय हेडमास्तरच भरघोस मतांनी जिंकून आले.

दरम्यान पंडित सर्वदयाळनी इतर वर्तमानपत्रात अर्ज केले, पण कुठेच नोकरी मिळाली नाही. वडिलांच्या गावी ते परत आले. पाचशे रुपये खर्च करून छोटेसे दुकान थाटले. पण धंदा करून माल गिऱ्हाईकांच्या गळी उतरवण्याचे कसब त्यांच्यापाशी नव्हते. म्हणायचे की मी सत्याची कास धरणारा माणूस आहे. पण जगरहाटीत सत्याचं मोल कोण समजून घेणार? आता कसेबसे दुकान सुरू होते. चांगली नोकरी सोडल्याबद्दल घरच्यांचे शिव्याशाप ऐकावे लागत होते. विहिरीचे पाणी भरणे, गाईला चारा घालणे, दूध काढणे अशी सर्व कामे त्यांना करायला लागायची. बायकोही बिचारी शिवणकाम करून चार पैसे कमवायची.

एक दिवस सर्वदयाळ दुकानात गिऱ्हाईकाची वाट पाहत बसले होते. तेवढ्यात एक मोटार दुकानासमोर थांबली. त्यातून मालक हनुमंतराय उतरले. म्हणाले, ''पंडितजी, खूप दिवसांनी दर्शन झाले. कसे काय चालले आहे.''

। साहित्य अकादमी पुरस्कार - ज्येष्ठ कवी, नाटककार कै. विष्णू वामन शिरवाडकर (१९७४)
- 'नटसम्राट' (परिस्थिती आणि वृद्धत्व यांमुळे एका नटसम्राटाची झालेली शोकांतिका मांडणारे नाटक)

। डोळस व्हा आणि हिंमतीने पुढे चला ! । **प्रायोजक – डॉ. सतिशचंद्र गोरे, पुणे**

''माझ्या हातून अन्याय झाला आहे, मला क्षमा करा. तुमचे 'हिंदुस्तान' तुम्हीच सांभाळा. आजपासून तुम्ही माझे धाकटे बंधू ! तुम्ही जीवनभर प्रामाणिक, विश्वासू, न्यायप्रिय, दृढनिश्चयी राहा ही माझी परमेश्वरचरणी प्रार्थना !''

पंडित सर्वदयाळ अवाक् झाले. काय बोलावे समजेना.

हनुमंतराय म्हणाले, ''आज तुम्ही 'हो' म्हणाल्याशिवाय मी इथून हलणार नाही.'' पंडित सर्वदयाळांचे डोळे भरून आले. हनुमंतरायांनी शंभराच्या दहा नोटा काढून त्यांच्या हातात ठेवल्या. म्हणाले, ''हा तुमच्या धीरोदात्त वर्तनाचा पुरस्कार आहे. नाकारू नका.'' सर्वदयाळांनी अश्रुभरल्या डोळ्यांनी या पुरस्काराचा स्वीकार केला.

हनुमंतरायांचे एक मित्र मोटारीत बसले होते. ते म्हणाले, ''या छोट्याशा दुकानात काय करत होतात?'' हनुमंतराय म्हणाले, ''सत्याचा सौदा ! सच्चेपणाचं मोल काय असतं हे मला चांगलं समजलं आहे.''

– स्वैर अनु. नीलिमा करमरकर

ब-शशिकिरण, अशोक पथ,
लॉ कॉलेज रस्ता, पुणे 411004

❊ मैत्री भाषेशी ❊

❊ शब्दांचे रूप बदल होताना गंमती

तुम्ही तुमच्या आई, बाबा, आजी, आजोबा यांचे जुने फोटो पाहिले असतील. फोटोतली ही आपली माणसे ओळखू येत असली तरी वेगळीच दिसतात नाही का? फोटोतल्या आजोबांच्या डोक्यावर छान केस असतात. आजी नऊवारी साडीत दागिने घालून सजलेली असते. आई-बाबाही तरुण दिसत असतात. मग हळूहळू त्यांच्यात बदल होतो आणि ती आज दिसतात तशी दिसू लागतात. भाषेचंही अगदी असंच आहे बरं का ! भाषा म्हणजे एक प्रवाह असतो म्हणा ना ! वयाबरोबर माणसात थोडे थोडे बदल होतात तसेच समाज बदलेल तसे भाषेतही बदल होतात.

संस्कृत ही अनेक भारतीय भाषांची जननी आहे, हे आपण अनेकदा ऐकलेलं असेल. म्हणजेच आज आपण वापरत असलेल्या मराठी, हिंदी, गुजराती अशा भाषा या संस्कृतपासून जन्माला आल्या असा त्याचा ढोबळमानाने अर्थ. त्या सगळ्या भाषांना आर्य भारतीय भाषा असं म्हणतात. आर्यांची वैदिक संस्कृत भाषा काळाबरोबर बदलत गेली. त्यातून प्राकृत, अपभ्रंश आणि मग देशी भाषा उत्क्रांत झाल्या. वेगवेगळे वंश, वेगळी संस्कृती यांच्या संकरातून या भाषा घडत गेल्या. ध्वनींचे सतत परिवर्तन हे भाषेचे वैशिष्ट्य आहे. ते अगदी नकळत मंदपणे आणि सगळीकडे होत असते.

❊ आता आपण शेजारील तक्त्यातील काही शब्द पाहूया. संस्कृतपासून आजपर्यंत त्यांची बदलत गेलेली रूपे कशी मुळाशी नातं सांगतात पण तरीही वेगळी दिसतात. ध्वनिबदल होत असताना काही वेळा अर्थामध्येही किंचितसा बदल होतो. जिथे अर्थामध्ये बदल आहे तो कंसात लिहिला आहे.

– सुनिला गोंधळेकर

sunila.gondhakar@gmail.com

संस्कृत	प्राकृत	मराठी	हिंदी
धरित्री	धरती	धर्ती, धरणी	धरती
कलिका	कलिआ	कळी	कली
काष्ठ(लाकूड)	कट्ठ	काठी	
काक	काय	कावळा	
कर्कटिका	कक्कडिया/कक्कडच्छ	काकडी	कक्कडी
कण्टक	कटंग	काटा	काँटा
चिक्लिद्	चिखलु/चिक्खिलु	चिखल	
तृण, तहं	तण्ण/तिण	तण(धान्यात उगवणारे गवत)	
(गवताचे पाते)			
मृत्तिका	मृदा	माती	मिट्टी

रदोद्धावनं रे मुखोन्मार्जनं च, मलाकीर्णतां मा मुखे दर्शयस्व ।
कदा नैव हेया हि नित्यप्रयत्नाः, भुवि क्रीडनं नोपयुक्तं चिराय ।।२।। (संस्कृत)

३ बालदिन

हिंदी

मूळ कवी – राजनारायण चौधरी, स्वैर अनुवाद डॉ. अलका पोतदार

ठिगळांची पिशवी हातात,
अन अश्रू डोळ्यात,
कितीक मुले वेचताहेत,
अपुले नशीब कचऱ्यात!
या साऱ्यांवर भरभरून प्रेम करू,
अन् रोज बालदिन साजरा करू!

हॉटेलमध्ये कसून राबतात,
ही नाही त्यांची वाट,
कसा अन्याय बालपणात,
कशी विवशता पदरात!
त्यांना न्याय द्यायचा प्रयत्न करू,
अन् रोज बालदिन साजरा करू!

अन्नाविना रित्या पोटी निजतात,
ना मायेची उब ना उंबरठा,
कोणी नाही ज्यांचे या जगात,
नाही अर्थ अशा जगण्यात!
सतत स्नेहाचा त्यांवर वर्षाव करू,
अन् रोज बालदिन साजरा करू!

शिकण्याची आस मनात,
परि बंद शाळेची वाट,
जगण्याची लढाई लढताना,
अभावाचे शल्य मनात!
चला त्यांना साक्षर करू, शिक्षण देऊ,
अन् रोज बालदिन साजरा करू!

स्वैर अनुवाद – डॉ. अलका पोतदार, २ अथर्व टेरेस, सनसिटी रस्ता, आनंदनगर, पुणे ४११०५१

आधुनिक काळातले प्रथितयश, बालकुमारांसाठी लेखन करणारे नावजलेले कवी. बालकुमारांच्या वेगवेगळ्या विषयांवर सहजसोप्या संवादी भाषेत काव्यनिर्मिती. सध्या समाजाला भेडसावणारा बालकामगारांचा प्रश्न कवी **राजनारायण चौधरी** यांनी प्रस्तुत कवितेतून मांडला आहे. या मुलांचं भावविश्व, त्यांची परिस्थिती आणि आपण त्यांच्यासाठी काय करू शकतो ते कवींनी मोठ्या समर्पकपणे कवितेतून मांडले आहे.

। साहित्य अकादमी पुरस्कार - ज्येष्ठ कादंबरीकार कै. गोपाळ नीळकंठ दांडेकर (१९७६)
- 'स्मरणगाथा' (स्मरणरंजनात्मक लेखांचा संग्रह)।
प्रायोजक – श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे

उर्दू

भोला

मूळ लेखक – राजेंद्रसिंग बेदी, स्वैर अनुवाद – माधव शाळिग्राम

मी मायाला एका दगडी चरवीमधील लोणी आंबटपणा कमी करण्यासाठी विहिरीच्या स्वच्छ पाण्यानं धुताना पाहिलं. असे ती काही खास माणसांसाठीच करत असे. हां! आत्ता आठवलं. दोन दिवसांनंतर मायाचा भाऊ आपल्या विधवा बहिणीकडून राखी बांधून घेण्यासाठी येणार होता.

छोट्या भोलाने माझ्या विचारतंद्रीतून मला वास्तव जगात आणलं. ऊस चोखत तो मला म्हणाला, ''आजोबा, परवा दिवशी मामा येणार?''

मी माझ्या नातवाला प्रेमाने मांडीवर घेतलं. भोलाचं शरीर खूपच मऊसूत व नाजूक होतं आणि त्याचाह्रआवाज अतिशय सुरेल होता. माझ्या लांब दाढीला घाबरून जरी भोला मला आपला मुका घेण्याची परवानगी देत नसे, तरीसुद्धा मी जबरदस्तीने त्याच्या लालस गालांवर प्रेमाची खूण उमटवली. मी हसत हसत त्याला म्हणालो, ''भोल्या, तुझे मामा तुझ्या आईचे कोण लागतात रे?''

भोलाने काही क्षणानंतर उत्तर दिले,

''मामाजी!''

मायाने स्तोत्र म्हणणे थांबवले... तिच्या खळखळून हसण्याने मी मनातल्या मनात अतिशय आनंदी झालो. माया विधवा होती. तिच्यावर खूप सामाजिक बंधने होती. मी मायाला वारंवार चांगली वस्त्रे नेसण्याचा, हसण्याचा-खेळण्याचा सल्ला देताना 'समाजाची पर्वा करू नको' असे सांगितले होते. परंतु मायाने स्वतःच स्वत:ला समाजाच्या वेदनादायी आदेशाच्या अधीन केले होते. तिने आपल्या सर्व चांगल्या वस्त्रांची आणि दाग-दागिन्यांची एक पेटी, एका पेटाऱ्यात बंद करून त्याची किल्ली एका बळदात फेकून दिली होती.

मायाने हसत हसत आपलं स्तोत्र पठण चालू ठेवलं. भोला उडी मारून आईच्या मांडीवर जाऊन बसला आणि आपल्या आईकडे गीता म्हणण्यासाठी हटून बसला. त्याला गोष्टी ऐकायला खूप आवडत आणि म्हणून तो गीता केवळ त्यातल्या गोष्टींसाठीच ऐकत असे. गीतेच्या अध्यायाच्याह्रशेवटी असलेले माहात्म्य ऐकून त्याला खूप आनंद होत असे अन् तासन् तास त्या महात्म्याचा तो विचार करीत बसे.

दुपारच्या वेळी घरापासून सहा मैलावर असलेल्या शेतमजुरांना मी नांगर पोचवून आलो होतो. वृद्ध शरीर, त्यातून संकटांनी पिचलेला मी, आताशा वीस शेराचे ओझे घेताना मधेच मान दुखू लागते. मुलाच्या मृत्यूने आशेला निराशेत

दिसामाजी कांहीतरी तें लिहावें । प्रसंगे अखंडीत वाचीत जावें ॥
वदें श्रेष्ठ रे दास्य त्यांचें करावें । बरें बोलणें सत्य जीवीं धरावें ॥३॥ (मराठी)

बदलून माझी कंबरच मोडून टाकली होती. आता केवळ भोलाच माझ्या जगण्याचा आधार होता. नाहीतर वास्तविक मी मृतवतच होतो. दमल्यामुळे रात्री अंथरुणावर पडल्या पडल्याच माझा डोळा लागला. जरा वेळाने मायाने मला दूध पिण्यासाठी हाक मारली. सुनेच्या अशा आपुलकीच्या, निर्मळ स्वभावामुळे मी मनातल्या मनात आनंदलो आणि तिला शतशत आशीर्वाद दिले.

भोला अजूनही झोपला नव्हता. तो एक उडी मारून माझ्या अंथरुणावर आला. भोला म्हणाला, ''आजोबा आज तुम्ही गोष्ट सांगणार नाही का?''

''नाही बेटा.'' मी आकाशात उगवणाऱ्या चांदण्या पाहात म्हटले, ''आज मी फारच दमलो आहे. उद्या दुपारी तुला सांगेन.'' भोला फुरंगटून बसला.

खांद्यावर नांगर घेऊन शेतापर्यंत जाऊन पायीच परत आल्यामुळे मी अतिशयच दमलो होतो. माझे नवीन बूट पायात फारच घट्ट बसत होते. त्यामुळे माझ्या पायात कळा येत होत्या; नाहीतर कदाचित मी एवढा दमलो नसतो. मी आकाशात चांदण्या पाहू लागलो. आकाशात दक्षिणेच्या एका कोपऱ्यात एक तारा मशालीप्रमाणे चमकत होता. नीट न्याहाळून पाहिले तर त्याचा प्रकाश मंद होत गेला...मी पेंगत पेंगत झोपी गेलो.

सकाळी उठता उठताच माझ्या मनात विचार आला की, भोलाला असे तर वाटत नसेल ना, की 'आजोबा माझ्याकडे दुर्लक्षच करतायत.' कदाचित यामुळेच सकाळच्या वेळी त्याने माझ्या मांडीवर यायला नकार दिला होता. मी भोलाला मिठाईचे आमिष दाखवले आणि काही क्षणातच भोला आजोबांचा झाला. माझ्या मांडीवर आला आणि आपले छोटे पाय माझ्या शरीरावर लपेटून पांघरूण घेऊ लागला. भोलाने आपले दोन्ही हात माझ्या सुरकुतलेल्या गालांवर ठेवले आणि म्हणाला,

''आजोबा, तुम्ही काय सांगितले होते ते लक्षात आहे ना?''

''मी काय सांगितलं होतं?''

''तुम्ही आज दुपारी मला गोष्ट सांगणार आहात.''

''होय बेटा,'' मी त्याचा मुका घेत म्हणालो.

दुपार होण्यासाठी भोलाने किती वाट पाहिली ते भोलाच जाणे. माझं जेवण होतं न होतं तोच पटवाऱ्याने दरवाजा ठोठावला. त्याच्या हातात एक हलकी शेतमोजणीची साखळी होती. तो म्हणाला, 'तलाठ्याची माणसं जमिनीची मोजणी करण्यासाठी कनोईला आली आहेत आणि त्यांना आजच वेळ आहे नंतर मोजणी होणार नाही.'

खोलीकडे मी पाहिलं तर भोला पलंगाच्या भोवती फेऱ्या घालत अंथरुण घालत होता. अंथरुण घातल्यानंतर त्याने त्यावर एक मोठा तक्क्याही ठेवला होता. आणि स्वत: पलंगावर चढण्याचा प्रयत्न करत होता.

मी पटवाऱ्याला सांगितलं, ''तू कनोईला तलाठ्याला भेटायला पुढे हो, मी तुझ्या मागे मागे आलोच.'' जेव्हा भोलाने पाहिलं की मी बाहेर जाण्यासाठी तयार होतो आहे तेव्हा त्याचा चेहरा हिरमुसला झाला.

माया म्हणाली, ''आजोबा, इतकी घाई का करताय? कनोईचा तलाठी काही पळून जात नाहीये. तुम्ही जरा विश्रांती तर घ्या.''

मी म्हणालो, ''पटवारी निघून गेला तर मग हे काम महिनाभर तरी इथे होऊ शकणार नाही.''

माया गप्प बसली. भोलाचं तोंड कोमेजून गेलं व त्याचे डोळे भरून आले. तो म्हणाला, ''आजोबा, माझी गोष्ट, माझी गोष्ट...''

''भोलू बेटा..'' मी भोलाला टाळण्यासाठी म्हणालो, ''दिवसा गोष्ट सांगितली की प्रवासी आपला रस्ता चुकतात.''

''रस्ता चुकतात?'' भोला विचार करता करता म्हणाला, ''आजोबा, तुम्ही खोटं बोलताहात...मी आजोबांचा भोला नाही..''

आता तर मी दमलेलो पण नव्हतो आणि पंधरा-वीस मिनिटे थांबूही शकत होतो. मग भोलाच्या या हट्टाला कसा काय नकार देऊ शकणार होतो? मी माझ्या

। साहित्य अकादमी पुरस्कार - मंगेश पाडगावकर (१९८०) - 'सलाम'
(सामाजिक दोषांवर उपहासात्मक टीका करणारे काव्य)।
प्रायोजक – श्री. गौरव सहस्रबुद्धे, डोंबिवली

अंगावरील चादर काढून पलंगाच्या कडेला ठेवली आणि माझ्या पायांना ठणक्यापासून मुक्तता देत पलंगावर पडलो. मग काय भोला पुन्हा आपल्या आजोबांचा झाला! पडल्या पडल्याच मी भोलाला म्हटले,

''आता जर कोणी प्रवासी रस्ता चुकला तर त्याला तू जबाबदार!''

आणि मी भोलाला दोन शहरांच्या सात राजपुत्रांची आणि सात राजकन्यांची एक मोठी गोष्ट सांगितली. गोष्टीमध्ये त्यांच्या आपसातल्या लग्नाचे वर्णन जरुरीपेक्षा जास्त आकर्षक तऱ्हेने केले. भोलाला ही गोष्ट खूपच आवडत असे. पण मला आज भोलाच्या चेहऱ्यावर कसलाच आनंद दिसला नाही. पण एवढंसं तोंड करून शरमेने, भीतीने थरथर तो कापत होता.

मनात विचार आला की तलाठ्याची वाट पाहून पटवारी कंटाळला असेल. आपली मोजणसाखळी खिशात टाकून आपल्या गावाकडे तर गेला नसेल. मी घाईघाईने परंतु नव्या बुटात दाबल्या जाणाऱ्या दुखऱ्या पायांमुळे लंगडत लंगडत पळालो. तरी मायाने सरसूचं तेल लावून दिलं होतच. पण त्याचा विशेष उपयोग झाला नाही. संध्याकाळी जेव्हा मी परत आलो तेव्हा भोला खोलीतून बाहेर आणि बाहेरून खोलीत उड्या मारत पळताना दिसला. तो

काठीचा घोडा करून पळत होता आणि म्हणत होता, ''चल मामाच्या गावाला रे घोड्या.., चल मामाच्या गावाला.. मामाच्या गावाला चल रे.. मामाच्या गावाला चल.. टॉक टॉक..''

मी जसा दरवाज्याच्या उंबऱ्यावर पाय ठेवला तसं भोलाने गाणं बंद केलं आणि म्हणाला,

''मामा मला आगबोट आणेल. मामाच्या डोक्यावर मक्याच्या कणसांचं पोतं असेल. आपल्या इथं तर मका मिळतच नाही आजोबा! आणि ना तो अशी मिठाई आणेल नं, की अशी मिठाई तुम्ही स्वप्नात सुद्धा पाहिली नसेल.''

मी तर चकितच झालो आणि विचार करू लागलो की किती सहज त्याने 'स्वप्नात सुद्धा पाहिली नसेल' ह्याचा वापर केला. 'सात राजकुमार आणि सात राजकुमारी' गोष्टीत मी हे शब्द वापरले होते, ते त्याने लक्षात ठेवले होते.

'मामा आल्यावर त्याला आपणच पहिल्यांदा पाहू आणि घरात धावत जाऊन सर्वात आधी आईला आणि मग आजोबांना आल्याची बातमी देऊ', असं ठरवत संध्याकाळ होताच भोला दरवाज्यात जाऊन बसला. देवासमोर दिवा लावला. जो जो रात्रीचा अंधार गडद होत चालला तसतसा दिव्यांचा प्रकाश जास्त वाढत चालला. मायाने चिंतातूर स्वरात विचारलं,

''आजोबा, भैय्या अजून आला कसा नाही?''

''काही कामामुळे कदाचित थांबले असतील. किंवा असंही असेल की काही जरुरीचं काम पडलं असेल. राखीचे पैसे पोस्टाने पाठवले असतील.''

''पण राखी?''

''हं, खरंच की. एव्हाना यायला हवे होते.''

मी भोलाला अगदी जबरदस्तीनेच दरवाज्याच्या उंबऱ्यावरून उठवले. भोलाने आपल्या आईपेक्षाही चिंतातूर आवाजात विचारले,

''आई, मामा का नाही आला?''

मायाने त्याला मांडीवर घेतलं आणि प्रेमाने म्हणाली, ''सकाळपर्यंत येईलच तुझा मामा, माझ्या सोन्या.''

मग भोलाने आपले मऊ व नाजूक हात आईच्या गळ्यात टाकत विचारलं,

लिखेत् प्रत्यहं किंचिदप्येव नित्यं, पठेच्च प्रसंगानुसारं ह्यखण्डम् ।
वयःश्रेष्ठलोकस्य दास्यं कुरुष्व ।, वरां सत्यवाचं सदाङ्गीकुरुष्व ॥३॥ (संस्कृत)

‘‘माझा मामा तुझा कोण गं?’’

‘‘जसा तू छोटीचा आहेस.’’

‘‘भाऊ?’’

‘‘तुलाच माहीत.’’

‘‘आणि बन्सीचा (भोलाचा मित्र) कोण आहे तो?’’

‘‘कोणीच नाही !’’

‘‘भाऊसुद्धा नाही?’’

‘‘नाही.’’

भोला या विचित्र गोष्टीवर विचार करत झोपून गेला.

‘मायाचा भाऊ अजून नाही आला,’ मी मनात म्हणालो. आपल्या बहिणीने इतक्या प्रेमाने जमा केलेले लोणी खाण्यासाठी तरी त्याने यायला हवे होते. मी चांदण्या पाहात पाहात पेंगू लागलो. अचानक मायाच्या आवाजाने माझी झोप मोडली. ती दुधाचा कप घेऊन उभी होती.

‘‘मी किती वेळा सांगितलं आहे, माझ्यासाठी इतके कष्ट नको घेत जाऊस,’’ मी म्हणालो,

माझ्या कडेला पलंगाच्या मोकळ्या जागेत भोला त्याच्या शेजारी झोपलेल्या छोटीला बाजूला सरकवून डोळे चोळत उठला. उठल्यावर लगेच तो म्हणाला,

‘‘आजोबा, मामा अजूनही कसा आला नाही?’’

‘‘येईल बेटा, तो सकाळी सकाळी येईल.’’

थोड्यावेळानंतर भोलाला झोपवून मायाचा डोळा लागला. तसं तरुण वयात झोपेचा अंमल जरा जास्तच असतो. शिवाय दिवसभर दमल्यामुळे माया गाढ झोपी जात असे. माझी झोप सर्वसामान्य म्हाताऱ्यांप्रमाणे होती. कधी अर्धा-एक तास मी झोपत असे. मग नंतर दोन-दोन तास झोप येत नसे. मग थोडावेळ पेंग येत असे व नंतर उरलेली रात्र मी चांदण्या मोजत घालवत असे. मी मायाला झोपायला जायला सांगितलं आणि भोलाला माझ्याजवळ झोपवलं.

‘‘दिवा राहू दे. फक्त जरा कमी कर. सध्या जत्रा असल्याने चोर इकडे-तिकडे फिरत असतील’’ मी मायाला सांगितलं.

त्या नंतर माझा थोडा डोळा लागला. थोड्या वेळानंतर जेव्हा मला जाग आली तेव्हा भिंतीजवळ दिवा नव्हता. घाबरून हात लांब केले तर भोला सुद्धा अंथरुणावर नव्हता. मी आंधळ्याप्रमाणे भिंतींना धडकत, धडपडत सर्व पलंगावर पाहिलं. मायालासुद्धा उठवलं. घरातला कानकोपरा शोधला. भोला कुठंच नव्हता.

‘‘माया, आपलं सर्वस्व गेलं गंऽऽ...’’ मी कपाळावर हात मारत म्हणालो.

माया आई होती. तिचं काळीज कसं विदीर्ण झालं असेल तिचं तिलाच ठाऊक ! तिचा धीरच सुटला. ती वेड्यासारखा आक्रोश करू लागली. हा सगळा गोंधळ ऐकून शेजारणी-पाजारणी जमा झाल्या आणि भोला हरवल्याचे कळल्यावर रडू लागल्या. त्यांच्यापेक्षा माझा शोक अधिक होता. मी आज एका भुरट्याला घरात डोकावताना पाहिलं होतं. पण मी त्याकडे दुर्लक्ष केलं होतं. देवा ! ती वेळ परत थोडीच माघारी येणार! मी देवाची प्रार्थना केली की काहीही करून कोण्या एका काळीचे माझे पुण्य उपयोगी पडू दे. मी नवसही बोललो की भोला मिळू दे. भोलाच या वंशाचा दिवा होता. तोच आमच्या डोळ्यांची ज्योती, आमच्या शरीराचे चैतन्य ! त्याच्याशिवाय आम्हालाह्न अस्तित्वच नव्हतं.

मी वळून पाहिलं. माया बेशुद्ध पडली होती. तिचे हात आतल्या बाजूला वळलेले होते. शिरा ताणल्या गेल्या होत्या. डोळे निर्जीव दिसत होते. बायका तिचं नाक बंद करून तिची दातखीळ उघडण्याचा प्रयत्न करीत होत्या.

राजेंद्रसिंग बेदी (जन्म १९१५, मृत्यू १९८४) हे प्रगतिवादी उर्दू लेखक, नाटककार, पटकथा लेखक, सिनेदिग्दर्शक, संवाद लेखक होते.
सादत हसन मंटो यांच्या नंतर दुसऱ्या क्रमांकाचे कादंबरीकार म्हणून ते ओळखले जातात. मंटो यांच्याप्रमाणेच भारताच्या फाळणीच्या झपाटून टाकणाऱ्या कथांचे कथाकार म्हणून त्यांची गणना होते. हृषिकेश मुखर्जींच्या - ‘अभिमान’, ‘अनुपमा,’ आणि ‘सत्यकाम’ या चित्रपटांचे आणि बिमल रॉय यांच्या ‘मधुमती’ या चित्रपटांचे संवाद लेखन त्यांनी केले होते.

। अभिमानास्पद - प्रसिद्ध लेखक लक्ष्मण माने (१९८१) - ‘उपरा’
(भटक्याविमुक्त जमातीतील एका संवेदनशील लेखकाचे आत्मकथन)।
प्रायोजक – श्री. श्रीकांत कुलकर्णी, ठाणे

माया शुद्धीवर आली. मला पहिल्यापेक्षा जरा धीर आला. मी मनात म्हणालो, मीच मायाला आधार देऊ शकतो. मीच जर असा धीर सोडला तर माया वाचणार कशी? मी धीर एकवटून म्हणालो,

''माया बेटी! हे बघ, आपलं घर विस्कटू देऊ नको. धीर धर. मुलं पळवली जातात पण शेवटी मिळतात सुद्धा. हे मुलं पळवणारे असतात ते मुलांना मारून टाकण्यासाठी पळवत नाहीत. त्यांना वाढवून त्यांच्याकडून कामं करून घेण्यासाठी पळवतात. भोला सापडेल.''

एका आईसाठी हे शब्द निरर्थक होते. यावेळी रात्र अर्धी इकडे व अर्धी तिकडे अशी होती. आमचे शेजारी गावापासून दहा कोस दूर, शहरात असणाऱ्या पोलिसठाण्यात या घटनेची माहिती देण्यासाठी गेले.

अचानक दरवाजा उघडला आणि भोलाच्या मामाला आम्ही आत येताना पाहिलं. त्याच्या कडेवर भोला होता. त्याच्या डोक्यावर मिठाईची टोपली आणि हातात दिवा होता. आम्हाला तर असं वाटलं जणू सर्व जगातील दौलत आम्हाला मिळालीय.

मायानं भावाला पाणी हवं का विचारलं नाही की त्याची विचारपूससुद्धा केली नाही. तिने भावाच्या कडेवर असलेल्या भोलाला ओढून घेतलं आणि ती त्याचे पटापट मुके घेऊ लागली. सर्व शेजाऱ्यांनी अभिनंदन केलं.

भोलाचा मामा म्हणाला, ''काही कामामुळे मला निघायला उशीर झाला. उशिरा निघाल्यामुळे मी अंधारात रस्ता चुकलो. एकाएकी मला एका दिशेला उजेड येत असलेला दिसला. मी त्या उजेडाच्या दिशेने पुढे झालो. त्या भयानक काळोखात, परसपूरहून येणाऱ्या रस्त्यावर भोलाला दिवा घेऊन, काट्याकुट्यातून येताना पाहिल्यावर मी चकितच झालो. मी त्याला या अवेळी इथे कसा काय असे विचारल्यावर तो म्हणाला की 'आजोबांनी आज दुपारच्या वेळी गोष्ट सांगितली होती अन् म्हणाले होते की दिवसा गोष्ट सांगितली तर येणारा प्रवासी रस्ता चुकतो, विसरतो. मामा तू खूप उशिरापर्यंत आला नाहीस. तेव्हा मला कळलं की तू रस्ता चुकला असशील. आणि आजोबा तर म्हणाले होते की जर कुणी रस्ता चुकला तर त्याची जबाबदारी तुझी म्हणून...'''

– स्वैर अनु. माधव शाळिग्राम

६९/८ स्नेह, सह गृहरचना, रामबाग कॉलनी, चैतन्य क्लबसमोर, पौड रस्ता, कोथरुड, पुणे 411038

madhav.shaligram@yahoo.in

बहू खेळ खोटा सदालस्य खोटा । समस्तांसि भांडेल जो तोचि खोटा।।
बहुतां जणांलागि जीवें झिजावें । भले सांगती न्याय तेथें भिजावें ।। ४।। (मराठी)

शब्दकोडे

(हिंदी पर्यायांना मराठी प्रतिशब्द चौकटीत लिहा.)

१	२		३		४	५			६
७			८					९	
	१०	११			१२		१३		
१४				१५			१६		१७
		१८	१९						
२०	२१		२२			२३			
२४				२५	२६				२७
२८			२९				३०	३१	
	३२				३३	३४			
३५			३६					३७	

आडे की ओर

१) इस शब्द का प्रयोग हिंदी में सफर अर्थ के लिये होता है। मराठी में कष्ट, त्रास इस अर्थ के लिये इस शब्द का प्रयोग किया जाता है।
४) गरमी ७) नया
८) 'हवा खेलती रहती है' इस अर्थ का विशेषण
९) खेल मे चिडना और कपट करना
१०) दरवाजा
१२) युद्ध में तोप लेकर जानेवाली गाडी
१४) मन में चिंतन १६) ऊपर
१८) आकाश के ग्रहों का वेध लेनेवाली इमारत
२०) भुजंग
२२) गिल्लीडंडे के खेल मे गिल्ली रखनेका छोटासा गठढ्ढा
२३) दुबला, पतला २४) गानेवाला, गवैया
२५) महाराष्ट्रका तटीय इलाका
२८) क्रिकेट के खेलमे एक स्टंपसे दूसरी स्टंपतक ली जानेवाली दौड
२९) आदमी ३०) बेचारा
३२) जूता, पादत्राण
३३) नगर का प्रधान शासक
३५) निश्चित ३६) ऋण
३७) पूराना ४० सेरका माप

नीचे की ओर

१) अंतराळ का वाहन
२) खिडकी का काचफलक
३) युद्धविराम के बाद किया जानेवाला करारनामा
४) देर, विलंब ५) हेतू
६) मजाक
९) दुष्मन का हवाई जहाज या पानीवाला जहाज की दिशा मालूम करनेवाला यंत्र
११) हवाई जहाज का धावनपथ (अंग्रेजी शब्द)
१३) गाँव के रहनेवाले
१४) विशाल सागर - हिंद, प्रशांत, अटलांटिक आदि
१५) ९०° से बडा और १८०° से छोटा कोण
१७) नदी का किनारा १९) आँच
२१) हवा की वेग से फिरनेवाला और ऊर्जा निर्माण करनेवाला चक्र
२३) शर २६) काव्य
२७) रक्षा करना, हिफाजत
२९) धनी ३०) पारद
३१) मँझला, न बढिया न घटिया
३४) किला, दुर्ग

– मीनाक्षी केतकर
४, क्षितिजरेखा, तिसरी गल्ली , डहाणुकर कॉलनी, कोथरुड, पुणे 411029

। साहित्य अकादमी पुरस्कार - ज्येष्ठ लेखक कै. व्यंकटेश माडगूळकर (१९८३) - 'सत्तांतर'
(प्राणी जगतातील सत्तेसाठीचा संघर्ष चित्रित करणारी कादंबरी)।

प्रायोजक – श्री. अजित परांजपे, पुणे

नापास नाही, पासच !

मूळ लेखक – जितेंद्र भट, स्वैर अनुवाद – अंजनी नरवणे

आजूबाजूला लहान लहान टेकड्या होत्या आणि मधोमध होतं ते मोठ्ठ तळं. त्या अथांग पाण्याकडे बघत तो उभा होता. एक दगड उचलून त्यानं तळ्यात फेकला आणि त्यामुळं झालेला छोटासा भोवरा न् त्याच्या भोवताली झालेली वर्तुळं बघत राहिला - तोही असाच... त्या दगडासारखा... तळाशी...

तेवढ्यात त्याच्या पाठीवरून येऊन एक दगड पाण्यात पडला. पण त्या दगडानं पाण्यावर तीन उड्या मारल्या आणि मग तो आत गेला! खूपच नवल वाटून तो पाण्यावरच्या वर्तुळांकडे बघत राहिला आणि मग धीर एकवटून त्यानं मागे वळून पाहिलं. भगवे कपडे घातलेला एक दाढीवाला माणूस बांबूच्या वनाजवळ उभा होता आणि त्याच्याकडे बघून हसत होता! मुलगा एक पाऊल मागे सरकला, त्या माणसानं हात लांब करत म्हटलं,

''थांब तिथेच. तुला जे करायचंय् ते दगड फेकून लांबवायला बघतोयस; पण करायचंच असलं तर सहज होऊन जाईल. किनाऱ्यापासूनच खूप खोल आहे पाणी!''

मुलगा थरथरला. त्यानं त्या माणसाच्या डोळ्यांकडे बघितलं - शांत, स्थिर. तो त्या डोळ्यांकडे फार वेळ बघत राहू शकला नाही. नजर वळवू लागला, तेवढ्यात त्या माणसानं त्याचा हात पकडला, ''चल'' आणि मुलगा मुकाट्यानं त्याच्याबरोबर चालू लागला.

''एकच दगड तीनदा कसा उडाला ह्याचं तुला नवल वाटलं ना? अरे त्यात काही जादूबिदू नाहीये! *ओन्ली ट्रिक ॲन्ड प्रॅक्टिस!''* आणखीच नवल! हा माणूस चांगलं इंग्रजीही बोलत होता!

टेकडी चढून उताराला लागल्यावर समोर खूप मोठा वड दिसला, भोवताली जंगल, वडाखाली झोपडी आणि थोड्या अंतरावर आणखी थोड्या झोपड्या.

वडाखालच्या झोपडीचं दार उघडून तो माणूस त्याला आत घेऊन गेला. वेताचं एक स्टूल होतं त्यावर त्याला बसवलं, पाणी प्यायला दिलं,

''घे, वॉटर-फिल्टरचं नाहीये, पण शुद्ध न् स्वच्छ आहे, नकोय? बरं, राहू दे. तहान लागेल तेव्हा पी.''

मुलानं मग गटागटा पाणी पिऊन टाकलं आणि म्हणाला, ''बाबाजी!''

''मी बाबाजी नाहीये, माझं नाव

बहुक्रीडनं व्यर्थमालस्यमेवं, समस्तैश्व वाग्वैरधारी ह्यसत्यः ।
जनानं कृते श्राम्यतां ते हि देहः, त्वरेथा नयं यत्र सन्तो वदन्ति ॥४॥ (संस्कृत)

जीवन. इथे राहणारे आदिवासी लोक सगळ्यांनाच - मलाही, 'तू'च म्हणतात, तूही मला नुसतं 'ए जीवन'च म्हण. आणि हे भगवे कपडे माझ्या गुरुजींचे आहेत. ते आता नाहीत. आणि मला काय, कसलेही कपडे चालतात. मग गुरुजींचे कपडे फेकून कशाला द्यायचे, म्हणून मी ते वापरतो. बरं, आता सांग, तुझं नाव काय? तुझे महागडे कपडे बघून एवढं तर समजतंय् की तू श्रीमंत घरचा मुलगा आहेस.''

''सोहम्'' नाव सांगता सांगता त्याचा चेहरा कसनुसा झाला.

''मग जीवन नको असं का झालं सोहम्?''

''अं? छे छे... तुमच्याशी काहीच... तुम्हाला तर मी ओळखतही नाही...''

जीवनला खूप हसू आलं. ''जीवन म्हणजे 'मी' असं नव्हतं म्हणायचं मला. जीवन म्हणजे तुझं जीवन, *युअर लाइफ.* ते इतकं नकोसं का झालं की इथे येऊन पोचलास? *व्हॉट इज दि प्रॉब्लेम? आय नो, बट आय वुड लाइक टु नो फ्रॉम यू.''*

सोहम्‌ला त्याची स्वत:ची मातृभाषा चांगली येत नव्हती हे जीवनच्या लक्षात आलं होतं. जरा वेळ थांबून नकारार्थी डोकं हलवत जीवनच पुढे म्हणाला,

''मरून जाणं इतकं सोपं नाही सोहम!''

''मी मरून जायला... त... तुम्हाला कोणी सांगितलं?''

''सांगणार कोण रे? पण शहरातला कोणताही तुझ्या वयाचा मुलगा इथपर्यंत उगीचच एकटा येतच नाही. अर्थात खरंच कोणाला जीव द्यायचा असला तर तो तिथल्या तिथंच मार्ग काढतो. जे इथपर्यंत येतात ना, त्यांना जगायचं तर असतं; पण स्वत:च्या इच्छेप्रमाणे ते जगू शकत नाहीत, आणि मरणाची भीती वाटते म्हणून मरू शकत नाहीत!''

सोहम् उठून उभा राहिला. त्याच्या घरी न् शाळेत नुसतं इंग्रजीही बोलत असत. पण त्याला अगदी आतून जे वाटत होतं, ते इंग्रजीत धड सांगता येत नव्हतं आणि त्याची मातृभाषाही त्याला चांगली येत नव्हती!

बांबूच्या आडव्या पट्ट्या लावलेल्या खिडकीपाशी जाऊन तो उभा राहिला. बाहेर झाडांवरच्या घरट्यांमधून छोट्या छोट्या पिल्लांची, आईची वाट बघणारी तीन चार डोकी दिसली, तसे त्याचे डोळे पाणावले. हातांनी पकडलेली खिडकीची आडवी पट्टी निघून हातात आली.

''सोहम्! आयुष्यात येणारे प्रश्नही ह्या पट्ट्यांसारखेच असतात रे! त्यांच्याशी सामना करेपर्यंत त्यांची अडचण वाटते. एकदा सापडले हातात, की दूर फेकून देता येतात की नाही? पण आपण त्यांचा सामना न करता ते बघून, बावचळून उभे राहातो...''

सोहम्‌च्या खांद्यावर हात ठेवून जीवननं विचारलं, ''काय झालं? नापास झालास?''

उत्तराऐवजी एक मोठा हुंदका आला. जीवननं त्याचा हात धरला, ''चल बाहेर.''

आजूबाजूच्या झोपड्यांमधून पेटत्या चुलींचा धूर निघत होता. पाच-सहा लहान मुलं बाहेर लंगडी खेळत होती.

''बघ, पळतायत ना एका पायावर? पक्का निश्चय केला ना मनाशी, तर त्या निश्चयाच्या एका पायावर शर्यतही जिंकता येते सोहम्.

तुझं जग ना सोहम्, फार आक्रसलंय्. त्यामुळं 'पास' शब्दाचा अर्थही संकुचित झालाय; आणि त्या अर्थामध्ये तू बसला नाहीस म्हणजे तू 'नापास!' हे जग खूप खूप मोठं आहे सोहम्, आपण ते बघितलं पाहिजे. अरे, नुसतं आपलं मन पुरतं समजून घेतलं आणि आपल्या आसपासचं जग नीट समजून घेतलं तरी पुष्कळ होईल.''

''पण... माझे मॉम आणि डॅड म्हणतात, की मी नापास होतो, कारण मी मूर्ख आहे. इतर मुलांची उदाहरणं देऊन मी कसा मूर्ख आहे ते सांगतात...''

''बोर्डाच्या किंवा युनिव्हर्सिटीच्या परीक्षांमध्ये पास झालं, म्हणजे पास, असं?'' जीवननं पलीकडे खेळणाऱ्या मुलांना जवळ बोलावलं. घाणेरडे कपडे, मळलेले

। साहित्य अकादमी पुरस्कार - प्रसिद्ध लेखक लक्ष्मण गायकवाड (१९८८) - 'उचल्या' (उपेक्षित समाजातून पुढे आलेल्या तरुणाचे आत्मकथन)।
प्रायोजक – श्री. विद्याधर सहस्रबुद्धे, डोंबिवली

हात-पाय, पण तीक्ष्ण नजर.

''माहीतेय तुला ही मुलं काय न् कसं शिकतायत? ह्या मोठ्या मुलाचं नाव वसंत. इथून जवळात जवळ जे गाव आहे तिथल्या शाळेत जातो. जाऊन येऊन पंधरा किलोमीटर अंतर आहे. उन्हाळ्यात, थंडीत, पावसाळ्यात, सबंध वर्ष तो गेला. परीक्षेत पास-नापास काही झाला, तरी माझ्या मते तो पासच आहे ! आणि ही महुवा. वरचेवर खूप आजारी पडायची.. मी तिला योग, प्राणायाम शिकवलं. इथेच मिळणाऱ्या मुळ्या, पानं-फळं ह्यांची औषधं दिली. आता ती अगदी बरी आहे. हा काळूराम तिचा भाऊ, तिला मदत करतो. आता शाळा सुरू झाल्या की, वसंत, महुवा न् काळूराम तिघंही जाणार आहेत शाळेत. तूच सांग, ही 'पास' नाहीत?''

जीवनला माहीत तर होतंच, की काय बोलावं हे सोहम्‌ला सुचणार नाही.

जीवन त्या झोपड्यांमध्येच आळीपाळीनं कोणाकडे तरी जेवत असे. नाचणीची भाकरी, कांदा, गूळ. कधीतरी मुगाची उसळ. सोहम् 'मला भूक नाही' म्हणाला, ते जीवनला अपेक्षित होतं.

अंधार पडलेल्या त्या जंगलात सोहम् झाडांवर चमचमणारे काजव्यांचे थवे आणि रातकिड्यांचा किर्रर्र आवाज, सगळं नवलाईनं बघत, अनुभवत होता. झोपडीत परत येऊन जीवननं गोणपाटाचे दोन तुकडे अंथरले. एकावर एक जाडसर फटकूर टाकलं, ''थकला असशील सोहम्, झोप आता...''

''टोचतंय्.''

''काय?''

''हे अंथरलंय् ते.''

''दुसरं काही नाही?''

''दुसरं काय?''

''तुझं असं जीव द्यायला पळून येणं...''

''....''

''का? बोलला नाहीस?''

''जीवन, मला शिकायचंच नाही असं नाहीये. जे मला शिकायचंय् ते शिकायला मॉम-डॅड नाही म्हणतात. त्यांना मी डॉक्टरच व्हायला हवं आहे. जे मला नाही व्हायचं, मला ते नाही आवडत. तरीही पप्पांनी वशिले लावून, पैसे चारून, सगळी 'व्यवस्था' केली होती. पण अशा लबाड्या करून डॉक्टर होणं मला कबूल नव्हतं. मी ते नाही केलं, म्हणून मॉम-डॅड...''

''अरे वा सोहम् ! व्हॉट अ सरप्राइज ! तू एवढी मोठी लढाई जिंकलास, लबाडी करून डॉक्टर न होण्याच्या तुझ्या निर्धारावर तू ठाम राहिलास! मग तू 'नापास' झालास कसं म्हणायचं? अरे किती थोडी

हिशेबीं सदा न्याय सांडूं नका रे । कदाचीत अन्याय होतां धका रे ॥
जनीं सांडितां न्याय रे दुःख होतें । महासूख तेंही अकस्मात जातें ॥ ५॥ (मराठी)

मुलं असतील अशी? तू तर शंभर टक्के मिळवून पास आहेस!''

सोहम्‌ला प्रथमच असं कोणी म्हटलं होतं. खूप छान वाटलं त्याला. जीवन बोलतच होता. ''पास व्हायचं म्हणजे स्वत:च्या निश्चयावर ठाम राहायचं, आपला मार्ग आपणच निवडायचा!''

''जीवन! तुम्ही सुद्धा कधीतरी?''

''होय सोहम्! तेच प्रश्न न् तसाच दुराग्रह. टेक्नॉलॉजी खूप पुढे गेली, पण माणसाचं मन नाही बदललं! माझ्या वडिलांची इच्छा मी आय. ए. एस. व्हावं. समाजात प्रतिष्ठा, मानमरातब मिळवावा अशी होती. स्कॉलर होतो ना मी! पण मला सैन्यात जायचं होतं. सैन्यात जायचंय म्हटल्याबरोबर आई फारच घाबरून गेली. त्या 'लहान वयातच ह्याचं लग्न करून टाकूया' असा तिनं हट्ट धरला! भांडणं, हट्ट, रागवारागवी, दडपशाही- माझ्या मनासारखं तर होणारच नाही हे बघून मी वैतागलो. निराश झालो, अन् पळून आलो इथं जीव द्यायला! तू पाण्यात आधी दगड टाकलास, मी तर सरळच आत उडी टाकली! पण एका बाबाजींनी ते बघितलं अन् मला बाहेर काढलं.

मला म्हणाले, ''सैन्यात का जायचंय तुला?''

ताठ मान करून मी सांगितलं, ''देशसेवा करायला!''

मग ते म्हणाले, ''देश म्हणजे फक्त सरहद्द? सरहद्दीच्या आतही देशाची सेवा करायच्या हव्या तेवढ्या संधी आहेत. हे वनवासी लोक, ह्यांच्यासाठी काम केलंस तर तीही देशसेवाच ना? आणि देशाचे शत्रू तर सरहद्दीच्या आतही खूप आहेत. भोळ्या, अडाणी, गरीब लोकांच्या मनात चुकीचं भरवून त्यांना नक्षलवादी बनवणारे, तोडफोड, जाळपोळ, खून करायला शिकवणारे, हे सगळे आपल्या देशाचे शत्रूच आहेत ना?

सोहम्, गुरुजींनी मला शिकवलं, की फक्त स्वत:चा विचार न करता इतरांसाठी जगणं खूप अवघड आहे; मरून जाण्यापेक्षा पण त्यातच खूप आनंद आहे. हे करू शकण्यात जो पास होईल, तो पास! अरे हा जो समाज हे करू शकण्यात नापास झालाय, तो आपल्याला पास-नापास ठरवणारा कोण?''

दोघंही स्तब्ध होते. मग सोहम् म्हणाला, ''जीवन, मीही इथंच, तुमच्यासारखा, तुमच्याबरोबर.''

''नाही सोहम्! माझ्यासारखा, पण माझ्याबरोबर नाही. तू परत जा. चुकीच्या विचारांनी तुंबलेला समाजाचा जलविस्तार मोकळा, वाहता कर. वनवासी आणि नगरवासींमध्ये सेतू बांधूया आपण. ह्या वसंत, महुवासारखी मुलं मी तिकडे पाठवेन. त्यांना पुढे शिकायला मदत कर तू. अशी असंख्य प्रजा शिकेल, देशाचा उद्धार होईल. तू, मी न् ही सगळी प्रजा - सगळीच 'पास' होतील!''

सोहम्‌चा चेहरा आता शांत, उत्सुक, विचारमग्न होता. त्याच्या डोक्यावर हात फिरवत जीवन म्हणाला, ''झोप आता, थकला असशील, उजाडेलच थोड्या वेळानं,'' जीवनचा हात हातात धरून सोहम् झोपून गेला.

स्वैर अनुवाद – अंजनी नरवणे
एफ १/१ 'नेस्ट'
एच. डी. एफ. सी. कॉलनी
चिंचवड (पूर्व), पुणे 411019

ही अनुवादित पुस्तकेही जरूर वाचा

'आयडॉल्स' (इंग्रजी) - सुनील गावस्कर; अनु. बाळ पंडित, उत्कर्ष प्रकाशन
'प्रज्ज्वलित मने' (इंग्रजी) - अब्दुल कलाम; अनु. चंद्रशेखर, चिनार प्रकाशन
'भारताचा शोध' (इंग्रजी) - पंडित नेहरू; अनु. साने गुरुजी, करंदीकर, कॉन्टिनेंटल प्रकाशन
'गोष्टी माणसांच्या' (इंग्रजी) - सुधा मूर्ती; अनु. लीना सोहोनी, मेहता प्रकाशन
'पुण्यभूमी भारत' (इंग्रजी) - सुधा मूर्ती; अनु. लीना सोहोनी, मेहता प्रकाशन
'चोमा महार' (कन्नड)- शिवराम कारंथ; अनु. शामलता काकडे, कॉन्टिनेंटल प्रकाशन
'पाडस' (इंग्रजी)- मार्जोरी, कितन रॉलिंग; अनु. राम पटवर्धन, मौज प्रकाशन

। अभिमानास्पद - ज्येष्ठ लेखक, समीक्षक आनंद यादव (१९९०) - 'झोंबी'
(ग्रामीण भागातील गरीब शेतकऱ्याच्या मुलाची शिक्षणासाठीची धडपड)।
। दात मजबूत राखण्यासाठी दातांची नियमित निगा राखा। **प्रायोजक – डॉ. कीर्ती आपटे, पुणे ☎ ९४२२०१७१७५**

तेलगु

स्वत:चे पुस्तक

मूळ लेखक – श्री. नार्ला व्यंकटेश्वर राव, स्वैर अनुवाद – डॉ. तुलसी भारत

पुस्तकांची खरेदी करायला मला एवढे आवडते, की ते मी शब्दांत सांगू शकत नाही. खिशात पैसे असो वा नसो; पुस्तक दिसले, की ते खरेदी करण्यासाठी मी सज्ज असतो. ते पुस्तक कायम उपयोगी पडणारे असो, वा नसो तरीही ते पुस्तक खरेदी करेपर्यंत माझे मन अस्वस्थ राहाते. कधी कधी पैसे उधार घेऊनसुद्धा मी पुस्तके खरेदी करत असतो. कधी कधी तर डाळ-तांदूळ, औषध-पाणी वगैरे जीवनावश्यक गोष्टी बाजूला ठेवूनसुद्धा मी पुस्तकं खरेदी करतो व नंतर पस्तावतोही. ही माझी सवयच झाली आहे. किती तरी वेळा मी असं ठरवतो, की पुस्तकाच्या दुकानाच्या बाजूला फिरकायचेही नाही, परंतु तशी शपथ घेऊनही एखाद्या व्यसनी माणसासारखं परत चार-पाच दिवसांनी पुस्तकाच्या दुकानापाशी गेल्याशिवाय मला राहावत नाही. 'हे एक व्यसन आहे, काळजी घ्या,' असे काही मित्र सांगतात; परंतु पुस्तकाचं व्यसन हे एक उत्तम व्यसन आहे!

या मद्रास (चेन्नई) शहरात कितीतरी लहान-मोठी ग्रंथालये आहेत. पण त्या मानाने मद्रासमध्ये धर्मछत्रीही भरपूर आहेत, नाही का? पण म्हणून मी काय तेथे जाऊन राहतो का? छत्र वेगळे आणि घर वेगळे. छत्रावर कोणा एकाचा हक्क नसतो. तिथे येणाऱ्या सगळ्यांचाच त्यावर हक्क असतो. माझ्या इच्छेनुसार मी तिथे राहू शकतो का? तीन-चार दिवस राहिल्यावर 'पडा बाहेर' म्हणतील. तरीही राहायचेच म्हणून हट्ट धरला तर 'दिवसाला चार-आठ आणे भरा' म्हणतील. आणि स्वत:चं घर? त्याबद्दल बोलायचे म्हटले, तर घराचा मीच मालक, माझ्या सोयीनुसार घराची मांडणी मी करू शकतो. माझ्या मर्जीनुसार मी त्यात राहातो.

नयो नैव हेयो हि संख्यानलेखे, कदाऽन्यायभासे नयाय प्रयत्यम् ।
जने न्यायहानौ हि पीडानुभूतिः, महासौख्यमेव प्रणश्येदकस्मात् ॥ ५॥ (संस्कृत)

त्याच्यातून 'चालते व्हा' म्हणायचा कुणालाही अधिकार नाही. राजवाड्यासारखी धर्मशाळा सुद्धा 'स्वत:च्या' झोपडीच्या तुलनेने कमीच, नाही का? वेगवेगळे पक्षी 'स्वत:ची' घरटी बांधतात ते बहुतेक हे सत्य जाणल्यामुळेच असेल.

धर्मछत्र व सार्वजनिक ग्रंथालय या दोन्हींमध्ये खूप साम्य आहे. सार्वजनिक ग्रंथालयात हवे असलेले पुस्तक हवे त्या वेळी मिळणे अवघड आहे. जर मिळाले तरी, एक किंवा दोन आठवड्यात ते परत करावे लागते. नाहीतर दिवसाला एक आणा याप्रमाणे दंड भरावा लागतो. मुखपृष्ठ वगैरे फाटले तर ती वेगळी भानगड आहे. या कारणामुळे प्रसिद्ध कन्नेमेरा ग्रंथालयापेक्षाही (चेन्नई येथील प्रसिद्ध ग्रंथालय) माझ्या घरातल्या ह्या छोट्याशा पुस्तक संग्रहाचा मला खूप अभिमान वाटतो; खूप प्रेम वाटते.

'उधारीवर घेतलेल्या पुस्तकामुळे मिळणारा आनंद अत्यल्प असतो,' असे स्टान्ली बाल्डविक यांनी सांगितले आहे. मीसुद्धा ह्या मताशी सहमत आहे. स्वत: विकत घेतलेले पुस्तक एका दमात वाचण्याचे बंधन नसते. वाटेल तेव्हा, वाटेल तेवढे आरामात आपण ते वाचू शकतो. हाती घेतलेले पुस्तक एका दमात (तसे ते असले तर) वाचून झाले तरी नंतर त्यातला आपल्याला आवडलेला भाग परत वाचून त्याचा आनंद आपण घेऊ शकतो. आवडलेला भाग अधोरेखित करू शकतो. वाचत असताना आलेले विचार, मुद्दे समासात नोंदवू शकतो. याशिवाय जर कंटाळा आला, राग आला किंवा अगदीच असह्य झाले तर पुस्तक आपटूही शकतो !

'पंजाब केसरी' लाला लजपतराय एकदा लाहोरमधून दिल्लीला निघाले. लांब प्रवासात वाचायला म्हणून भरपूर पुस्तकांचा गठ्ठा त्यांनी सोबत घेतला. स्टेशनवरून रेलगाडी निघाल्या निघाल्या रुडयार्ड किप्लिंगची कादंबरी 'किम्' हातात घेऊन ते वाचू लागले. दहा पंधरा पाने वाचल्यानंतर किप्लिंगने भारतीयांबद्दल काढलेले उद्गार त्यांना रुचले नाहीत. त्यामुळे संतापाने त्यांनी ते पुस्तक धावत्या गाडीच्या खिडकीतून फेकून दिले. तेवढ्यात त्यांना हे पुस्तक उधार आणल्याची आठवण झाली, नि त्यांनी जीभ चावली ! जर ते पुस्तक त्यांचे स्वत:चे असते तर केलेल्या या कौतुकास्पद कामगिरीबद्दल त्यांनी स्वत:ला शाबासकी दिली असती ! जीभ चावून डोक्यावर हात मारण्याची त्यांच्यावर वेळ आली नसती!!

लहान मूल गोड असतेच, परंतु इतरांचे मूल स्वत:च्या मुलाइतके गोड असते का? उधार घेतलेले पुस्तक व स्वत:चे पुस्तक यांत हाच फरक आहे, असे माझे मत आहे. हे फक्त माझे मत नव्हे तर हा माझा स्वत:चा अनुभव आहे. म्हणून पैशाची कितीही अडचण असली आणि पैसे उधार घेण्याची वेळ आली, तरीही मी पुस्तकं खरेदी करणं कधी सोडलं नाही.

काही सुदैवी माणसं पुस्तक विकत घेत नाहीत; परंतु पुस्तके गोळा करतात. ही संग्रहविद्या (तस्करण विद्येचा गौरवसूचक शब्द) मला लाभली नाही. खरं म्हणजे ही खूप सोपी विद्या आहे. एखादे पुस्तक 'वाचून परत देतो, एकदा द्या' असे म्हणून दुसऱ्याला त्रास देऊन पुस्तक आपल्या ताब्यात घेणे किती सोपे आहे नाही? कुणीतरी मेला 'माझे पुस्तक मला परत कर' असे सारखे मागे लागलाच, तर 'हो, आज-उद्या नक्की देतो' असे बोलून पुस्तक देण्याची कृती टाळू शकतो. दहा वेळा असे विचारल्यानंतर तो (पुस्तक मागणारा) माणूस कंटाळून

तेलुगु भाषेतील प्रसिद्ध लेखक, संपादक, नाटककार, निर्भीड पत्रकार **श्री. नार्ला व्यंकटेश्वर राव** (जन्म १९०८, निधन १९८४) यांच्या 'माटा-मंती' या ललित लेखसंग्रहातील 'सोंत पुस्तकम्' या ललित लेखाचा हा मराठी अनुवाद आहे. स्पष्ट विचार, सोपी भाषा, सहज विनोद निर्मिती ही श्री. नार्ला यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये आहेत.

। साहित्य अकादमी पुरस्कार - प्रसिद्ध कादंबरीकार विश्वास पाटील (१९९२) - 'झाडाझडती' (धरणामुळे विस्थापित झालेल्यांची व्यथा मांडणारी कादंबरी)।
प्रायोजक – श्री. सुधीर विष्णु दफ्तरदार, पुणे

जातो. किंवा पुस्तक घेणारा ‘कुठे ठेवून दिले सापडत नाहीये हो, नवीन विकत घेऊन देतो’ असे सांगू शकतो. पुस्तक देणारा गरीब स्वभावाचा माणूस असला, तर ‘नको कशाला’ असे नक्की म्हणतो. जर असे म्हटले नाही तर ‘उद्या खरेदी करून देतो... परवा देतो’ असे सांगून देणारा उशीर करू शकतो. कितीही हट्टी स्वभावाचा असू द्या, पुस्तक मागणारा नक्की कंटाळून जाणारच! किंवा अगदीच पाठपुरावा केला तर पुस्तक घेणारा ‘परवा कपाट लावत असताना तुमचे पुस्तक सापडले’ असे सांगून पुस्तक त्यांच्या तोंडावर मारू शकतो; परंतु शंभरातील एखादाही व्यवहार इथपर्यंत पोहचत नाही.

आपल्याकडे असलेले पुस्तक आपण दिले नाही, तर समोरचे काय समजतील अशा द्विधा मन:स्थितीत पुस्तक आपण उधार देतो. पुस्तकाच्या बाबतीत कुठल्याच टोलवाटोलवीला आता फसायचे नाही असे ठरवून जेव्हा एक गृहस्थ शेवटी म्हणाला, ‘नवीन खरेदी करून देतो.’ तेव्हा मात्र ‘ठीक आहे, केव्हा खरेदी करून देणार,’ असे मी विचारले. तर तो गृहस्थ म्हणाला, ‘‘मी विकत कशाला घ्यायचे? रोख पैसे देतो तुम्हीच विकत घ्या.’ त्याने अशी उलट चाल केली. मीही हटलो नाही. ‘ठीक आहे, मग द्या पैसे,’ असे सांगून मी पैशांसाठी हात पुढे केला. ‘तुम्ही हे पुस्तक मूर मार्केटमधून (चेन्नई येथील जुने/नवीन सर्व प्रकारच्या वस्तू वेगवेगळ्या दरात मिळणारे ठिकाण) ५० पैशांना विकत घेतले असे सांगितले होते ना? असे म्हणत त्या गृहस्थाने खिशातून पाकीट बाहेर काढले. पुस्तक त्यांना उधार देताना ‘चांगला ग्रंथ अत्यल्प दरात विकत घेऊ शकलो,’ हा आनंद या गृहस्थाला सांगितला होता. ही गोष्ट मी केव्हाच विसरूनही गेलो होतो. पण हा माणूस मात्र विसरला नव्हता! ‘परंतु आता पाहिजे म्हटले तरीही हे पुस्तक मूर मार्केटमध्ये मिळेल का? मिळाले तरी तेवढ्याच दराने मिळेल का? त्याची मूळ किंमत ५.०० रुपये आहे,’ (त्या काळात ती मोठी रक्कम होती) असे मी घुश्श्यातच म्हटले. ‘हे पन्नास पैसे तुमच्याकडे ठेवा. जेव्हा मिळेल तेव्हा पुस्तक विकत घ्या. उशीर लागला तरी त्यामुळे काय अडणार आहे?’ असे सांगून त्या गृहस्थाने आठ आणे माझ्या हातात जबरदस्तीने ठेवले. काय करणार? पराजय स्वीकारावाच लागला होता.

पुस्तके विकत घेण्यापेक्षा ती स्वत:कडे जपून ठेवणे हे खूप कठीण काम आहे. संतोष व आनंद लपून ठेवणे माणसाच्या स्वभावाच्या विरुद्ध आहे. चार लोकांबरोबर आपला आनंद वाटून घेतला तर तो वाढतो म्हणतात. त्यामुळेच चांगले पुस्तक वाचल्यानंतर मित्रांकडे, परिचित व्यक्तींकडे त्याची प्रशंसा केल्याशिवाय मी राहू शकत नाही. ती प्रशंसा ऐकून ‘ते पुस्तक तुमच्याकडे आहे का?’ असे समोरच्याने विचारले की खोटे न बोलता, गुन्हेगारासारखे हळू आवाजात ‘हो आहे’ असं म्हणतो. लगेच तो समोरचा ‘एकदा वाचून देतो’ असे नक्कीच म्हणतो. यातील पहिला भाग नक्कीच घडतो; परंतु

प्रचीतीविणें बोलणें व्यर्थ वायां । विवेकेंविणें सर्वही दंभ जाया ।।
बहु सज्जला नेटका साज केला । विचारेंविणें सर्वही व्यर्थ गेला ।।६।। (मराठी)

दुसरा भाग (परत देणे) मात्र संशयास्पद असते. ते जाणून जर आपण पुस्तक दिले नाही तर अमेरिकेतील प्रसिद्ध विनोदी लेखक मार्क ट्वेन यांच्या तावडीत कुणीतरी सापडल्यासारखे आपणही सापडू शकतो.

एकदा मार्क ट्वेनला एक पुस्तक पाहिजे होते. त्यांच्या शेजारच्या आसामीला त्या पुस्तकाचे नाव सांगून 'ते तुमच्या लायब्ररीत आहे का?' असे मार्क ट्वेनने विचारले. 'हो आहे, पाहिजे तर तुम्ही माझ्या लायब्ररीत बसून बिनधास्त वाचू शकता' असे ती आसामी म्हणाली. 'ओके, थँक्यू.' असे म्हणून तेवढ्यापुरते मार्क ट्वेन गप्प बसले. त्यानंतर काही दिवसांनी त्या शेजारच्या आसामीला लॉन मोअरची Lawn Mower (गवत कापणारे यंत्र) गरज भासली. 'तुमच्याजवळ लॉन मोअर आहे का?' असे त्यांनी मार्क ट्वेनला निरोप पाठवून विचारले. त्यावर 'हो, आहे. पाहिजे तर तुम्ही माझ्या लॉनवर बिनधास्त ते वापरू शकता.' असा उलटा निरोप मार्क ट्वेनने पाठवला.

कुणीही काहीही समजू द्या, दुसऱ्याची पर्वा न करता अजिबात पुस्तक उधार न देणारे काहीजण असतात. त्यांच्या बाबतीतला हा किस्सा ऐका-

एका सभ्यगृहस्थाने त्याच्या ओळखीच्या व्यक्तीकडून एक पुस्तक उधार मागितले. ती व्यक्ती 'सॉरी, नाही' म्हणाली. तो गृहस्थ दुःखी झाला; परंतु ते दुःख लपवण्यासाठी 'बरं ठीक आहे, ते बहुतेक तुमच्याकडे नसेल,' असे म्हटले. परंतु ती व्यक्ती 'अरे नाही ते पुस्तक माझ्याकडे आहे, परंतु तुला देणार नाही' असे ठामपणे म्हणाली. वर स्वतःच्या ग्रंथालयात नेत, 'बघा, वीस हजार पुस्तके कशी छान मांडलेली आहेत! यातील सगळी पुस्तकं 'वाचून देतो' असे सांगून मी दुसऱ्यांकडून घेतलेलीच आहेत. बरं का!!' म्हणाला!

मला पटकन 'नाही' म्हणता येत नाही म्हणून पुस्तके उधार देण्याशिवाय मला पर्याय नाही. पुस्तक गायब होणंही थांबणार नाही. ग्रंथचौर्य (चोरी करणे) विद्या मला आकलन होत नाही, त्यामुळे पुस्तके खरेदी करण्याशिवाय मला पर्याय नाही. दुसऱ्यांबद्दल मला माहिती नाही; परंतु माझ्याबाबतीत मात्र असंच घडत राहणार. आता, उद्या आणि नेहमी.

–स्वैर अनु. डॉ. तुलसी भारत
द्वारा – डॉ. भारत भूषण
सेक्रेटरी, यशदा, राजभवन कॉम्प्लेक्स,
बाणेर रस्ता, पुणे – ७

अनुवादातील गमतीजमती

रशियाचा सर्वाधिकारी जोसेफ स्टॅलिन हा अखेरच्या आजारात मृत्यूशी झगडत होता. टेलिप्रिंटरवर बातमी आली **'स्टॅलिन इज ऑन डेथ बेड.'** म्हणजे स्टॅलिन अत्यवस्थ आहे. पण **'सत्यवादी'**त कोणी उपसंपादक होता, त्याला डेथ बेडचा नक्की अर्थ माहीत नव्हता. कचेरीत साधा इंग्रजी–मराठी शब्दकोशही नव्हता. त्या उपसंपादकाने बराच वेळ विचार करून ठरवले की डेथ बेड म्हणजे तिरडी असेल. जर स्टॅलिन तिरडीवर असेल तर त्याचे निधन झालेले असणारच. म्हणून त्याने सिक्स लाईन बॅनरसह बातमी दिली: **'स्टॅलिनचे निधन. प्रेत तिरडीवर ठेवले.'** वस्तुस्थिती अशी होती की स्टॅलिनचे निधन झाले नव्हते. इतर दैनिकांत स्टॅलिन अत्यवस्थ असल्याची बातमी आणि **'सत्यवादी'**मध्ये निधन झाल्याची बातमी! ही बातमी वाचून कोल्हापूरचा कम्युनिस्ट पक्ष भडकला. त्या पक्षाने सत्यवादीवर मोर्चा नेला. संपादकांनी क्षमा मागितली अन् दुसऱ्या दिवशीच्या अंकात खुलासा केला. त्यानंतर दोन दिवसांनी स्टॅलिनचे खरोखरच निधन झाले.

– रमेश मंत्री ('प्रारंभ'मधून साभार)

। साहित्य अकादमी पुरस्कार - प्रसिद्ध लेखक गो. मा. पवार (२००७)- चरित्र विठ्ठल रामजी शिंदे (समाजसुधारक वि. रा. शिंदे यांचे जीवन चरित्र)।
प्रायोजक – श्री. अजित भिडे (डायरेक्टर, ॲसेंट हॉस्पिटॅलिटी प्रा. लि.), पुणे

गुजराथी

खुशालीचे पत्र

(मूळ लेखक – श्री. मोहन पटेल, स्वैर अनुवाद – केतकी जानी)

मुलाने लिहिलेल्या पत्रात सुरुवातीपासून शेवटपर्यंत सगळ्या चांगल्या बातम्या होत्या. तरीसुद्धा म्हातारा दु:खी झाला. ते म्हातारीने पाहिले. खूप वेळ कागद हातात घेऊन तो तसाच बसून राहिला. म्हणून तिने विचारले, ''कसला एवढा विचार करता आहात?''

''काही नाही...'' असे म्हणून म्हाताऱ्याने निश्चिंत व्हायचा प्रयत्न केला.

''मग काम सुरू करा ना!''

म्हातारा उभा राहिला. नेहमीच्या सवयीप्रमाणे पत्र जपून पेटीत ठेवण्यापूर्वी परत एकदा काळजीपूर्वक पाहायला लागला. कागदावरून पेन न उचलता अक्षर आणि शब्द एकमेकांमध्ये गुंतवून लिहिलेल्या पत्रातल्या त्या पाच ओळी एकसारख्या पाच पदरी साखळीसारख्या दिसत होत्या. पहिल्या दोन ओळीत नावांची जंत्री होती आणि पुढच्या तीन ओळींमध्ये खुशाली कळवलेली होती.

म्हाताऱ्याची नजर परत-परत त्या नावांच्या जंत्रीवर होती.

पत्नीला राहावले नाही. ओसरीवर येऊन ती म्हणाली, ''आज तुम्हाला काय झालंय? तुम्ही मगाशी वाचून दाखविल्याप्रमाणे खुशालीच कळवली आहे ना त्या पत्रात?''

''हो! खुशालीच कळवली आहे.''

''मग पुन्हा पुन्हा असं पत्र समोर धरून काय पाहताहात?''

पत्नीच्या मनाचे समाधान करण्यासाठी म्हाताऱ्याने उत्तर दिले, ''लेकराला खूप काम असेल असं वाटतं. निवांतपणे खुशालीसुद्धा लिहीत नाही.''

पत्नीच्या मनाचे समाधान झाले.

ती म्हणाली, ''त्याला तर श्वास घ्यायला देखील फुरसत नसते. तरीसुद्धा लक्षात ठेवून वेळेवर पत्र लिहितो ते काय कमी आहे का?''

परंतु म्हाताऱ्याचं मन शांत होईना. त्याची नजर फिरून-फिरून त्या नावांच्या जंत्रीकडे जात होती. नेहमीच्या सवयीनुसार मुलाने आठ-दहा महिन्यांपूर्वी मृत्यू पावलेल्या भावाचे नावही त्यात लिहिले होते. मुलाची आठवण होताच म्हाताऱ्याच्या मनात भावनांचा कल्लोळ उठला.

''नुसती आठवण आल्यामुळे माझी ही स्थिती होते आहे, तर लिहिताना त्याला काहीच वाटलं नसेल?''

मुलाने हे पत्र मनापासून न लिहिता यांत्रिकरीतीने केवळ आपलं लिहिण्यासाठी लिहिलं आहे, हे म्हाताऱ्याला आज समजून चुकले.

– स्वैर अनु. केतकी जानी

सी-८, राजहंस रेसिडेन्सी, डी. पी. रस्ता, बाणेर, पुणे – ७

श्री. मोहन पटेल यांचे गुजराथी लघुकथा इतिहासात महत्त्वाचे योगदान आहे. सिद्धहस्त लघुकथा लेखक म्हणून ते सर्वश्रुत आहेत. थेट भाषा व छोटे संवाद, भावनाप्रधानता ही त्यांच्या लिखाणाची खास वैशिष्ट्ये आहेत. लघुकथेबरोबरच कथा-कादंबरी इ. विविध साहित्यप्रकारातही त्यांनी उत्तम लेखन केले आहे.

विना प्रत्ययं भाषणं व्यर्थमेव, विवेकं विना दंभजातं वृथैव ।
मनोरञ्जिका मण्डिता वेषभूषा, विचारं विना व्यर्थ एव प्रयत्नः ।।६।। (संस्कृत)

website: sahitya-akademi.gov.in
email : sahityaakademisales@vsnl.net

साहित्य अकादमी

साहित्य संस्कृतीचे वर्धापन, वाचन अभिरुचीची जोपासना, साहित्य निर्मितीस प्रोत्साहन आणि सर्व भारतीय भाषांमध्ये सांस्कृतिक एकात्मता वृद्धिंगत करणे या हेतूने १२ मार्च १९५४ रोजी दिल्ली येथे 'साहित्य अकादमी' या संस्थेची भारत सरकारद्वारा स्थापना झाली. 'साहित्य अकादमी' ही स्वायत्त संस्था असून सरकारच्या सांस्कृतिक विभागाकडून संस्थेस अनुदान मिळते. रवींद्र भवन, दिल्ली येथे मुख्य कार्यालय असून, पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर अशा चार प्रादेशिक समित्या आहेत. संस्थेच्या सर्वसाधारण सभेचे ९७ सदस्य आहेत. या सदस्यांमध्ये २४ भारतीय भाषांमधील विद्वानांचा समावेश असतो. प्रत्येक भाषेसाठी एक विचार समिती असते. साहित्य अकादमीचे अध्यक्षपद पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. राधाकृष्णन, डॉ. झाकिर हुसेन यासारख्या दिग्गजांनी भूषविले आहे. विद्यमान अध्यक्ष श्री. सुनील गंगोपाध्याय (ज्येष्ठ बंगाली साहित्यिक) हे आहेत.

अकादमीतर्फे राष्ट्रीय आणि प्रादेशिक स्तरावर विविध परिषदा आणि संमेलनांचे आयोजन केले जाते. लेखकांना संशोधनार्थ विविध शिष्यवृत्त्या देण्यात येतात. प्रतिवर्षी किमान २५० ते ३०० पुस्तके आणि साहित्यपत्रिकांचे प्रकाशन केले जाते. विविध भाषांमधील साहित्य अनुवादित करून सर्व लोकांपर्यंत पोचवणे हा हेतू असतो. प्राचीन, मध्ययुगीन आणि अर्वाचीन भातीय साहित्याचे दर्शन घडविण्याऱ्या, १० खंडात प्रकाशित होणाऱ्या ज्ञानकोषाचे काम अकादमीतर्फे सुरू आहे. त्याचप्रमाणे 'भारतीय काव्यकोष' हा पण एक महत्त्वपूर्ण प्रकल्प आहे. संस्थेचे ग्रंथालय हा विविध भाषांमधील पुस्तकांचा खजिना आहे. ग्रंथालयातर्फे 'भारतीय साहित्य' ही इंग्रजीत तर 'समकालीन भारतीय साहित्य' ही हिंदी पत्रिका दर २ महिन्याने तर 'संस्कृत प्रतिभा' दर ६ महिन्याने प्रकाशित होते. याशिवाय लेखक भेट, संवाद, कथासंधि, कविसंधी, कविता उत्सव, युवा पुरस्कार, कार्यशाळा अश अनेक उपक्रमांचे आयोजन ग्रंथालय करते.

अकादमीतर्फे 'साहित्य अकादमी फेलोशिप' हा सर्वोच्च सन्मान मानला जातो. साहित्य क्षेत्रात आजीवन भरीव कामगिरी करणाऱ्या व्यक्तीस ही शिष्यवृत्ती दिली जाते. आजपर्यंत ६६ व्यक्तींना हा मान मिळाला आहे. याशिवाय 'आनंद कुमारस्वामी फेलोशिप' व 'प्रेमचंद फेलोशिप', भाषा सन्मान, अनुवाद सन्मान असे पुरस्कारही अकदमीतर्फे देण्यात येतात.

साहित्य अकादमी पुरस्कार - प्रत्येक भारतीय भाषेतील (एकूण २४ भाषा, इंग्रजीसह) उत्तम साहित्यनिर्मिती करणाऱ्या लेखक, कवीस प्रतिवर्षी रु. १ लाख व सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात येते. साहित्य क्षेत्रातील हा महत्त्वाचा पुरस्कार मानला जातो. मराठी भाषेतील प्रथम पुरस्कार इ. स. १९५५ यावर्षी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना 'वैदिक संस्कृतीचा विचार' यासाठी देण्यात आला होता. अगदी अलीकडे इ. स. २०११ चा पुरस्कार माणिक गोडघाटे (कवी ग्रेस) यांना 'वाऱ्याने हलते रान' या काव्यसंग्रहासाठी प्रदान करण्यात आला.

महाविद्यालयीन युवक-युवतींसाठी नेतृत्व संवर्धन प्रारंभिक शिबिर

प्रशासकीय, व्यवस्थापकीय, उद्योजक व स्वयंसेवी क्षेत्रांमध्ये नेतृत्व करू इच्छिणाऱ्या युवक-युवतींसाठी हे शिबिर!

शिबिर १२ वी ते एस. वाय.ची परीक्षा दिलेल्या युवक-युवतींसाठी आहे.

युवक-युवतींसाठी - १५ जून ते २५ जून २०१२ या कालावधीतील ५ दिवस

रोज सकाळी १० ते संध्याकाळी ७, शेवटचे दीड दिवस मुक्कामी सहल, माध्यम - इंग्रजी व मराठी संमिश्र

विविध कौशल्यांच्या कार्यशाळा, व्याख्याने, चर्चासत्रे व नेतृत्वाच्या संधींनी युक्त असलेले शिबिर

शुल्क - रु. २०००/- (+ रु. २५०/- सेवाकर)

बाहेरगावच्या सदस्यांसाठी निवासी व्यवस्था होईल. त्यासाठी रु. १०००/- जादा शुल्क.

प्रवेश मर्यादित. पूर्वनोंदणी आवश्यक.

अधिक तपशीलासाठी संपर्क - नितीश - ९६०४६१५४३६, मीरा - ९७६४७५६५२३

। वाचा- 'पोरवय' (बंगाली) - रवींद्रनाथ टागोर; अनु. पु. ल. देशपांडे, मौज प्रकाशन (रवींद्रनाथांच्या बालवयातील आठवणी) ।

प्रायोजक -स्टॅटफिल्ड इक्विपमेंट, पिरंगुट, पुणे

३ भाषांतर व अनुवाद क्षेत्रातील संधी

– अमित धर्म

Achtungbaby ! Das Auto ! Hola ! Asta la Vista ! वाटतात हे शब्द ओळखीचे? किंवा कधीतरी ऐकलेले? काय असेल यांचा अर्थ? केलाय कधी विचार? या सगळ्या शब्दांमध्ये एक समान धागा आहे - हे सर्व शब्द परकीय भाषेतून आले आहेत आणि जाहिरातींच्या जगात सर्रासपणे वापरले जात आहेत. ते लक्षात राहण्याचे अजून एक महत्त्वाचे कारण म्हणजे त्या शब्दांचा वेगळेपणा आणि त्यांद्वारे प्रभावीपणे साधलेला संवाद !

आता एखाद्याला वाटेल याचा आणि अनुवादाचा काय संबंध? पण नीट विचार करा - एका भाषेतील माहिती नेमकेपणाने आणि वाचकाला कळेल अशाप्रकारे दुसऱ्या भाषेत मांडणे हा तर अनुवादाचा आत्मा आहे !

तुम्ही आपल्या आजूबाजूला बघितले तर वैश्विकीकरणाचे (Globalisation) वाढणारे महत्त्व तुमच्या लक्षात येईल. असे एकही क्षेत्र नाही जेथे भाषा आणि भाषेच्या अनुवादाची, अनुवादकाची गरज नाही. तुम्हाला काही सोपी उदाहरणे देतो म्हणजे या भिन्न क्षेत्रातली अनुवादाची संधी तुमच्या लक्षात येईल.

तुमचा मोबाईल फोन घ्या, लॅपटॉप घ्या, आज ह्या उपकरणांमध्ये तुम्हाला वेगवेगळ्या भाषांमधील ग्राफिक **युजर इंटरफेस** उपलब्ध आहेत. भारतातील सॉफ्टवेअर

कंपन्या या विविध देशांमधील प्रोजेक्टस मिळविण्याचा प्रयत्न करतात. त्यावेळी त्यांना सर्वात आधी RFQ (Request for Quote) चा अभ्यास करावा लागतो. ही सर्व माहिती त्या त्या देशातील भाषेमध्ये असते. एकदा प्रोजेक्ट मिळाला आणि सॉफ्टवेअर तयार झाले

भाषांतर आणि अनुवाद

भाषांतर म्हणजे एका भाषेतील मजकूर दुसऱ्या भाषेत सांगणे अथवा लिहिणे. यासाठी मूळ भाषा आणि ज्या भाषेत मजकूर लिहायचा आहे ती भाषा ह्या दोन्हींचे उत्तम ज्ञान असणे गरजेचे असते. परिस्थितीतील फरकांमुळे साहित्याचे जसेच्या तसे भाषांतर न करता काही बदल करावे लागतात त्यास रूपांतर असे म्हणतात.

अनुवाद हा शब्द अनु + वाद् या शब्दांचा संधी आहे. ज्याचा मूळ अर्थ 'एखाद्याने सांगितलेले त्याच्या पाठोपाठ म्हणणे' असा आहे. एकाच भाषेत केलेले निरूपण हा देखील अनुवादाचाच एक प्रकार आहे. म्हणजे अनुवाद हा एकभाषिक सुद्धा असू शकतो. तर भाषांतर मात्र नेहमीच द्वैभाषिक असते. काळाच्या ओघात अनुवाद आणि भाषांतर हे समानार्थी शब्द म्हणून वापरले जाऊ लागले आहेत.

वरी चांगलें अंतरीं गोड नाहीं । तया मानवाचें जिणें व्यर्थ पाहीं ।।
वरी चांगले अंतरीं गोड आहे । तयालागिं कोणीतरी शोधिताहे ।। ७।। (मराठी)

की मग युजर इंटरफेस, एरर मेसेजेस, हेल्प फाईल्स या सर्व गोष्टींचे **लोकलायझेशन** करणे आवश्यक असते. काही दिवसांनी तुमचे आवडते गेम्ससुद्धा तुमच्या आवडत्या भाषेत उपलब्ध होतील, आणि हो आजकालच्या कृत्रिमपणे डब केलेल्या चित्रपटांप्रमाणे ते नसतील.

दुसरे उदाहरण घेऊया औद्योगिक क्षेत्राचे. भारतातील हे क्षेत्र आज वेगाने विस्तार करत आहे. शेकडो प्रकारची प्रॉडक्टस, त्यांची ऑपरेटिंग व मेंटेनन्स मॅन्युअल्स, माहिती पत्रके, कॅटलॉग्ज; एकापेक्षा जास्त भाषांमध्ये उपलब्ध करून देण्याचे प्रमाण आज वाढत आहे. औषधे आणि रुग्णोपयोगी उपकरणे बनवणाऱ्या कंपन्यासुद्धा यात मागे नाहीत. किंबहुना एक पाऊल पुढेच आहेत. औषधांचे पॅक, इन्सर्टस, खोक्यांवरील माहिती, नोंदणीची कागदपत्रे, रुग्णांची संमतीपत्रे, औषधांची चाचणी घेण्याच्या वेळी विचारण्याचे प्रश्न, संशोधनाची माहिती, पेटंट्स या सगळ्या गोष्टींचे भाषांतर करण्याची गरज असते आणि ते केलेही जाते. सहज म्हणून तुमच्या iPad / iPod मॅनयुअल अथवा 'कैलास जीवना'चे खोके उघडून पाहा - कळेल तुम्हाला!

जाहिरात क्षेत्रातील कंपन्या, विमा कंपन्या, वर्तमानपत्रे, नियतकालिके सुद्धा भाषांतर क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावतात. आज इंडिया टुडे, ओवरड्राईव्ह सारखी मासिकं २-३ भाषांमध्ये उपलब्ध आहेत. चित्रपट आणि दूरचित्रवाणी उद्योगांमध्येही सब-टाईटल्स लिहिणाऱ्या, पटकथेचे भाषांतर करणाऱ्या लोकांची नितांत गरज असते.

अजून एक उदाहरण देतो. राष्ट्रीय अनुवाद प्रकल्प (The National Translation Mission) या भारत सरकारच्या उपक्रमांतर्गत सुमारे ६७ क्षेत्रांमधील इंग्रजी मध्ये असलेली माहिती ही क्रमाक्रमाने सर्व भारतीय भाषांमध्ये उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

बहुभाषिक संकेत स्थळांच्या (Websites) प्रमाणातही लक्षणीय प्रगती होत आहे. आज गुगल, फेसबुक, याहू यांची संकेतस्थळे वेगवेगळ्या भारतीय भाषांमध्ये बघायला मिळतात.

सर्वात शेवटचे पण महत्त्वाचे उदाहरण म्हणजे अनुवादित पुस्तके! हे एक वेगळेच आणि अद्भुत जग आहे. विविध देशांमधली संस्कृती, कला, अभिजात साहित्य दुसऱ्या देशांमधील लोकांपर्यंत पोहोचवण्याची कामगिरी ही पुस्तके चोखपणे पार पाडतात. गंमत म्हणून इंटरनेटवर सर्च करा आणि पाहा हॅरी पॉटरची पुस्तके किती भाषांमध्ये अनुवादित झाली आहेत!

* **युजर इंटरफेस** हा माणूस आणि यंत्र यामध्ये संवाद साधणारा दुवा आहे. ह्या इंटरफेसचा वापर करून विविध प्रकारची यंत्रे चालवता व नियंत्रित करता येतात.
* RFQ (Request for Quotation) चा उद्देश हा विविध पुरवठाकारांना एखादे उत्पादन अथवा सेवा पुरवण्याच्या प्रक्रियेसाठी निविदा सादर करण्याकरिता निमंत्रित करणे हा असतो. ठऋद मध्ये पुढील माहिती नमूद केलेली असते. उत्पादनाची किंमत, गुणवत्तेचे निकष, प्रदानाच्या अटी, उत्पादन वा सेवेविषयीची तांत्रिक माहिती, उपक्रमातील महत्त्वाचे टप्पे, चुकांची दुरुस्ती करण्याबद्दलच्या अटी इत्यादी.
* **लोकलायझेशन** या प्रक्रियेमध्ये उत्पादन, वस्तू, संकेतस्थळे, सॉफ्टवेअर आणि विपणनाची पत्रके ह्या सर्व गोष्टी दुसऱ्या प्रदेश, देश, बाजारपेठ अथवा भौगोलिक परिस्थिती आणि लोकांच्या गरजांनुसार बदलल्या जातात यामध्ये भाषांतर, संकलन आणि संस्कृतीनुसार केलेले बदल अंतर्भूत असतात.

। वाचा - 'स्वामी ॲण्ड फ्रेंड्स' (कन्नड) -आर. के. नारायण; अनु. मधुकर धर्मापुरीकर
(स्वामीच्या नजरेतून मालगुडी)।
प्रायोजक – व्ही. व्ही. आर्किटेक्ट, प्रा. लि., पुणे

आता तुम्हाला या क्षेत्राच्या व्यापकतेबद्दल थोडासा अंदाज येऊ लागला असेल. आज भारतामध्ये, सुमारे तीन कोटी परदेशी कंपन्या आहेत. एक्सपोर्ट करणाऱ्या भारतीय कंपन्या तर अगणित आहेत. एक गोष्ट तर सरळ आहे - या सर्वांना आपले उत्पादन जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवून विकायचे आहे. ग्राहकांशी त्यांच्या भाषेत संवाद साधणे, हा या सर्व गोष्टींचा पाया असणार आहे.

आज बाजारात उपलब्ध असलेल्या कामाची अंदाजे किंमत ३६५० कोटी रुपये आहे. नजीकच्या भविष्यकाळात सुमारे सहा लाख नोकऱ्यांची गरज भासणार आहे. या क्षेत्रातील मागणी आणि पुरवठा यांच्या व्यस्त प्रमाणामुळे योग्य वेळी योग्य जागी असणाऱ्या अनुवादकांचा किती फायदा होऊ शकतो, हे गणित तुमचे तुम्हीच मांडून पाहा. एक साधारण अंदाज द्यायचा झाला तर चांगले अनुवादक दरमहा ४-५ आकडी रक्कम सहजपणे मिळवू शकतात.

पण आता या संधीचा लाभ आपल्याला कसा मिळेल हा प्रश्न तुम्हाला नक्की पडला असेल. ''कोण बनू शकतो व्यावसायिक भाषांतरकार?'' या प्रश्नाचे उत्तर 'दोन भाषा येणारा कोणीही' इतके सोपे नक्कीच नाही. एक लक्षात ठेवा; दोन भाषा आल्या म्हणजे आपण सर्वज्ञ झालो असे नसते. स्रोत भाषा आणि आपण ज्या भाषेत अनुवाद करतो या दोन्ही भाषांवर आपले तितकेच प्रभुत्व लागते.

वरील उदाहरणांवरून आपल्याला लक्षात येईल की भाषांतर क्षेत्रामध्ये "Domain Knowledge" असणे हे फार महत्त्वाचे आहे. जर एखादी व्यक्ती डॉक्टर, इंजिनियर, संगणकतज्ज्ञ असेल आणि त्या व्यक्तीला एकापेक्षा जास्त भाषासुद्धा येत असेल तर त्याने केलेल्या भाषांतराची गुणवत्ता नक्कीच चांगली असते. समजून उमजून केलेली गोष्ट आणि यांत्रिकपणे केलेली गोष्ट यात कसा फरक असतो हे आपल्यापैकी बहुतेकांनी 'थ्री इडिअट्स' मधील 'चतुरच्या' भाषणामधून अनुभवले असेलच!

तेव्हा मी भाषा शिकतो आणि लगेच भाषांतरकार होतो असा सरळसोट विचार करू नका. आपल्या आवडीच्या विद्याशाखेत (Engineering, Medicine, Law, Science, Arts, Commerce) शिकत असतानाच भाषा पण शिका. भाषांतर करताना फक्त भाषेचे उत्तम ज्ञान किंवा फक्त उत्तम Domain Knowledge असून चालत नाही, तर या दोन्ही गोष्टींचा संगम असणे गरजेचे असते. भाषांतर क्षेत्रातील संधींचा विचार केला, तर हे "Dual Qualification" असलेल्या लोकांना आकाशही ठेंगणे आहे.

सरतेशेवटी एक कळीचा आणि महत्त्वाचा मुद्दा सांगतो. जर तुम्हाला तुमची मातृभाषा लिहिता वाचता येत नसेल तर ती कला शक्य तितक्या लवकर अवगत करा. तुमचे मातृभाषेवरील प्रभुत्व हे कमीत कमी आजी आजोबांच्या पिढीइतके असणे श्रेयस्कर आहे. आपल्या मातृभाषेबरोबरच आणखी एखादी भारतीय भाषा नक्की शिका. जर तुम्हाला हिंदी किंवा मराठी येत असेल तर दक्षिण भारतीय भाषांचा अपवाद वगळता एक-दोन भाषा तरी चटकन आत्मसात करता येतील. कुठल्याही भारतीय भाषेची लिपी कळायला जास्तीत जास्त एक आठवडा लागतो.

कुठलीही भाषा शिकताना जिद्द, चिकाटी सोडू नका. त्या भाषेतील वर्तमानपत्रे वाचा व रेडिओ वरील कार्यक्रम भरपूर ऐका म्हणजे तुमची शब्दसंपत्ती वाढेल. आपण भाषा का शिकत आहोत हे ध्येय सतत डोळ्यांसमोर ठेवा. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे चौकसपणा, कुतूहल आणि ज्ञान मिळविण्याची भूक सतत जागृत ठेवा. आपण मिळविलेली माहिती कुठे वापरता येईल, याचा विचार करा. नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करा. भाषांतर क्षेत्रातील अनुभवी व्यक्तींबरोबर चर्चा करून आपल्याला काय आणि कसे साध्य करता येईल याचा विचार करा. तुम्ही जितक्या पद्धतशीरपणे या क्षेत्रात पडाल तितके जास्ती यश तुम्हाला मिळेल हे नक्की.

जाता जाता विचारतो, ''कधी येताय मग आमच्या या अनुवादाच्या विश्वाबद्दल आणखी जाणून घ्यायला?''

अमित धर्म
-संचालक, बीट्स प्रा. लि.
आपटे रस्ता, डेक्कन जिमखाना पुणे ४

वरं बाह्यमन्तस्तु न स्वादु किंचित्, वृथा जीवनं तस्य दुर्मानवस्य ।
वरं बाह्यमन्तर्हि माधुर्यमेव, नरं तं च केचित् सदा मार्गयेयुः ॥ ७॥(संस्कृत)

संवादाची सर्कस

– श्रीनिवास शारंगपाणी

''नी हाव !'' समोरून आवाज आला. मी हातातील वस्तू निरखून पाहण्यात मग्न होतो. सवयीप्रमाणे मी उत्तरादाखल म्हणालो, ''नी हाव !'' पण तेवढ्यात लक्षात आलं की समोरच्याला बाजूनं जायला जागा हवी असावी; म्हणून मी थोडा बाजूला सरकलो.

त्यावर समोरची व्यक्ती उद्‌गारली, ''शे शे !'' मी सवयीनुसार म्हणालो, ''बुकाची !'' (आभार कसले?)

ती व्यक्ती म्हणाली, ''शिन नियान कुआय ले !'' आता मात्र माझी दांडी उडाली. मित्रहो, हा काय प्रकार आहे याचा तुम्हाला नक्कीच संभ्रम पडला असेल. मी सांगतो काय प्रकार आहे तो.

मी काही कामानिमित्त चीनला गेलो होतो. भारतीय इंजिनियर आणि चिनी कर्मचारी यांच्याबरोबर मला काम करायचं होतं. बहुतांश चिनी लोकांना चिनी भाषेशिवाय दुसरी कुठलीच भाषा येत नसल्यानं काही वेळा संवादामध्ये समस्या निर्माण होत. पण म्हणतात ना प्रेमाची भाषा सगळ्यांनाच कळते ! त्यामुळं बहुतेक लोक समजून उमजून घ्यायचे; पण तरी देखील कधी कधी खूप तारांबळ उडायची. त्यात भर म्हणून काय की मी मिशा आणि हनुवटीपासची दाढी चिनी पद्धतीची वाटेल अशी वाढवलेली होती.

आणि म्हणूनच समोरच्या व्यक्तीनं मी चिनी आहे असं समजून माझ्याशी संवाद साधायचा प्रयत्न केला होता !

वेळ मारून न्यायची म्हणून मी नुसतंच हसलो आणि 'शे शे !' (आभारी आहे) असं उत्तरलो.

पण माझा कनिष्ठ सहकारी कुजबुजला, ''सर, तुम्ही देखील 'शिन नियान कुआय ले' म्हणालात तरी चालेल.''

''असं? पण म्हणजे काय?'' मी हलक्या आवाजात विचारलं.

''सर, 'शिन नियान कुआय ले' म्हणजे नवीन वर्षाच्या शुभेच्छा !''

''ओ हो. असं आहे होय?'' असं म्हणून मी त्या गृहस्थाकडे वळून 'शिन नियान कुआय ले' असं म्हटलं. त्याच्या चेहऱ्यावर समाधान दिसलं आणि माझ्या सुदैवानं आमचं संभाषण तिथंच थांबलं. माझ्या सहकाऱ्याचा चिनी कामगारांशी जास्त संबंध यायचा. म्हणून त्याला हे वाक्य माहीत होतं. मी देखील तेव्हापासून जास्तीत जास्त सामान्य चिनी माणसांशी संवाद साधण्याचा प्रयत्न करू लागलो.

पण एकदा गंमतच झाली.

। वाचा - 'ऋतुशैशव' (इंग्रजी) - गौरी रामनारायण; अनु. उल्का राऊत, रोहन प्रकाशन (सहा मान्यवरांच्या बालपणाची सफर) ।

प्रायोजक – श्री. चिंतामणी बने, डोंबिवली

आमच्या एका सहकाऱ्याचा वाढदिवस होता. रोज दुपारचं जेवण आम्ही जिथं काम करीत होतो तिथून जवळच असलेल्या एका हॉटेलमध्ये घेत होतो. त्या हॉटेलची मालकीण समंजस आणि प्रेमळ होती. त्या हॉटेलला आम्ही 'मावशी'चं हॉटेल किंवा 'मावशी'चा ढाबा म्हणायचो. मी इतर आठ-दहा सहकाऱ्यांना पुढं मावशीच्या हॉटेलकडे जायला सांगितलं आणि एका सहकाऱ्याला घेऊन मी वाढदिवसाचा केक आणण्यासाठी आजूबाजूच्या दुकानांत चौकशी करण्यासाठी पुढं गेलो. आम्हाला वाटलं होतं की तिथल्या कुठल्यातरी दुकानात केक मिळेल कारण त्या भागात वेगवेगळ्या प्रकारची बरीच दुकानं होती.

पण आमचा लवकरच भ्रमनिरास झाला. आम्हाला ब्रेडसाठी चिनी शब्द 'मियान्बाव' माहीत होता; पण केकसाठी शब्द माहीत नसल्यानं दुकानदार वेगवेगळ्या प्रकारचे पाव दाखवू लागले; पण आम्हाला केक काही कुठं मिळेना आणि आम्हालाही 'केक हवा आहे,' असं दुकानदारांना सांगता येईना!

माझ्या सहकाऱ्यानं एक क्लृप्ती योजली. त्यानं ''Happy birth-day to you'' असं गाणं गाऊन दाखविलं आणि त्याबरोबर नाचूनही दाखवलं. दुकानदारांना वाटलं की आम्हाला या गाण्याची सीडी पाहिजे. मी यापुढचं पाऊल टाकलं आणि केकचं मेणबत्त्यांसह चित्र काढून त्यावर ''Happy Birth-day'' असं लिहून कागद दुकानदारासमोर धरला.

दुकानदार आत गेला आणि काही मेणबत्त्या घेऊन आला!

मी कपाळावर हात मारून घेतला आणि माझे केस उपटू लागलो. त्यासरशी तो दुकानदार कसनुसं हसू लागला. बारीक असलेले त्याचे डोळे हसताना आणखी बारीक झाले आणि मी माझी चीड विसरून त्याच्या हसण्यात सामील झालो.

आणखी अनेक दुकानं पालथी घातली पण केक काही मिळेना. हॉटेलमध्ये इतर सहकारी वाट पाहत असतील याचीही आम्हाला जाणीव होऊ लागली. अखेर शेवटचं एक दुकान पाहायचं आणि केक नाही मिळाल्यास चॉकलेटस् वगैरे घेऊन जायचं असं ठरलं.

ते दुकान फळांचं होतं. अर्थातच तिथं आम्हाला केक मिळाला नाही. निराश होऊन माझा सहकारी त्या बर्फाच्छादित रस्त्यानं कडाक्याच्या थंडीपासून कसंबसं स्वत:चं संरक्षण करीत 'मावशी'च्या हॉटेलच्या दिशेनं चालूही लागला. मी चिनी माणसासदृश्य दिसत होतो; म्हणून म्हणा किंवा माझी कणव आली असेल म्हणून म्हणा तो फळविक्री करणारा दुकानदार दुकानाबाहेर आला आणि मला बोलावून समोरील कोपऱ्याच्या दिशेनं अंगुलिनिर्देश करू लागला.

''शे, शे.'' मी उद्गारलो. दुकानदार हसला. पुढं जाऊन मी सहकाऱ्याला हाक मारली आणि कोपऱ्यावरच्या दुकानात काय आहे ते पाहू आणि केक न मिळाल्यास 'मावशी'च्या हॉटेलकडे जाऊ असं त्याला सांगितलं.

''आम्ही कोपऱ्यावरच्या दुकानात गेलो आणि अहो आश्चर्यम्!'' आमची तपश्चर्या फळाला आली. ते दुकान म्हणजे एक बेकरीच होती आणि तिथं शोकेसमध्ये केकचे विविध नमुने ठेवलेले होते. अर्थात ते नमुने म्हणजे खरे केक नव्हते. आम्ही खाणाखुणांनी आम्हाला पसंत असलेला केक दाखवला. दुकानदारानं स्मितहास्य करीत २५ युआन (साधारणपणे १७५-२०० रुपये) पडतील, असं कॅल्क्युलेटरवर आकडा दाखवून सांगितलं. चीनमध्ये किंमत अशाच रीतीनं दाखवितात. चीनमध्ये सर्व जिनसा सर्वसाधारणपणे कमी किंमतीला मिळत असल्यानं ही किंमतही रास्त वाटली आणि आम्ही मान डोलावली.

आम्हाला वाटलं की केक तयार असेल पण आमचा होकार कळल्यावर त्या तरुण बेकरीवाल्यानं केक तयार करायला घेतला! आमचं सुदैव असं की त्यानं तो अतिशय वेगानं बनविला. पण त्यावर तो अतिशय कलाकुसरीनं आइसिंग बनवू लागला. एकीकडे आम्हाला उशीर होत होता; पण त्याची कला आणि

सदा अंतरीं गोड तें सांडवेना । कदा अंतरी वोखटें तें खपेना ।।
म्हणोनी बरा गूण आधीं धरावा । महा घोर संसार हा नीरसावा ।।८।। (मराठी)

ज्या वेगानं तो ते सगळं करत होता ते पाहता आम्हाला काही बोलता येईना. आम्हाला खरं तर खूपच उशीर होत होता. सहकारी मंडळी जेवायची थांबली असतील असंही वाटत होतं.

अखेर बेकरीवाल्यानं अतिशय सुरेख असं त्याचं नक्षीकाम संपवलं. आम्ही सुवाच्च अक्षरात लिहून दिलेला इंग्रजी मजकूरही त्यानं बरोबर लिहिला पण नको तिथं शब्द तोडले. ''Happy birthday'' असं सलग न लिहिता;

Happy birt
hday

असं तोडून लिहिलं! पण परिस्थिती पाहू जाता ते सगळं माफ होतं. शिवाय आम्ही करूही काय शकत होतो? पण वेलबुट्टी, गुलाबाची फुलं हे त्यानं सुरेख बनवलं होतं. मधून-मधून एक वयस्कर स्त्री (बहुदा त्याची आई असावी) त्याला मदत करीत होती. एका प्लॅस्टिकच्या रेखीव तुकड्यावर त्यानं तो केक व्यवस्थित ठेवला. त्यावर पारदर्शक असं प्लॅस्टिकचंच संरक्षक कवच बसवलं आणि लाल-सोनेरी रेशमी रिबननं बांधून त्यावर आकर्षक गाठही मारली. त्याशिवाय Happy Boy च्या डोक्यावर ठेवण्यासाठी एक रंगीत पुठ्ठ्याचा मुकुटही दिला!

बर्फ-वाऱ्यापासून आपल्याला आणि केकलाही वाचवीत आम्ही बऱ्याच वेळानं 'मावशी'च्या हॉटेलमध्ये आलो. सहकारी मंडळींनी कंटाळून जेवून घेतलं होतं; पण आम्ही कष्टानं आणलेला केक पाहून आणि सहकाऱ्याच्या वाढदिवसाची आठवण ठेवलेली पाहून त्यांना खूप आनंद झाला. मग नाच-गाण्यात केक कापला गेला. सर्वांना दिला गेला. अगदी मावशी आणि तिच्या सहकारी स्त्रिया आणि तिच्या नवऱ्याला सुद्धा!

कसं का होईना आम्ही आमच्या चिनी भाषेच्या अज्ञानावर मात केली होती. त्यामुळं आम्ही आनंदानं नाचू लागलो. मग मी आणि माझा सहकारी जेवायला बसलो. कारण आम्ही दोघेच जेवायचे राहिलो होतो. मला थोडी साखर हवी होती. सुदैवानं मला साखरेसाठी चिनी शब्द माहीत होता- 'टँग'! मी मावशीला खुणावून म्हटलं, ''टँग!''

थोड्या वेळानं मावशी अवतरली एक सफरचंद घेऊन! आणि माझ्या डोक्यात प्रकाश पडला. टँग शब्दाचे २६ वेगवेगळे अर्थ चिनी भाषेत आहेत; साखर जसा आहे तसा सफरचंदही आहे. मावशीला वाटलं सर्वांची जेवणं झाली आहेत याला मुखशुद्धीसाठी सफरचंद हवं असेल!

म्हणजे आमचा विजयी आनंद फार काळ टिकला नाही. भाषेला आत्मसात करणं अत्यावश्यक होतं.

रूमवर जाऊन मी इंटरनेटवरून 'टँग' शब्दाचे सगळे २६ अर्थ पाहिले. एक अर्थ 'नाकतोडा' असाही होता! बरं झालं मावशीनं हा अर्थ घेतला नाही ते !!

कारण चीनमध्ये काही ठिकाणी नाकतोडेही खातात! आणि मी चिनी माणसासारखा दिसत होतो ना!!

– **श्रीनिवास शारंगपाणी**
७१४/१, नारायण पेठ,
लक्ष्मी रस्ता, पुणे 411030
shrisharang@hotmail.com

। वाचा - 'डॅडी लाँग लेग्ज' (इंग्रजी) - जीन वेबस्टर; अनु. सरोज देशपांडे, राजहंस प्रकाशन (एका अनाथ मुलीचे वाढत्या वयातील बदलणारे भावविश्व)।

इंग्रजी

सर्वगुणसंपन्न मोलकरणीचे रहस्य

(मूळ लेखक – अगाथा ख्रिस्ती, स्वैर अनुवाद – धनवंती हर्डीकर)

''बाईसाहेब, तुमच्याशी जरा बोलायचं होतं हो. बोलू का जरा?'' एडना म्हणाली.

''मग आता बोलतेच आहेस की!'' मार्पलबाईंना मनातल्या मनात हसूच आलं. पण त्यांनी एडनाला जवळ बोलवून घेतलं आणि म्हणाल्या, ''हं, सांग आता काय सांगायचंय ते!''

''बाई, ती माझी लांबची बहीण आहे ना, ग्लॅडिस, तिचं बघा ना हे कसं झाले ते!''

''काय झालं? घरातून निघून-बिघून गेली की काय?'

''नाही, नाही; तसं काही नाही. पण ती तिथं कामावर होती ना, बंगल्यावर स्किनरबाईंकडे, ते काम सुटलं हो तिचं.''

''ती ग्लॅडिस तर सारखीच कामं सोडत असते, हो ना?'

''हो ना, पण कामं ती स्वत:हून सोडते. तिला कोणी काढून नव्हतं टाकलं आजपर्यंत. कामाला अगदी चोख आहे ती....''

''आणि थोडी आगाऊ...'' मार्पलबाईंच्या मनात आलं. सारखी हसणारी, खूप बडबड करणारी, प्रसंगी तिखट उत्तर देणारी ग्लॅडिस त्यांच्या डोळ्यासमोर आली.

''अगदी मनाला लागलं हो तिच्या. पार हाय खाल्ली तिनं, त्या स्किनरबाई अशा काही बघत होत्या ना तिच्याकडे!''

''कशा बघत होत्या?''

''अगदी धक्काच बसलाय आमच्या ग्लॅडिसला. काय झालं, स्किनरबाईंचं ब्रूच सापडत नव्हतं - काय त्याचा गोंधळ आणि शोधाशोध - सगळं घर खालीवर केलं. ग्लॅडिसनी देखील खूप मदत केली शोधायला. स्किनरबाई म्हणायला लागल्या, 'आता पोलिसातच तक्रार देते!' शेवटी सापडला एकदाचा तो ब्रूच. टेबलाच्या खणातच होता, मागच्या बाजूला...

आणि दुसऱ्या दिवशी काय झालं, एक प्लेट फुटली ग्लॅडिसच्या हातून. झालं! त्या लॅव्हिनियाबाईंनी एक महिन्याची नोटीसच दिली ग्लॅडिसला. म्हणजे प्लेटचं आपलं निमित्त. त्यांना संशय येतोय ग्लॅडिसचा - पोलिसांचं नाव काढल्यावर घाबरली आणि चोरलेला ब्रूच परत ठेवून दिला असं वाटतंय त्यांना. पण आमची ग्लॅडिस तशी नाही हो बाई. फुटक्या कवडीलासुद्धा हात लावायची नाही कुणाच्या. आता हे ब्रूच प्रकरण सगळीकडे पसरलं तर उगाच बदनामी होईल तिची. अगदी हाय खाल्ली हो तिने.''

''बरं, बरं, मी दुपारी जाणार आहे त्या बाजूला. बोलते स्किनरबाईंशी.'' मिस मार्पल म्हणाल्या.

***

स्किनरबाईंच्या घरी त्या आणि त्यांची आजारी बहीण अशा दोघीच

सदा स्वादुरन्त: स हीयेत नैव, कदा पापमन्तर्विषह्येत नैव ।
अत: सद्‌गुणान् आचर त्वं प्रयत्नै:, महाघोरसंसारमेनं निरस्य ॥८॥ (संस्कृत)

‘मिस मार्पल’ या म्हातारबाई प्रसिद्ध रहस्य कथालेखिका **अगाथा ख्रिस्ती** (१५ सप्टेंबर १८९० - १२ जानेवारी १९७६) यांच्या कल्पनेतून साकारल्या. इंग्लंडमधील ‘सेंट मेरी मीड’ या लहानशा गावात त्या राहात. विणकाम, बागकाम अशा गोष्टीत सतत मग्न असणाऱ्या, सात्विक चेहऱ्याच्या या प्रेमळ आजीबाईंचा कधी गुन्हेगारांशी संबंध आला असेल, हे कुणाला सांगूनही खरे वाटणार नाही. पण माणसाचं वागणं, बोलणं यावर बारीक नजर ठेवून आणि आपली कुशाग्र बुद्धी वापरून मार्पलबाईंनी कितीतरी अट्टल गुन्हेगार आणि खुनीसद्धा पकडून दिले. अगाथा ख्रिस्ती यांच्या गाजलेल्या ‘मिस मार्पल्स फायनल केसेस’ या पुस्तकातल्या ‘द केस ऑफ द परफेक्ट मेड’ ची ही गोष्ट...

राहत असत. त्यांचं घर तसं जरा आडबाजूला होतं. एका जुन्या बंगल्याचे चार भाग करून घरमालकाने ते चार बिऱ्हाडकरूंना भाड्याने दिले होते. त्यातल्याच एका जागेत लॅव्हिनिया आणि एमिली स्किनर या दोघी बहिणी काही महिन्यांपूर्वी राहायला आल्या होत्या. एमिलीबाई खरं तर धाकट्या. पण त्या सारख्या आजारी, निजूनच असत. त्यांच्यासाठी हवापालट म्हणूनच स्किनर बहिणी इथे राहायला आल्या होत्या. मात्र एमिलीबाईंचे सगळे आजार मानसिक आहेत, असं ‘सेंट मेरी मीड’ गावातल्या लोकांचं प्रामाणिक मत होतं.

बंगल्यातली बाकीची बिऱ्हाडं बरेच दिवसांपासून होती. सगळी मंडळी तशी सधन. कामाला राहते नोकरचाकर असणारी. एकमेकांशी जरा फटकूनच राहणारी. प्रत्येकाचे रस्ते स्वतंत्र. मार्पलबाईंची मात्र सगळ्यांशीच ओळख होती.

मिस मार्पल लॅव्हिनियाबाईंच्या घरी गेल्या, तेव्हा त्यांचं चांगलं स्वागत झालं. लॅव्हिनिया बाईंचं वय साधारण पन्नासच्या आसपास असावं. उंच, जराशी कृश देहयष्टी. मार्पलबाईंना त्या बैठकीच्या खोलीत घेऊन गेल्या.

‘‘या, या, या. आज जरा बरं नाही एमिलीला. निजूनच आहे. नाहीतर ती पण आली असती आपल्याबरोबर गप्पा मारायला. बसा ना.’’

गप्पांचा विषय हळूहळू मोलकरणींकडे वळला.

‘‘तुमच्या ग्लॅडिसला तुम्ही काढून टाकलं म्हणे.’’

‘‘होय. फार तोडफोड करायची. ते कसं चालेल?’’

‘‘ते खरं, पण आजकाल मोलकरणी मिळणंच किती अवघड झालंय!’’

‘‘हो ना, आमच्या शेजारीच बघा ना, एक मोलकरीण टिकत नाही कोणाकडे ! आणि दुसरी मिळत नाही लवकर!’’

‘‘ग्लॅडिसलाच ठेवून घ्या ना परत. तशी चांगली आहे ती मुलगी. तिच्या घरातल्या सगळ्यांना ओळखते मी. चांगली आहेत ती माणसं आणि अगदी प्रामाणिक!’’

‘‘हं. असं तुम्ही म्हणताय खरं, पण तिला काढायला तशीच काही कारणं घडली.’’

‘‘हो. समजलं मला. काय, ब्रूच सापडत नव्हता ना?’’

‘‘अगंबाई, तुम्हाला कसं कळलं? ती पोरगीच बोलली असेल. अहो माझी खात्री आहे, तिनंच लांबवला तो. आणि पोलिसांचं नाव ऐकल्यावर ठेवून दिला परत. पण आता प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिल्याशिवाय आपण तरी स्पष्ट कसं बोलणार? ते राहू दे. चला, आपणच जाऊ थोडा वेळ आत एमिलीजवळ बसायला.’’

एमिलीबाईंची खोली तशी अंधारीच होती. ओदकोलोन, कापूर, बिस्किटं असा संमिश्र वास खोलीत भरून राहिला होता. एमिलीबाईंचा तसा अवतारच दिसत होता - विस्कटलेल्या केसांचं टोपलं, क्षीण आवाज आणि मलूल चेहरा !

‘‘नको वाटतं हे आजारपण. किती आपला भार टाकायचा दुसऱ्यावर? तरी लॅवीताई इतकं करते ना माझं. सारखं तिला काम सांगायलाही नको वाटतं. पण बघ ना लॅवीताई, ही शेकायची पिशवी आहे ना, ती कमी भरली की लगेच गार होते. आणि जास्त भरली, ना की अगदी सोसत नाही मला ! ती

। वाचा - ‘चौघीजणी’ (इंग्रजी) - लुईसा मे अल्कॉट; अनु. शांता शेळके, मेहता प्रकाशन
(भिन्न स्वभावाच्या चौघी बहिणी एकत्र वाढताना...)।

अगदी बरोबर भरलेली नसेल ना...''

''बघू, बघू,'' लॅविनियाबाई म्हणाल्या. ''थोडं कमी करून आणते पाणी त्यातलं.''

''नवीनच भर ना त्यापेक्षा'', एमिलीबाई म्हणाल्या. ''आणि टोस्ट आहेत का गं घरात? नसले तर राहू दे हो, मी आपली घोटभर चहा घेईन लिंबाचा. लिंबू नाही का घरात? बरं राहू दे. नाही घेतला एक दिवस चहा तर काय होतंय! कालच्या चहातलं दूध थोड फुटलं होतं ना, त्यामुळे दुधाचा चहा अगदी नको झालाय मला! ऑयस्टर खावे म्हणतात आजारी माणसांनी, पण आता इतक्या उशिरा कुठे बाहेर जातेस लॅवीताई, उद्यापर्यंत जरा लंघनच करते!...''

''एकदा इथले डॉक्टर हेडॉक आहेत त्यांना दाखवून घ्या तुमची तब्येत.'' मार्पलबाईंनी सल्ला दिला. ''फार अनुभवी आहेत ते!''

''काय सांगू तुम्हांला!'' एमिलीबाईंनी उसासा टाकला, ''कमी का डॉक्टर झाले आजपर्यंत? पण उंहूं. निदानच होत नाही कुणाला नीट. आता लंडनच्या स्पेशालिस्ट डॉक्टरचं औषध चालू आहे. पाहू काय उपयोग होतो का!''

***

मार्पलबाईंनी एडनाला सांगून टाकलं, की स्किनरबाईंना ग्लॅडिसबद्दल सांगून काही उपयोग झाला नाही. ग्लॅडिसची भीती मात्र खरी ठरली. ती ब्रूचची हकीकत शेजारीपाजारी सगळीकडे पसरली आणि तिला काम मिळेना. तिच्यावरचा खोटा आळ दूर करता येईना म्हणून मार्पलबाईदेखील अस्वस्थ झाल्या. तशातच एक नवीन बातमी आली. लॅव्हिनियाबाईंनी शहरातल्या एका संस्थेत नाव नोंदवून त्यांच्यामार्फत एक नवीन मोलकरीण मिळवली. तिचं नाव मेरी हिगिन्स. खूप चांगली चांगली शिफारसपत्रं होती तिच्याकडे. वागायला, बोलायला अगदी नम्र, हुशार. टापटीप राहणी, आणि न सांगता भराभर कामं उरकून टाकायची सवय. लॅव्हिनियाबाईंनी सगळ्यांना सांगितलं, ''इतकी चांगली आहे, ना आमची मेरी. ती नसताना काय माझे हाल होत होते माझं मला माहीत! ग्लॅडिसपेक्षा पगारही कमी ठरवला आहे, पण काम मात्र खूप चांगलं करते. स्वयंपाकपाणी, स्वच्छता सगळं कसं अगदी व्यवस्थित. कुठे दोष काढायला जागाच नाही!''

काही दिवसांनंतर ही सर्वगुणसंपन्न मोलकरीण मार्पलबाईंनी देखील स्वत:च्या डोळ्यांनी पाहिली. मिस मार्पल लॅव्हिनियाबाईंच्या घरी गेल्या असता तिनंच मिस मार्पलना दार उघडलं. तिचं वय साधारण चाळिशीच्या आसपास असेल. गोरा हसतमुख चेहरा, निरोगी आणि प्रसन्न व्यक्तिमत्त्व. मार्पलबाईंना दार उघडेपर्यंत एमिलीबाईंच्या खोलीतून तिला हाक आलीच. पण ती अगदी हसतमुखानं आणि लगबगीनं आत गेली आणि लॅव्हिनियाबाई बाहेर आल्या.

''फार गुणी आहे ही मेरी. नावं ठेवायला मुळी जागाच नाही. खरं वाटणार नाही एखाद्याला..''

भला रे भला बोलती तें करावें । बहुतां जनांच्या मुखें यश घ्यावें ।।
पुढें सेवटीं सर्व सांडूनि जावें । मरावें परी कीर्तिरूपें उरावे ।। ९।। (मराठी)

‘‘तेच म्हणते मी!’’ मिस मार्पल म्हणाल्या. ‘‘सांभाळून जरा. केव्हा काय घडेल, सांगता येत नाही!’’

‘‘मी चांगली काळजी घेते ना तिची,’’ लॅविनियाबाई उत्तरल्या. ‘‘आमच्या कामावर ती टिकून राहावी, असंच बघणार मी आता!’’

‘‘तसं नव्हतं म्हणायचं मला. आता एडना काय, ग्लॅडिस काय, या मुली आमच्या डोळ्यांसमोर लहानाच्या मोठ्या झाल्या. एखाद्या वेळी चूक झाली, तरी शिकतात हळूहळू...’’

बोलत बोलत मिस मार्पल आणि लॅव्हिनियाबाई आत गेल्या. त्यांच्या गप्पा चालू असताना एमिलीबाईंच्या खोलीतून त्यांची काही ना काही फर्मानं ऐकू येत होती, पण त्या सगळ्या गोष्टी मेरी नीट पार पाडत असावी; कारण लॅव्हिनियाबाई मार्पलबाईंशी निवांत बोलत बसल्या होत्या.

मिस मार्पल घरी जायला निघाल्या, तेव्हा मेरी बाहेर आली. ‘‘तुम्हाला एमिलीताई आत बोलवतायत जरा,’’ असं तिनं लॅव्हिनियाबाईंना सांगितलं. मिस मार्पलना मेरीनं दार उघडून दिलं आणि कोपऱ्यातील त्यांची छत्री उचलून त्यांच्या हातात दिली. पण मार्पलबाईंच्या हातून नेमकी ती छत्री पडली. ती उचलता उचलता त्यांचा बटवा पडला आणि आतलं सगळं सामान बाहेर आलं - हातरुमाल, छोटीशी वही, पाच-सात नाणी, पैशाचं पाकीट आणि एक भली-

थोरली पेपरमिंटची गोळी! मेरीनं तत्परतेने बटवा मार्पलबाईंच्या हातात दिला आणि सामान गोळा करायला सुरुवात केली.

‘‘ही पेपरमिंटची गोळी म्हणजे क्लीमेंटबाईंच्या छोकऱ्याचं काम दिसतंय! माझा बटवा घेतला खेळायला, तेव्हा गोळ्या चघळत होता. बाई, बाई, सगळंच चिकट झालय की!’’

‘‘ही गोळी टाकून देऊ का केरात?’’ मेरी म्हणाली.

‘‘टाक. टाक. थँक्यू सो मच. आणि हे काय? हा छोटा आरसाही पडला वाटतं, नशीब फुटला बिटला नाही ते!’’

मेरी हिगिन्सने उचलून दिलेला आरसा काळजीपूर्वक बटव्यात टाकून मिस मार्पल घरी गेल्या.

***

दहा दिवसांनी एक खळबळजनक घटना घडली. सर्वगुणसंपन्न मेरी रात्री घराचं दार उघडं टाकून नाहीशी झाली होती. तिच्याबरोबरच लॅव्हियाबाईंचे आणि एमिलीबाईंचे सगळे दागिनेही नाहीसे झाले होते. बाजूच्या बिऱ्हाडांची दारंही पद्धतशीरपणे चावीने उघडून कोणीतरी त्यांच्याही चीजवस्तू चोरल्या होत्या. लंडनमधल्या एजन्सीत मेरी हिगिन्सची चौकशी केल्यावर कळलं, की खरी मेरी हिगिन्स दुसरीकडे काम करत होती. लॅव्हिनियाबाईंकडे आलेली बाई कोण, ते एजन्सीवाल्यांना माहीत नव्हतं. ती कोणीतरी तोतया असावी. पोलिसांनी जंग जंग पछाडले, तरी तिचा पत्ता लागेना. चांगलीच सराईत गुन्हेगार होती ती!

एमिलीबाईंची तब्येत आता आणखी बिघडली. त्यांनी अखेर डॉ. हेडॉकना बोलावणं धाडलं. पण डॉ. हेडॉकना त्यांचं दुखणं काही फारसं ‘सीरियस’ वाटेना. त्यांनी किरकोळ औषधं दिली. आता लंडनच्या स्पेशालिस्टकडे जावं, आणि तिकडेच जवळपास बिऱ्हाड हलवावं, असं स्किनर भगिनींनी ठरवलं. महिनाअखेरपर्यंत ही जागा सोडायची असंही ठरलं.

***

त्यानंतर एक-दोन दिवसांतच मिस मार्पल पोलीस चौकीत गेल्या.

‘‘बोला मार्पल आजी, काय म्हणताय?’’ इन्स्पेक्टर स्लॅक म्हणाले.

‘‘मला थोडं बोलायचंय या स्किनर मंडळींच्या मोलकरणीबाबत. तिचा शोध लागणं महत्त्वाचं आहे फार.’’

‘‘तुम्हाला काही माहिती आहे का तिच्याबद्दल?’’

‘‘अं, हाताच्या ठशांचा काही उपयोग होईल का?’’

। वाचा - ‘आंधळी’ (इंग्रजी) - कॅथरिन पियर्स, शांता शेळके, मेहता प्रकाशन (आपल्या व्यंगावर मात करणाऱ्या हेलन केलरचे हृदयस्पर्शी चरित्र)।

''नक्कीच, आमच्याकडच्या रेकार्डवरून आम्ही तपासून पाहू ना ते.''

हे ऐकल्यानंतर मार्पल आजींनी त्यांच्या बटव्यातून एक छोटं पुठ्ठयाचं खोकं बाहेर काढलं. त्यात एक छोटासा आरसा कापसावर अलगद ठेवलेला होता.

''या आरशावर आहेत तिचे ठसे!'' मार्पलबाईंनी जाहीर केलं.

इन्स्पेक्टर स्लॅक बघतच राहिले, ''तुम्ही मुद्दाम तिचे ठसे घेतलेत?''

''हो, मला सुरवातीपासूनच संशय होता तिचा. प्रत्येक माणसात काहीतरी गुणदोष असतात. सर्वगुणसंपन्न कोणी असतं, यावर माझा तरी मुळीच विश्वास नाही!''

''बघू... आता हे स्कॉटलंड यार्डला पाठवले, की तिथे कळेल; एखाद्या माहितीच्या चोराच्या ठशाशी ते जुळतात का.''

''इन्स्पेक्टर, त्यापेक्षा इथेच जवळपास का नाही शोध घेत?''

''म्हणजे?...''

''म्हणजे असं बघा, काही काही गोष्टी जरा चमत्कारिकच वाटतात. आता ही ग्लॅडिस. प्रमाणिक आणि चांगलं काम करणारी. ते काय लॅव्हिनियाबाईंना समजत नव्हतं? तरी पण तिच्यावर खोटा आळ घेऊन त्यांनी तिला कामावरून का बरं काढलं असेल?

दुसरी गोष्ट, स्वत:च्या आजाराचे चोचले पुरवणारी माणसं सारखी डॉक्टरकडे धावतात. मग या एमिलीबाई का बरं इथल्या डॉक्टरकडे जात नाहीत? त्यांच्या आजरपणाचं बिंग फुटू नये, म्हणूनच की काय? तेव्हा सांगायचा मुद्दा असा की, आजारी, कुरकुरी, क्षीण आवाजाची, भुऱ्या केसाचं टोपलं करून (विगच असला पाहिजे तो!) अंधाऱ्या खोलीत लोळणारी बाई आणि हसतमुख, उंच, काळ्या केसाचा अंबाडा घालून चुटूचुटू कामं करणारी बाई एकच नसेल कशावरून?... एमिलीबाई आणि मेरी यांना एकत्र कुणीच पाहिलेलं नाही. या एमिलीबाईच रात्री गुपचूप परगावी गेल्या असतील आणि दुसऱ्या दिवशी मेरी हिगिन्स बनून परत आल्या असतील. शेजारपाजारच्या घरांच्या डुप्लिकेट किल्ल्या आधीच करून ठेवल्या असतील. कार्यभाग साधल्यावर मेरी हिगिन्सचा अवतार संपला. आता थोडे दिवस थांबून या स्किनर बहिणीदेखील पसार होणार. अट्टल चोरट्या आहेत त्या. इतर ठिकाणी पचवल्या असतील त्यांनी चोऱ्या. पण यावेळीची चोरी नाही पचणार. आमच्या गावातल्या प्रामाणिक मुलीवर खोटा आळ घेतला, मी बरी खपवून घेईन? कळलं पाहिजे सर्वांना, चोर कोण आहे आणि ग्लॅडिस किती प्रामाणिक आहे ते!''

इन्स्पेक्टर स्लॅक थक्क होऊन ऐकतच राहिले, पण पुढची कार्यवाही मात्र त्यांनी झटपट केली. अट्टल गुन्हेगार बहिणींना वेळेत पकडल्याबद्दल त्यांचं पोलीस खात्यात कौतुकही झालं.

मिस मार्पलनी एक दिवस एड्ना आणि ग्लॅडिसला चहाला बोलावलं, आणि चांगलं काम मिळाल्यावर ते उगीचच्या उगीच सोडू नये, हे ग्लॅडिसला समजावून सांगितलं.

– स्वैर अनु. धनवंती हर्डीकर
१७९१ सदाशिव पेठ,
देशमुखवाडी, पुणे – ३०
dhanvantihardikar@gmail.com

वदेयुर्भवान् साधुरेवं कुरुष्व, यशोगानमास्तां हि लोके त्वदीयम् ।
विहायैव सर्वं विगम्यं त्वयान्ते, मृतोऽपि प्रजीवेर्भृशं कीर्तिरूपे ॥ १॥ (संस्कृत)

३ फ्रेंच

छोट्या निग्रो मुलाची प्रार्थना

मूळ लेखक – गी तिरोलियां, स्वैर अनुवाद – माधुरी पुरंदरे

देवा, मी खूप थकलो आहे.
मी जन्माला आलो तो थकलेलाच होतो.
आणि कोंबडं आरवल्यापासून मी खूप चाललो आहे
आणि त्यांच्या शाळेकडे जाणाऱ्या वाटेतली टेकडी खूप उंच आहे.

देवा, मला त्यांच्या शाळेत जायचं नाहीये.
मला तिकडे जावं लागणार नाही असं काहीतरी कर ना!

माझ्या बाबांमागे मला झऱ्याच्या ताज्या–थंडगार पाण्यातून जायचं आहे,
जेव्हा गूढ रानात अजूनही रात्र तरंगत राहिलेली असते;
पहाटेनं घालवून दिलेली भुतं जिथं लपून बसलेली असतात.

मध्यान्ही तहानेल्या तळ्ल्यांच्या बाजूनं जाणाऱ्या
तापलेल्या पायवाटेवरून
मला अनवाणी चालायचं आहे.
घनदाट आंब्याच्या तळाशी दुपारची डुलकी घ्यायची आहे...

देवा, मला त्यांच्या शाळेत जायचं नाहीये.
मला तिकडे जावं लागणार नाही असं काहीतरी कर ना!

ते म्हणतात की सगळ्या छोट्या निग्रो मुलांनी तिकडे जायला हवं,
म्हणजे तीसुद्धा होतील
शहरातल्या साहेब लोकांसारखी,
रीतभात असलेल्या साहेब लोकांसारखी.
पण ते म्हणतात तसं मला व्हायचंच नाहीये,
शहरातल्या साहेबासारखं,
रीतभात असलेल्या साहेबांसारखं.

ऊसमळ्याच्या कडेकडेनं रमतगमत चालायला मला आवडतं.
तिथं माझ्याच कातडीच्या रंगासारख्या तांबूस काळ्या साखरेनं
तुडुंब भरलेल्या गोणी असतात.
ज्या वेळी प्रेमळ चंद्र झुकलेल्या नारळीच्या कानात
हलकेच कुजबुजत असतो
अशा रात्री एखादा म्हातारा बिडी फुंकत
आपल्या घोगऱ्या आवाजात सांगत असलेल्या झांबाच्या गोष्टी,
ससोबाच्या गोष्टी,
आणि कुठल्याच पुस्तकात नसलेल्या
अशा आणखी किती तरी गोष्टी ऐकायला मला आवडतं.

। वाचा - 'तोत्तोचान' (जपानी) - तेत्सुको कुरोयानाजी; अनु. चेतना गोसावी, एन.बी.टी. प्रकाशन (एका आगळ्या वेगळ्या शाळेचे चित्रण)।

तुम्हाला ठाऊक आहे
निग्रोंना आधीच खूप कामं असतात;
त्यात जी इथे नसलेल्या कुठल्या तरी गोष्टींबद्‌दल आम्हाला सांगत असतात
अशा पुस्तकांमधून शिकण्याची आणखी भर कशाला?

शिवाय, त्यांची शाळा खरंच खूप उदासवाणी असते.
शहरातल्या साहेब लोकांसारखी
रीतभात असलेल्या लोकांसारखी
ज्यांना चांदण्या रात्री नाचता येईनासं झालं आहे
आपल्या पायांनी चालता येईनासं झालं आहे
तांबडं फुटेपर्यंत जागून कहाण्या सांगणं जमेनासं झालं आहे
अशांसारखी उदासवाणी.

देवा, मला त्यांच्या शाळेत जायचं नाहीये.

गी तिरोलियां मध्य अमेरिकेतील 'ग्वादलूप' ह्या फ्रेंच वसाहतीत ह्यांचा जन्म झाला. ह्या कवितेतील 'ते' म्हणजे गोरे फ्रेंच आहेत.

स्वैर अनुवाद – माधुरी पुरंदरे
१३, रुणवाल रिजन्सी,
कोथरुड, पुणे 411029

Bhartiya Jnanpith — ✻ भारतीय ज्ञानपीठ ✻

Highest Literary Award for India

इ. स. १९४३ मध्ये वाराणसी येथे १२ वी अखिल भारतीय पौर्वात्य परिषद भरली होती. या परिषदेत संस्कृत, प्राकृत, पाली, अपभ्रंश भाषांवर शास्त्रशुद्ध संशोधन केले जावे आणि त्या दृष्टीने उपयुक्त अशा पुस्तकांचे, लेखांचे प्रकाशन करून ज्ञान अधिकाधिक लोकांपर्यंत पोचावे हा विचार प्रकर्षाने मांडला गेला. तेव्हा काही विद्वानांनी श्री. साहू शांतिप्रसाद जैन (टाईम्स ऑफ इंडिया ग्रुप) व त्यांच्या पत्नी रमा जैन यांची भेट घेऊन संशोधनासाठी एका अध्यासनाची स्थापना करण्याची विनंती केली. श्री. साहू प्रसाद जैन यांना भारतीय संस्कृतीचा रास्त अभिमान असल्याने आणि त्या संदर्भात अधिकाधिक जाणून घेण्याची इच्छा असल्याने त्यांनी या विनंतीस मान दिला. कलकत्ता येथे श्रीमती रमा जैन यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन होऊन देशाच्या विविध भागातील विद्वानांना त्यामध्ये निमंत्रित केले गेले. चर्चा, विचार विनिमय होऊन १८ फेब्रुवारी १९४४ रोजी 'भारतीय ज्ञानपीठ' या संस्थेची स्थापना केली गेली.

या ट्रस्टला 'टाईम्स् ऑफ इंडिया' ग्रुपचे आर्थिक पाठबळ मिळाले. साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात मोलाची कामगिरी करणारी देशातील अग्रगण्य संस्था म्हणून आज 'ज्ञानपीठ' चा उल्लेख होतो. संस्थेचे प्रमुख कार्यालय लोधी मार्ग, दिल्ली येथे आहे. 'भारतीय ज्ञानपीठ' द्वारे दरवर्षी शेकडो हिंदी आणि अन्य भाषांतील पुस्तके प्रकाशित होतात. इतर भाषांतील पुस्तकांचे हिंदीत अनुवाद केले जातात. 'ज्ञानपीठा'च्या 'लोकोदय ग्रंथमाला' आणि 'मूर्तिदेवी ग्रंथमाला' या मालिका जगभर पोचल्या आहेत. जैन तत्त्वज्ञानावर अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

'भारतीय ज्ञानपीठा'द्वारा देण्यात येणाऱ्या पुरस्कारांपैकी 'नवलेखन पुरस्कार' (नवोदित लेखकांच्या उत्तम लेखनास प्रोत्साहन देण्यासाठी) 'मूर्तिदेवी पुरस्कार' (भारतीय तत्वज्ञान, भारतीय संस्कृती आणि जीवनमूल्य यावरील लेखनासाठी) आणि ज्ञानपीठ पुरस्कार हे तीन विशेष पुरस्कार आहेत. ज्ञानपीठ पुरस्कार हा साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्‌दल दिला जाणारा भारतातील सर्वोच्च सन्मान आहे. कोणत्याही भारतीय भाषेत सर्जनशील लेखन करणारी, भारतीय नागरिक असणारी व्यक्ती या पुरस्कारास पात्र ठरते. आजपर्यंत ५७ जणांना या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

संकेतस्थळ – jnanpith@satyam.net.in

बरा वोखटा सर्व संसार जाला । अकस्मात येईल रे यमघाला ॥
म्हणोनी भले सांगती सत्य चाला । जनीं दास तो शीकवीतो मुलांला ॥ १०॥ (मराठी)

इटालियन

उडणं

मूळ लेखक – फ्रान्को मिल्याच्ची, स्वैर अनुवाद – मेघना पळशीकर



मला वाटतंय स्वप्नं अशी परतून येत नसतातः
रंगवत होतो माझे हात आणि चेहरा निळ्या रंगात
अचानक मग एका वाऱ्याच्या झोतासरशी उडालो मी
आणि उडू लागलो अनंत आकाशात

निळ्या आकाशात निळं होऊन
उडणं आ हा हा!
गाणं गुणगुणणं आ हा हा!
राहावं तिथेच आनंदात

उडत होतो मी खुशीत
अगदी सूर्यापर्यंत आणि त्यापेक्षाही वर
आणि दूरवरचं जग होतं
हळूहळू जात विरत
गुंजत होतं मधुर संगीत
फक्त माझ्यासाठीच.

पण सगळीच स्वप्नं पहाटे जातात विरून
कारण मावळतीचा चंद्र घेऊन जातो त्यांना त्याच्याबरोबर
पण मी मात्रं स्वप्नं बघतच राहतो
तुझ्या सुंदर निळ्या डोळ्यांत
जणू तारकांनी भरलेल्या आकाशात

आणि उडत राहतो मी खुशीत
अगदी सूर्यापर्यंत वर आणि आणखी वर
आणि जग जातं हळूहळू विरत
तुझ्या निळ्या डोळ्यांत
तुझा आवाज होतो मधुर संगीत
ऐकू येतं जे फक्त मलाच.

तुझ्या निळ्या डोळ्यांत
उडणं आ हा हा!
गाणं गुणगुणणं आ हा हा!
आहे मी खुशीत अगदी इथेच
तुझ्या निळ्या डोळ्यांत...

– स्वैर अनु. मेघना पळशीकर, अ-१०८, कपिल अभिजात, डहाणूकर कॉलनी, पुणे 411038 meghuvv@gmail.com

वोलोर (Volare) या इटालियन कवितेचा हा अनुवाद आहे. ही लिहिली आहे फ्रान्को मिल्याच्ची (Franco Migliacci) यांनी १९५८ मध्ये. थकल्यानंतर आपण आपल्या मुलाच्या डोळ्यातही स्वप्नं पाहू शकतो, हा सकारात्मक भाव सांगताना कवी म्हणतो, स्वप्नं कधीच संपत नसतात, हवेत फक्त स्वप्नं पाहू शकणारे 'डोळे'! आजही इटालियन लोकांची ही कविता अगदी आवडीची आहे. 'सॅनरेमो' हा इटलीतला साहित्याला दिला जाणारा प्रतिष्ठित, मानाचा पुरस्कारही या कवितेला मिळाला आहे.

। वाचा - 'प्रिय बाई' (इटालियन) बार्बियनची शाळा, स्कुओला दि बार्बियाना, अनु. सुधा कुलकर्णी
(खेड्यातील मुलांनी आपल्या बाईंना कळवलेल्या शिकण्यातल्या अडचणी)।

रशियन

मोटरसायकलवरच्या चित्तथरारक कसरती

मूळ लेखक –वीक्तर द्रागूनस्की, स्वैर अनुवाद– अनघा भट-बेहेरे

वीक्तर द्रागूनस्की - (जन्म - १९१३, मृत्यू - १९७२)
१९५९ सालापासून त्यांनी लहान मुलांसाठी लेखनाला सुरुवात केली. मीश्काचा कमालीचा लोकप्रिय झालेला दोस्त 'डेनिस कराब्ल्यो'चे जनक म्हणून रशियामध्ये ते सर्वमान्य आहेत. 'डेनिस कराब्ल्यो', त्याचे मित्र-मैत्रिणी, नातेवाईक शेजारीपाजारी यांवर अनेक कथासंग्रह, कादंबऱ्यांचे लेखन त्यांनी केले. यावर अनेक लोकप्रिय चित्रपटही निघाले. मराठीतही राढुगा आणि ऊर्जा प्रकाशनांनी या 'डेनिसच्या गोष्टी' प्रसिद्ध केल्या आहेत.

मी अगदी लहान असताना मला एक तीनचाकी सायकल भेट मिळाली. मी ती चालवायला शिकलो. अजिबात न घाबरता! जणू मी सबंध आयुष्य सायकल चालवण्यात घालवलं असावं, अशा थाटात मी ती लगेचच चालवायला लागलो. आई म्हणाली,

"बघा, त्याला कसं खेळाचं अंग आहे ते!"

बाबा म्हणाले, "कसा माकडासारखा बसलाय!"

मी चांगलीच सायकल चालवायला लागलो. मग सायकलवर तऱ्हेतऱ्हेच्या कसरती करायला लागलो; सर्कशीतल्या लोकांसारख्या. म्हणजे कधी उलट बसून तर कधी सीटवर झोपून, तर कधी हातांनी पॅडल मारत! एकदा डाव्या हातानं, एकदा उजव्या हातानं. कधी एका बाजूला बसून, कधी पाय सोडून, कधी हँडलवर बसून, कधी हात सोडून, कधी हातात पाण्याचा ग्लास धरून, थोडक्यात म्हणजे हर प्रकारे कसरत!

नंतर मग झेन्याकाकांनी माझ्या सायकलचं एक चाक काढून ती दुचाकी करून दिली. तीसुद्धा मी अगदी पटकन शिकलो. त्यावरही तशाच कसरती करायला लागलो. आमच्या आजूबाजूची मुलं मला गल्लीचा 'वर्ल्ड चँपियन' म्हणायला लागली.

माझे गुडघे सायकलच्या

हँडलच्या पार वर जाईपर्यंत मी ती सायकल चालवली. मग मी सायकलच्या मानाने मोठा झाल्याचं माझ्या लक्षात आलं. मग बाबा मला खरीखुरी सायकल कधी आणतात त्याची वाट बघू लागलो.

मग एक दिवस आमच्या अंगणात एक सायकल आली. त्याच्यावर बसलेले काका पायांनी पेडल मारत नव्हते. ती सायकल एखाद्या चित्तूरासारखी आपली आपणच थरारत होती, आपली आपणच चालली होती. मला भयंकर आश्चर्य वाटलं. अशी आपोआप चालणारी सायकल मी कधीच बघितली नव्हती. मोटरसायकल ठीक आहे; गाडी किंवा रॉकेटसुद्धा मी एकवेळ समजू शकतो. पण सायकल? आपोआप चालणारी?

माझ्या डोळ्यांवर माझा विश्वासच बसेना.

सायकलवरचे काका मीश्काच्या बिल्डिंगच्या जवळ गेले आणि तिथे त्यांनी सायकल थांबवली. ते काका खरं तर काका नव्हते, लहानसा पोरगाच होते ते. त्याने खांबाला सायकल टेकवून ठेवली अन् गेला. मी आ वासून तिथेच उभा राहिलो. इतक्यात

भद्रो ह्यभद्रोऽपि संसार आस्ते, अकस्माद् विना सूचनां काल एति ।
तथादिश्यते 'सत्यमादेहि' सद्‌भिः, ततो दास आदिश्य बालान् पपाठ ॥१०॥ (संस्कृत)

मीश्का बाहेर आला. म्हणाला,

''एवढं टक लावून काय बघतोयस?''

मी म्हणालो, ''आपोआप चालते, माहितेय?''

मीश्का म्हणाला, ''ती फेद्काची, माझ्या लांबच्या भावाची आहे ! इंजिन बसवलेली सायकल आहे ती. फेद्का आमच्याकडे आलाय, कामासाठी - चहा पितोय.''

मी विचारलं, ''अशी सायकल चालवायला अवघड असते का?''

''अगदी एकदम सोप्पं आहे. अर्ध पेडल मारलं की तिला किल्ली बसते. फक्त एकदा पेडल मारायचं की झालं. मग चालवायचीच. शंभर किलोमीटर जाईल इतकं पेट्रोल आहे तिच्यात. अर्ध्या तासाला वीस किलोमीटर इतका स्पीड आहे.'' मीश्का म्हणाला.

''अरे वा ! असं पाहिजे. ही खरी सायकल ! याच्यावर बसायला मजा येईल.''

मीश्कानं यावर मान हलवली, म्हणाला, ''उडेल ती. पण फेद्का मारेल. मुंडकं उडवेल.''

''हो ना. तसं धोक्याचंच आहे ते.''

मीश्काने आजूबाजूला पाहिलं आणि मग एकदम म्हणाला, ''अंगणात कोणीच नाहीये आणि काही झालं तरी तू 'वर्ल्ड चँपियन' आहेस बैस ! मी तुला गाडी ढकलायला मदत करतो. मग तू एकदाच पेडल मार आणि मग बघ

सगळं एकदम सुरळीत होईल. दोन तीन चकरा मार. मग गाडी गपचूप परत जाग्यावर ठेवून देऊ. फेद्का खूप चहा पितो. निदान तीन कप चहा तर ढोसतोच. चल लवकर !''

''चल !'' मी म्हणालो.

मीश्काने सायकल धरली. मी सायकलवर चढून बसलो. माझा एक पाय जेमतेम पेडलला टेकत होता. दुसरा पाय अधांतरी लटकत होता. हा लटकणारा पाय मी सायकलच्या दांडीवर टेकवून ठेवला होता. मीश्का शेजारून पळत होता अन् ओरडत होता, ''पेडल दाब, मार पेडल !''

मी सीटवरून जवळपास बाहेर सांडूनच एका पायाने पेडल दाबलं. मीश्काने हँडलवरचा कसला तरी खटका दाबला. अचानक गाडी धडधडली आणि मी निघालो.

मी निघालो ! एकटा ! माझ्या कानात वारा शीळ घालत होता. आजूबाजूच्या सगळ्या वस्तू जोरजोरात गोल गोल फिरत होत्या- खांब, फाटक, बाक, पावसामुळे उगवलेली भूछत्रं, वाळू, झोपाळा, सोसायटीचं ऑफिस... मग परत खांब, फाटक, बाक, भूछत्र, वाळू, झोपाळा, सोसायटीचं ऑफिस मग पुन्हा खांब, फाटक, बाक, भूछत्र, वाळू, झोपाळा, सोसायटीचं ऑफिस; हँडलला घट्ट धरून मी जात होतो. मीश्का माझ्या मागे पळत होता.

पण तिसऱ्या फेरीच्या वेळी तो ओरडला, ''मी दमलो आता !'' आणि खांबाला टेकून उभा राहिला.

मी एकटाच चालवत राहिलो. मला खूप मजा येत होती. मी जात होतो आणि मला वाटत होतं की मी मृत्युगोलात कसरतीच करतोय. धाडसी कसरतपटू त्या मृत्युगोलात कशा कसरती करतो ते मी पाहिलं होतं...

खांब, मीश्का, झोपाळा, सोसायटीचं ऑफिस... बराच वेळ माझ्या डोळ्यांसमोर फिरत राहिलं. छानच होतं सगळं; फक्त खाली लोंबकळणारा जो पाय होता, त्याला मुंग्या यायला लागल्या होत्या... मग अचानक मला कसंसच व्हायला लागलं. माझ्या तळव्यांना घाम फुटला. मला अगदी थांबावंसं वाटायला लागलं.

मीश्काच्या जवळ गेल्यावर मी ओरडलो, ''बास ! थांबव !'' मीश्का माझ्या मागे पळायला लागला

। वाचा - 'झाडं लावणारा माणूस' (फ्रेंच) - जॉर्ज जिओनडे; अनु. माधुरी पुरंदरे, राजहंस प्रकाशन (पर्यावरणासाठी धडपडणाऱ्या माणसाची कहाणी)।

आणि ओरडला,
''काय? जोरात सांग ना !''
मी ओरडलो, ''तू काय बहिरा झालास काय?''
पण मीश्का कधीच मागे पडला होता. मी अजून एक फेरी मारली आणि ओरडायला लागलो,
''मीश्का, गाडी थांबव !''
मग त्याने हँडल पकडलं. गाडी हलायला लागली. तो पडला आणि मी पुन्हा पुढे निघालो. बघितलं, तर खांबापाशी पुन्हा तो मला सामोरा येतोय आणि ओरडतोय,
''ब्रेक मार ! ब्रेक मार !''
ब्रेक शोधत असतानाच मी त्याच्याकडून पुढे गेलो. पण ब्रेक कुठंय ते मला सापडेच ना ! हँडलची बटणं मी दाबून बघायला लागलो, कसले कसले स्क्रू फिरवून बघायला लागलो. पण काहीच उपयोग झाला नाही ! गाडी तशीच धडपडत जात राहिली. माझ्या लोंबकळणाऱ्या पायाला प्रचंड मुंग्या आल्या होत्या.
''मीश्का, ब्रेक कुठाय?'' मी ओरडलो.
तो म्हणे, ''मी विसरलो.''
''नीट आठव मग !''
''ठीक आहे, आठवतो. तोपर्यंत अजून चकरा मार !''
''मीश्का, लवकर आठव !'' मी ओरडलो.
मी पुढे गेलो. पण मला कसंतरीच व्हायला लागलं. पोटात ढवळायला लागलं. पुढच्या फेरीला मीश्का म्हणाला, ''मला आठवत

नाहीये. त्यापेक्षा तू खाली उडी मार!''
''मला ढवळतंय !'' मी त्याला म्हणालो.
हे असं होणार, हे जर मला माहीत असतं, तर मी मुळीच बसलो नसतो गाडीवर. पायांनी चाललेलं बरं त्यापेक्षा, आईशपथ !
इतक्यात मीश्का पुन्हा ओरडला, ''झोपायची गादी असते ना, ती आणायला पाहिजे. म्हणजे मग तू त्याला अडखळून थांबशील. तू कशावर झोपतोस?''
''फोल्डींग कॉटवर !'' मी ओरडलो.
''मग पेट्रोल संपेपर्यंत चालवत राहा !'' मीश्का.
हे ऐकून मी त्याच्या अंगावरच गाडी घालणार होतो. म्हणे, 'पेट्रोल संपेपर्यंत चालवत रहा !' हे असं मला बागेभोवती गोलगोल दोन आठवडे फिरत राहावं लागणार की काय? आणि माझं मंगळवारचं पपेट शोचं तिकिट काढलेलं आहे. आता तर पायांना सुया टोचल्यागत होऊ लागलं. मी त्या मूर्खाला म्हणालो, ''जा त्या फ्येद्काला तरी बोलावून आण !''

''तो चहा पितोय !''
''नंतर पिऊ दे !''
पण त्यानं माझं ऐकूनच घेतलं नाही. आणि म्हणायला लागला, ''जीव घेईल तो ! अगदी नक्की !''
पुन्हा सगळं माझ्या डोळ्यांपुढून सरकायला लागलं : खांब, फाटक, बाक, झोपाळे, सोसायटीचं ऑफिस. आणि नंतर मग उलटं : सोसायटीचं ऑफिस, बोपाळे, झाक, खायक, फांब... आता आपली काही धडगत नाही, हे मला कळून चुकलं.
पण इतक्यात कुणीतरी गाडी झपकन धरली. तिची धडधड थांबली आणि मला डोक्यात एक चांगली जोरदार टप्पल बसली. शेवटी एकदाचा मीश्काचा फ्येद्का चहा संपवू आला म्हणायचा ! मी ताबडतोब पळायचा प्रयत्न केला पण त्या लोंबत ठेवलेल्या पायात जणू सुरा खुपसल्यागत झालं. तरीसुद्धा मी वेळ गमावला नाही. एक पायावर उड्या मारत मी फ्येद्कापासून दूर झालो.
फ्येद्का काही माझ्या मागे आला नाही. आणि त्या टपलेबद्दल मी पण त्याच्यावर राग धरला नाही. कारण जर तो नसता तर मी अजूनही अंगणात फेऱ्या घालत बसलो असतो.

स्वैर अनु. –अनघा भट–बेहेरे
३, बसंत बहार,
११९/ब, प्रभात रस्ता, पुणे 411004
anaghab2@rediffmail.com

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरुवे नमः ।। (संस्कृत)

पाहिलेच पाहिजे असे काही...

‘Where Is My Friend’s Home?’

– शैलजा देशमुख



इराणी चित्रपटांना जागतिक पातळीवर सन्मानाची ओळख मिळवून देणारे दिग्दर्शक अब्बास किआरोस्तामी यांनी आपल्या अनेक चित्रपटांतून लहान मुलांचे भावविश्व अतिशय तरलपणे उलगडून दाखवले आहे. ‘Where Is My Friend’s Home?’ हाही असाच एक चित्रपट. एका शाळकरी मुलाने आपल्या मित्राचं घर शोधण्यासाठी अख्ख्या दिवसभर केलेली वणवण, त्या भटकंतीत त्याला आलेले वेगवेगळे अनुभव, भेटलेली मासलेवाईक माणसं, त्याच्या मनाची तगमग याचं हृद्य चित्रण म्हणजे हा चित्रपट !

चित्रपटाच्या सुरुवातीला खेड्यातल्या एका शाळेचा बंद असलेला दरवाजा कृष्णधवल रंगात दिसतो. त्याच्या पार्श्वभूमीवर चित्रपटांतील अभिनेते, दिग्दर्शक, निर्माता, संगीतकार, तंत्रज्ञ इत्यादींची श्रेयनामावली येते. सकाळची वेळ, शाळा भरण्याच्या प्रसंगाने चित्रपटाची सुरुवात होते.

इराणमधील कोकेर या लहानशा गावातील लहानशीच सरकारी प्राथमिक शाळा. आजूबाजूच्या वस्तीवाड्यांवरून सकाळी लवकर उठून कित्येक मैल चालत मुलं या शाळेत येतात. शाळेची घंटा होऊन पाच मिनिटं झालीयेत. अजून सर वर्गात आलेले नाहीत. मग काय गोंधळच गोंधळ !

अचानक सर वर्गात येतात. ‘सायलेन्स !’ सर ओरडतात. मुलं चिडीचूप्प !

‘‘अरे काय ही बेशिस्त ! दोन मिनिटांत वर्ग डोक्यावर घेतलात? शाळेत कशाला येता? अभ्यासासाठी ना? चला, गृहपाठाच्या वह्या काढा.’’

अहमद अली आपली वही काढून ठेवतो. सर एकामागून एक मुलांच्या वह्या तपासतायत. कुणाला अक्षरावरून, कुणाला चुकीचं लिहिल्याबद्‌दल, कुणाला अजागळपणा-बद्‌दल ओरडा बसतोय. अलीच्या शेजारी रझा अली बसलाय. आज त्याने गृहपाठ वहीत न करता सुट्या कागदांवर केलाय.

सर संतापतात, ‘‘काय रे वही कुठाय तुझी?’’ तो चाचरत उत्तरतो, ‘‘सर काल चुलतभावाच्या घरी सगळे एका कार्यक्रमासाठी गेलो होतो. वही न्यायला विसरलो म्हणून कागदावर....’’

‘‘अरे कितीदा शिकवू तेच ते ! आपल्या वागण्यात शिस्त हवी. एकतर नेटकं काम करायची सवय लागायला हवी. दुसरं म्हणजे एकाच वहीत गृहपाठ केला की आपली प्रगती आपल्यालाच कळते. आणि तू रे रझा, नेहमीचंच आहे तुझं. कितीदा ओरडा खाल्लास या महिन्यात? हात पुढे कर. शिक्षा व्हायलाच हवी तुला.’’

‘‘सर पुन्हा नाही होणार असं !’’

‘‘ते काही नाही. शिक्षा हवीच. त्याशिवाय तुझ्या लक्षात राहणार नाही. पुन्हा जर असं झालं तर वर्गात बसू देणार नाही.’’ रझा निमूटपणे फटके खातो. शेजारी बसलेला त्याचा मित्र अहंमद अली गरीब, साधा, सद्‌वर्तनी मुलगा! सरांच्या तोंडाचा पट्टा चालू असताना मधूनमधून त्याच्या भेदरलेल्या चेहऱ्यावर कॅमेरा !

सर कडक शिस्तीचे असले तरी खेड्यातल्या या गरीब मुलांनी चांगलं शिकावं, याची तळमळ त्यांना आहे. मध्येच एक मुलगा उशिरा येतो.

‘‘सर, मे आय कम इन?’’

‘‘का रे, उशीर का झाला?’’

‘‘सर, मी शेजारच्या पोश्ते गावातून येतो. उठायला थोडा उशीर झाला...’’ आतापर्यंत जमदग्नीचा अवतार धारण करणारे सर त्याला समजावून सांगतात,

‘‘अरे, पाच-दहा मैल लांबून शाळेत यायचं तर लवकर

। वाचा - ‘प्लॅटफॉर्म नं ४’ (गुजराथी)- हिमांशी शेलत; अनु. अंजली नरवणे, पद्मगंधा प्रकाशन (प्लॅटफॉर्मवरील अनाथ मुलांमध्ये काम करतानाचा अनुभव)।

निघावं. त्यासाठी संध्याकाळी लवकर आटपून, लवकर झोपायला हवं. लांबून येणाऱ्या सगळ्यांनी हे लक्षात ठेवा रे!''

मुलांना कराव्या लागणाऱ्या कष्टांची सरांना जाण आहे. वरवर कडक अवतार धारण करणाऱ्या सरांच्या मनात वात्सल्याचा झराही आहे.

टण् टण् टण्! घंटा होते. मुलं वाऱ्यावरती उधळतात. पळताना अहमद आणि रझाची टक्कर होते. दोघांची वह्या पुस्तकं खाली पडतात. रझाही खाली पडतो. अहमद त्याला उठवतो. त्याची वह्या पुस्तकं गोळा करायला, नळावर जाऊन पॅण्टला लागलेली माती धुवायला मदत करतो. रझाच्या पॅण्टचा केशरी रंग आपल्याही लक्षात राहतो.

पुढचं दृश्य घराचं... अहमदला छोटं भावंड आहे; पाळण्यात झोपलेलं. आई नळावर कपडे धुतेय. मध्येच बाळ रडतं. आई अहमदला त्याला दुधाची बाटली द्यायला सांगते. आई सांगेल ते काम साधाभोळा अहमद मनापासून करतो. आता दप्तर उघडून तो गृहपाठ करायला सुरुवात करण्यासाठी वह्या काढतो. वही उघडतो. अरे, ही तर आपली वही नाही. नाव बघतो, रझाची वही !

पुन्हा दप्तरात डोकावतो. दप्तरात त्याची तशीच वही आहे. दोन्ही वह्यांची कव्हरं एकसारखी! मगाशी टक्कर झाली तेव्हा पुस्तकं उचलताना आपल्या दप्तरात आली. अहमदला सर आठवतात. आजच सरांनी रझाला दम दिलाय- 'पुन्हा वहीत गृहपाठ केला नाहीस तर हाकलून देईन वर्गातून !'

अहमद अस्वस्थ होतो. आई एकीकडे ओरडते, ''लवकर उरक रे गृहपाठ! बाहेर दुकानात जायचंय अजून ब्रेड आणायला! हे घे पैसे''.

अहमद आईला सांगू बघतो, ''आई, माझ्या मित्राची वही माझ्याकडे आलीय चुकून. त्याला द्यायला हवी ग ती! नाहीतर सर पुन्हा रागावतील त्याला !''

आई आपल्या कामाच्याच नादात. तिचं लक्षच नाही अहमद काय सांगतोय त्याकडे !

''आई, मला मित्राचं घर शोधून त्याची वही द्यायला हवी!''

''कुठे राहातो मित्र?''

''पोश्ते...''

''वेडा आहेस का. उद्या दे वही भेटल्यावर, चल लवकर गृहपाठ संपव.''

अहमद अस्वस्थ. आपल्यामुळे रझाला सर कडक शिक्षा करतील. ते काही नाही. वही पोहोचवायलाच हवी त्याच्यापर्यंत !

आई आत गेल्यावर वही शर्टात लपवून अहमद बाहेर पळ काढतो. त्याला एवढंच माहीत आहे की टेकडीच्या पलीकडे पोश्ते आहे. कोकेरकडून पोश्तेकडे जाणारा नागमोडी रस्ता! वाटेत झाडांची गर्द राई आहे. अहमद पळत पळत पोश्तेकडे निघतो. रझाच्या घराविषयी, त्याचे वडील काय करतात, त्याचं घर नक्की कुठे आहे अहमदला काही ठाऊक नाही. पोश्तेला पोहोचल्यावर 'रझा अली' एवढ्या नावावर मित्राचं घर शोधण्याचा अहमदने केलेला प्रयास म्हणजे चित्रपटाचा मुख्य भाग! कुणी धड माहिती सांगत नाही. जो जशी माहिती सांगेल त्या अनुषंगाने अख्खी वाडी तो पिंजून काढतो. कुणी सांगतं त्याच्या घराच्या दाराची चौकट निळी आहे; म्हणून निळा दरवाजा शोधत तो फिरतो. रझाच्या पॅण्टसारखी (केशरी रंगाची) पॅण्ट

बाहेर वाळत घातलेल्या घरात आशेने जातो आणि निराश होऊन परततो. रझा आपल्या मामाकडे काम शोधण्यासाठी गेलाय एवढीच माहिती हाती लागते. शेवटी नाईलाजाने अहमद परत आपल्या गावाकडे कोकेरकडे परततो.

कोकेर गावात पोहोचल्या पोहोचल्या एक सुतार खिडक्यांचा सौदा करतोय. संभाषणातून त्याला समजतं की त्याचं नाव रझाच्या वडिलांचं आहे. ते आपल्या तट्टूवर बसून पोश्तेला निघतात. अहमद त्यांच्या मागे पळत! रझाच्या घराचा शोध लावण्यासाठी! पोश्तेला तो परत पोहोचतो तर तो रझा अली वेगळाच. शेजारी राहणाऱ्या एका म्हाताऱ्याकडे तो रझाची चौकशी करतो. तो म्हातारा खिडक्या बनवणारा लोहार आहे. तो अहमदसमवेत रझाचे घर दाखवण्यासाठी येतो. संध्याकाळची वेळ. घरांच्या खिडक्यांतून, झरोक्यातून येणाऱ्या प्रकाशात दोघं चालतायत. म्हातारा त्यातली प्रत्येक खिडकी आपण केव्हा, कशी बनवली याविषयी अतिशय कंटाळवाणी माहिती अहमदला सांगतोय. अहमदला घरी परतायची घाई आहे. म्हाताऱ्याची गती अगदी संथ. पण काय करणार, रझाचे घर ते दाखवतील या आशेने अहमद त्यांची बडबड सहन करतो. पण शेवटी नाहीच सापडत रझाचे घर!

संध्याकाळ होते. आता घरी परतायला हवं. अहमद पळत, पळत घरी पोहोचतो. 'कुठे उंडारला होतास एवढा वेळ?' म्हणून आई-बाबांचा ओरडा खातो. इतका खटाटोप करूनही मित्राचं घर नाहीच मिळालं. त्याला जेवणखाण सुचत नाही. रात्र होते. अहमद गृहपाठ पुरा करायला बसतो. बाहेर अचानक पाऊस सुरू झालाय. वारा जोरात वाहतोय. अहमदला एक अफलातून कल्पना सुचते! बराच वेळ लागतो त्याला गृहपाठ पूर्ण करायला !!

सकाळी अहमद वर्गात पोहोचतो. रात्री जागरण झाल्याने त्याला थोडा उशीर होतो. रझा आधीच आपल्या जागेवर बसलेला. त्याचा चेहरा पडलाय कारण आजही त्याने वही हरवल्यामुळे गृहपाठ कागदावर केलाय. सर रांगेने गृहपाठ तपासत त्यांच्या जवळजवळ येतायत. आता सर किती कडक शिक्षा करणार या भीतीने रझाचा चेहरा भेदरलेला. अहमद गडबडीने दप्तर उघडतो. रझाची वही गृहपाठ केलेले पान उघडून हळूच त्याच्याकडे सरकवतो. (काल रात्रीच जागून अहमदनं रझाच्या वहीतही गृहपाठ पूर्ण केलाय !) सर दोघांच्या वह्या तपासतात. समाधानाने 'Very Good' शेरा देतात.

अहमद आणि रझाच्या ताणलेल्या चेहऱ्यावर आता हसू! या दृश्यावरच चित्रपट संपतो.

'Where is my friends home?' - कशासाठी शोधायचं होतं अहमदला मित्राचं घर? तर त्याची गृहपाठाची वही परत द्यायला! किती क्षुल्लक कारण - कुणी म्हणेल काय गरज होती इतकं बावळटासारखं वागायची? झाली असती रझाला शिक्षा... अतिशय संवेदनशील मन असलेला, सरळ मनाचा अहमद असा विचार करत नाही. मित्राला आपल्यामुळे शिक्षा होऊ नये, म्हणून तो त्याचं घर शोधण्यासाठी त्याच्या गावात जातो. त्याचा गृहपाठ स्वत: करतो.

अजिबात नाट्य नसलेली साधीशीच घटना. चित्रपटात काहीही भव्यदिव्य घडत नाही. चकचकीत सेट्स नाहीत, गाजलेले अभिनेते नाहीत. पण किआरोस्तामींचा परिसस्पर्श झाल्यावर ही साधीशीच कथा कशावरही भाष्य न करता अनेक गोष्टी प्रेक्षकाला सांगून जाते. अहमदसमवेत एकरूप होऊन कोकेर ते पोश्ते आणि पोश्तेतील घर न् घर ही भटकंती आपण करतो. या प्रवासात त्याला जी जी मोठी माणसं भेटतात त्यांना अहमदच्या भावनांची काहीच जाणीव नाही. जो तो येता-जाता त्याला उपदेशाचे डोस देतो. आजी घरात शिरताना 'बूट काढून ठेव' म्हणून ओरडते. आजोबा 'मी सांगितलेलं काम आधी कर. मोठ्यांचं तुला ऐकायला नको!' म्हणून ओरडतात. वाटेत भेटलेला म्हातारा लोहार, 'आमच्या काळी असं होतं' याचंच गाणं गातो. अहमद बिचारा केविलवाणेपणानं, नाईलाजानं सर्वांचं ऐकून घेतो; त्याचं म्हणणं मात्र कुणीच

। वाचा - 'इ्लाटाज डायरी' (इंग्रजी) - स्लाटा फिलिपोविक; अनु. ज्ञानदा नाईक, मेहता प्रकाशन (दुसऱ्या महायुद्धातील कटू अनुभवांचे चित्रण)।

ऐकून घेत नाही. या सगळ्यांतून दिग्दर्शक मोठी माणसं आणि लहान मुलं यांच्यातील भावनिक दरी व्यक्त करतो.

लहान मुलांच्या प्रमुख भूमिका, ग्रामीण भागाच्या पार्श्वभूमीवर घडणारी कथा, साधे सुटसुटीत संवाद हे किआरोस्तामी यांच्या या इराणी चित्रपटाचे विशेष. या चित्रपटात वरवर साध्या, सोप्या वाटणाऱ्या गोष्टींतून खूप सखोल असं अहमदचं भावविश्व रसिकांपर्यंत पोहोचवण्यात दिग्दर्शक म्हणून ते यशस्वी ठरले आहेत. अहमदची भूमिका करणारा अहमद अहमदपूर हा मुलगा व्यावसायिक नट नाही. म्हणून तुम्हाला तो तुमच्याच वर्गातला एखादा गरीब, हळवा, प्रेमळ, थोडासा बावळट मुलगा वाटेल !

खेड्यातली लहानशी शाळा, अहमदचं घर, म्हातारे आजी-आजोबा, गावातला सुतार, लोहार, सदा घरकामात गुंतलेली लेकुरवाळी आई, विहिरीवर पाणी भरणाऱ्या बायका, गावातल्या पारावर गप्पा मारणारे म्हातारे, पोश्तेतले गल्ली बोळ, चढ-उतार, लागूनलागून असलेली घरं या सगळ्यातून इराणमधील ग्रामसंस्कृतीचं दर्शन प्रेक्षकांना घडतं. कुठेही घडू शकणारी ही साधीसुधी कथा आपल्याला मुलांच्या निरागस विश्वात घेऊन जाते. 'साध्याही विषयात आशय कधी मोठा, किती आढळे...' ह्या पंक्तीचा तरल, काव्यात्म अनुभव 'Where is my friend's home?' हा चित्रपट आपल्याला देतो.

– शैलजा देशमुख
सी, १०२ पाटे संस्कृती,
सहकारनगर क्र. २, पुणे -९
sgdeshmukh50@gmail.com

✻ मैत्री भाषेशी ✻

✻ आता काही नाते वाचक शब्दांत झालेल्या परिवर्तनातील गंमती बघूया.

संस्कृत	**प्राकृत**	**मराठी**	**हिंदी**
आर्या (कुलीन स्त्री)	आइ, आईसे, आउ, (आदरणीय स्त्री)	आई	
माता	माय, मादा	माउली, माय	माँ
मातृश्वसा	माउस्सी	मावशी	मासी, मौसी
माम् (मित्र)	माम, मामग (जवळचा नातलग)	मामा (आईचा भाऊ)	
बालक	बाल	बाळ	

✻ दोन भारतीय भाषांमध्ये असणारे साम्य आपल्याला सहज समजू शकते. पण भारतीय भाषा आणि परदेशी भाषा यातही साम्य असते का? तुम्हीच बघा. पुढे काही संस्कृत आणि इंग्रजी शब्द दिले आहेत. त्यांच्या उच्चारातले साम्य तुमच्या लक्षात येते का ते पाहा.

पितर् (प चा इंग्रजीमध्ये फ होतो)	Father	तरू (त चा इंग्रजीमध्ये ट होतो)	Tree
मातर्	Mother	द्वार (द चा इंग्रजीमध्ये ड होतो)	Door
मूषक	Mouse	त्रि	Three
शाला	School	सप्त	Seven
पात्र	Pot	अष्ट	Eight
क्रूर	Cruel	नव	Nine

ग्रीक, लॅटीन, जर्मन, संस्कृत अशा अनेक भाषांमध्ये अशीच जवळीक सहज दिसते. वेगवेगळ्या भाषांमधले साम्य आणि भेद शोधत जितके आपण मागे जाऊ तितके भाषेचे वर्ण, शब्द, धाटणी जवळ जवळ येताना दिसतील. आणि असेच मागे जात राहिलो तर कदाचित सर्व भाषांचे मूळ एकच आहे का काय असे वाटायला लागेल.

– सुनिला गोंधळेकर, sunila.gondhakar@gmail.com

शुभं करोतु कल्याणं आरोग्यम् धनसंपदः।
शत्रुबुद्धिविनाशाय दीपज्योतिः नमोस्तु ते ॥ (संस्कृत)

स्वदेश विदेश (मलपृष्ठाच्या आतील पानावरील बंगाली पद्याचा मराठी अनुवाद)

– स्वैर अनुवाद डॉ. सुरुचि पांडे

स्वदेशी विदेशी झंकारून उठला तुझे नवीन तंत्र ।
आकाश अन् वाऱ्यातून लहरला तुझा मोहक मंत्र ।।ध्रु.।।
आनंदी या पृथ्वीमंदिरी धर्माचा सुंदर गंध ।
आनंदमय विवेकानंद तुम्ही हो विश्व विवेकानंद ।।१ ।।

अरुणकिरण उजळला या वंगभूच्या दिनभाळी ।
स्वर्गातून पुष्पवृष्टी अन् शुभशिषांच्या ओळी ।
प्रेमाच्या पुण्य-प्रवाही शोभतो गौर नित्यानंद ।
आनंदमय विवेकानंद तुम्ही हो विश्व विवेकानंद ।।२ ।।

देवलोकीचे तुम्ही हो समर्पित गुरुचरणापाशी ।
शिवभावाचे आर्त आणले साधुजीवनाकाशी ।
विश्वप्रेमाने पूर्ण-चित्त हो तुम्ही हर्षानंद ।
आनंदमय विवेकानंद तुम्ही हो विश्व विवेकानंद ।।३ ।।

किती भ्रमण भूधरी झाले ना तमा दिन-निशेची ।
हिमालयाच्या कुशीत ध्यानस्थ, ना तमा दिशेची ।
अंकुरला ज्ञानवृक्ष, शंकर-गौतमांचा त्यागानंद ।
आनंदमय विवेकानंद तुम्ही हो विश्व विवेकानंद ।।४ ।।

ज्ञानाचा असीम गौरव भारत गान मर्म वाणी ।
वेदान्त-गाथा ऐकता विस्मित हो पाश्चात्य जनता मनी ।
मृदुभावाची शक्ती गुणगुणते नवा मधुर छंद ।
आनंदमय विवेकानंद तुम्ही हो विश्व विवेकानंद ।।५ ।।

शिकागो सभेत तुझाच स्वर उमटला ललामस्थानी ।
विश्वाच्या कानी उसळत गेली तुझीच समर्थ-वाणी ।
सृजिले रामकृष्ण संघकार्य जीवनी त्यागाचा भगवा रंग।
आनंदमय विवेकानंद तुम्ही हो विश्व विवेकानंद ।।६ ।।

---

५ 'क्लिक' करण्यापूर्वी

मित्र हो, आपल्या आजूबाजूला खूपशा रंजक गोष्टी घडत असतात. रस्त्याने जाताना, घरात, शाळेत सर्व ठिकाणी अशा गोष्टी पहावयास मिळतात. या गोष्टी लगेचच इतरांनी देखील बघाव्यात, त्यातली गंमत त्यांनाही अनुभवता यावी, असे आपल्याला वाटते. कॅमेऱ्यामुळे ते सहज शक्यही होते. या फोटोत रस्त्यावर फिरत पाव विकणारा एकजण त्याची सायकल तशीच ठेवून (बहुदा) कुणाला तरी पाव देण्यासाठी गेला आहे. असे फोटो काढताना आपल्याकडे समय-सूचकता मात्र हवी. असाही विषय फोटो काढण्यासारखा असू शकतो हे लक्षात येण्यास अर्थातच काही वेळ जावा लागतो. आजूबाजूला थोडे वेगळ्या (म्हणजे कॅमेऱ्याच्या) नजरेने पहायला शिकल्यास आपल्याला खूप छान फोटो काढता येतात. अशा प्रकारच्या फोटोग्राफीला Street Photography असे म्हणतात.

मुखपृष्ठ चित्रकार

नाव : ऋजुता घाटे
जन्म : १५ डिसेंबर १९७०
शैक्षणिक पात्रता : कमर्शिअल आर्ट पदवी, सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टस् मुंबई

चित्रकार ऋजुता घाटे यांना लहानपणापासूनच चित्र काढण्याची आवड होती. पुढे चित्रकलेचे रितसर शिक्षण घेतल्यामुळे त्यांची ही आवड त्यांना अधिक नेमकेपणाने जोपासता आली. महाविद्यालयीन शिक्षण घेता घेताच पुस्तकातली चित्रं काढणं, मुखपृष्ठासाठी चित्रं काढणं, डिझाईन करणं त्या करत होत्या. त्यामुळे घेत असलेल्या शिक्षणाचे लगेचच उपयोजन करण्याची संधी त्यांना मिळत होती. शिक्षण घेतल्यानंतर झी टेलिफिल्मस्, सिल्व्हर लाईन टेक्नालॉजी इत्यादी ठिकाणी काम करताना ॲनिमेशनचे तंत्र जाणून घ्यायची त्यांना संधी मिळाली. 'हनुमान' या भारतातील पहिल्या पूर्ण लांबीच्या ॲनिमेशन फिल्मच्या टिमसोबत त्यांनी काम केलं आहे. गेल्या दहा-बारा वर्षांपासून फ्रिलान्स चित्रकार म्हणून त्या कार्यरत आहेत. अनेक प्रकाशन संस्था, एन. जी. ओ संस्थांसाठी ; मुख्यत्वेकरून लहान मुलांच्या पुस्तकांसाठी चित्रांकण करण्याचे त्यांचे काम अविरत चालू आहे.

– ऋजुता घाटे, २०/५७८ नेहा सहकारी गृहरचना नेहरूनगर, कुर्ला (पूर्व) मुंबई – २४, rijutaghate@yahoo.com

---

। वाचा - 'आय डेअर '(इंग्रजी) - किरण बेदी; अनु. आशा कर्दळे, मेहता प्रकाशन
(खंबीर नेतृत्व करणाऱ्या किरण बेदी यांचे आत्मचरित्र)।

निर्मिती : राष्ट्रीय रेडियो खगोल भौतिकी केंद्र

NCRA • TIFR

येत्या ६ जूनला एक वेगळ्या प्रकारचं सूर्यग्रहण होणार आहे -- शुक्र हा ग्रह आपण आणि सूर्याच्या मधून जाणार आहे. खगोल वैज्ञानिक याला 'शुक्राचं अधिक्रमण' असं म्हणतात.

शुक्राचा पिटुकला ठिपका सूर्यासमोरून सावकाश, म्हणजे आठ-एक तासांमधे, सरकताना बघण्यासाठी पुष्कळ लोक या दिवशी लवकर पण उठणार आहेत.



आजच काय, गेली सुमारे अडीचशे वर्षं अनेक पुढारलेले देश त्यांच्या सर्वोत्तम खगोल वैज्ञानिकांना केवळ ही घटना पाहण्यासाठी जगभर पाठवत आले आहेत.

अंतराळातली ही घटना त्यांना एवढी महत्वाची का बरं वाटली असेल? सूर्यबिंबाहून तीस पट लहान आकाराचा एक फालतू काळा ठिपका पाहण्यासाठी येवढा आटापिटा कशासाठी?

आपली ही गोष्ट बऱ्याच पूर्वी, म्हणजे १६३१ साली, सुरू होते. ग्रहांच्या सूर्याभोवतीच्या प्रवासाचं गणित ज्यानं मांडलं त्याच योहानेस केप्लरनं शुक्र हा ग्रह पृथ्वी आणि सूर्याच्या मधून ६ डिसेंबर १६३१ या दिवशी जाईल असं भाकीत वर्तवलं. शुक्राचं हे अधिक्रमण रात्री झाल्यामुळे युरोपमधून दिसू शकलं नाही.



लवकरच जेरेमिया हॉरॉक्स या सतरा-अठरा वर्षांच्या हुशार वैज्ञानिकानं असं दाखवून दिलं की शुक्राची अधिक्रमणं आठ वर्षांच्या अंतरानं येणाऱ्या जोड्यांमधे होतात.

आणि यापुढचं अधिक्रमण २४ नोव्हेंबर १६३९ रोजी होईल. हे अधिक्रमण त्यानं एक मित्राबरोबर पाहिलं सुद्धा. आणि या अधिक्रमणाच्या मोजमापांवरून पृथ्वी आणि सूर्यादरम्यानचं अंतर ९६ दशलक्ष किलोमीटर असेल असा चुकीचा अंदाजही वर्तवला. याबद्दल आणखी नंतर बोलू या. हॉरॉक्स हा केप्लर आणि न्यूटन यांच्या मधला महत्त्वाचा दुवा होता. दुर्दैवानं तो वयाच्या बाविसाव्या वर्षीच मरण पावला.

शुभ आणिक कल्याण करोनी, तन-धन वैभव देई मला ।
शत्रुबुद्धिचा नाश करी तू, वंदन दीपज्योति तुला।। (मराठी) ।।



ग्रह	ग्रह आणि सूर्य यांमधील अंतर AU
बुध	०.४
शुक्र	०.७
पृथ्वी	१.०
मंगळ	१.५
गुरू	५.२
शनी	९.५

। वाचा - 'माझंही एक स्वप्न होतं' (इंग्रजी) - वर्गीस कुरियन; अनु. सुजाता देशमुख, राजहंस प्रकाशन ('अमूल'चे निर्माते वर्गीस कुरियन यांचे आत्मचरित्र)।



पृथ्वी आणि सूर्यामधलं अंतर मोजण्यामागची हॅलीची कल्पना साधी–सोपी–सरळ होती. ती समजून घेण्यासाठी आपण आगगाडीतून प्रवास करत आहोत असं समजू या. जशी गाडी पुढे जाते तशी जवळपासची एखादी गोष्ट –– झाड, घर –– लांबवरच्या डोंगराच्या वेगवेगळ्या भागांच्या थेट समोर आपल्याला दिसते. त्याच प्रमाणे शुक्राचं अधिक्रमण जर पृथ्वीवरच्या दोन वेगळ्या ठिकाणांवरून एकाच वेळी पाहिलं तर शुक्र सूर्यासमोर दोन वेगवेगळ्या ठिकाणी दिसेल.

अनेक वैज्ञानिकांनी एकाच वेळी वेगवेगळ्या ठिकाणांवरून शुक्राची सूर्यबिंबावरची जागा जर नोंदवली, तर त्रिकोणमिती वापरून शुक्र–पृथ्वी यांच्यातलं, आणि त्यावरून सूर्य–पृथ्वी यांच्यातलं, अंतर मोजणं शक्य होईल, अशी हॅलीची कल्पना होती.



आपण हे ही मोजू शकतो!!

$$\theta = \frac{\text{पृथ्वीवरचं E1 आणि E2 मधलं अंतर}}{\text{पृथ्वी–शुक्र अंतर}}$$

आपण हे मोजतो!!

E1 आणि E2 इथून एकाच वेळी बघितलं तर शुक्र सूर्यबिंबावर ज्या दोन ठिकाणी दिसतो, त्यांमधलं अंतर (पण कोन (θ) म्हणून मोजलेलं)



आकडेमोड करून आपण हे ताडू शकतो.

$$\text{पृथ्वी–सूर्य अंतर} = \underbrace{\frac{\text{(पृथ्वी–सूर्य अंतर)}}{\text{(पृथ्वी–शुक्र अंतर)}}}_{३.४} \times \text{पृथ्वी/शुक्र}$$

कल्पना जरी बरोबर आणि साधी–सोपी असली, तरी पृथ्वीच्या वेगवेगळ्या भागांमधून नेमक्या एकाच वेळी हे करणं ३०० वर्षांपूर्वी जवळपास अशक्य होतं. म्हणून त्यानं आणखी एक अशी शक्कल लढवली, ज्यामुळे सगळीकडून एकाच वेळी शुक्राचं मोजमाप घ्यायची गरज उरली नाही. अर्थात ही युक्ती चालण्यासाठी प्रत्येक मोजमाप काही सेकंदांच्या –– खरं म्हणजे एखाद्याच सेकंदाच्या –– नेमकेपणानं होणं अपेक्षित होतं. शुक्राचं अधिक्रमण मोजणं त्या काळात इतकं किचकट होतं, ते यामुळेच!



समुद्रवसने देवि ! पर्वतस्तनमंडले।
विष्णुपत्नि ! नमस्तुभ्यं, पादस्पर्शं क्षमस्व मे ॥ (संस्कृत)

। वाचा - 'डेझर्टर' (इंग्रजी) - गंथर बान्हमान, अनु. विजय देवधर, चंद्रकला प्रकाशन (वाळवंटातून केलेल्या पलायनाचा चित्तथरारक प्रवास)।

हा पाँडिचेरीला परत आला; आपली दुर्बीण आणि घड्याळ घेऊन अधिक्रमणासाठी तयार होऊन बसला.

बेट्याचं नशीब असं खत्रुड, की अधिक्रमणाच्या ऐन विवशी ढग भरून आले.



आयुष्याची ११ वर्षं अशी वाया गेल्यावर तो फ्रान्सला परत गेला.

तिथे त्याला असा शोध लागला, की मधल्या काळात कायद्यानं त्याला मृत घोषित केलं गेलं होतं, त्याच्या बायकोनं दुसऱ्याशी लग्न केलं होतं, आणि त्याच्या नातेवाईकांनी त्याची सगळी मालमत्ता हडप केली होती! खगोलज्ञ असणं हे त्या काळात कधी कधी फार मनस्तापाचं ठरत असे.



इतर खगोलज्ञांचं नशीब जरा बरं होतं. १७६१ आणि १७६९ मधली सर्व मोजमापं एकत्र करून पृथ्वी–सूर्य अंतर अंदाजे १५३ अधिक/उणे १ दशलक्ष किलोमीटर आहे असं ठरवण्यात आलं. ताशी १००० किलोमीटर वेगानं जाणाऱ्या वेगवान विमानाला हे अंतर कापायला सुमारे १७ वर्षं लागतील, इतकं हे अंतर प्रचंड आहे. यापूर्वीच्या अंदाजांपेक्षा हा अंदाज पुष्कळच बरा होता, पण तरीही पुरेसा नेमका नव्हता. १ दशलक्ष किलोमीटरची ही तफावत मोठी होती, आणि तिचं कारणही तितकंच चमत्कारिक होतं. शुक्राचा सूर्यबिंबाला स्पर्श कधी होतो त्याची नेमकी वेळ नोंदवणं गरजेचं असतं.



खगोलज्ञांना असं लक्षात आलं, की ही दोन वर्तुळं -- एक काळं, दुसरं झगझगीत -- जेव्हा एकमेकांच्या खूप जवळ येतात पण पूर्ण टेकलेली नसतात तेव्हाच ती टेकल्यासारखी आणि मिसळल्यासारखी दिसू लागतात, आणि हे दृश्य जायला सुमारे १ मिनिट लागतं. म्हणजेच, शुक्र–सूर्य यांच्या स्पर्शाची वेळ या एक मिनिटापेक्षा जास्त नेमकेपणानं मोजणं शक्य नाही.



हे तर फारच निराश करणारं होतं. या "काळ्या थेंबा"ची बरीच स्पष्टीकरणं दिली गेली; शेवटी समाधानकारक स्पष्टीकरण अगदी अलीकडे म्हणजे २००५ मध्ये मिळालं. या स्पष्टीकरणाप्रमाणे या "काळ्या थेंबा"चा संबंध दुर्बिणीचा धूसरपणा आणि सूर्याची कड त्याच्या मध्यभागापेक्षा कमी झगझगीत असण्याशी आहे.

सागरांबरी, पर्वतस्तनी विष्णुपत्नि महि देवि तुला।
वंदन करितो, क्षमा करी परि लागतील मम पाय तुला।। (मराठी)

खगोलज्ञांची पुढची पिढी १८७४च्या अधिक्रमणाची मोठ्या आतुरतेनं वाट बघत होती. आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक सहकार्याची ही बहुधा पहिली–वहिलीच उदाहरणं असावीत.

हे अधिक्रमण भारतातून दिसणार होतं. अनेक युरोपीय खगोलज्ञ या वेळी मोजमापं करण्यासाठी भारतात आले. उदाहरणार्थ, पिएत्रो ताचीनी हा इटालियन खगोलज्ञ बंगालमधे मुद्दापूर इथे आला होता, जेम्स फ्रान्सिस टेनंट रुरकीला, नॉर्मन पॉगसन मद्रास वेधशाळेतून, इत्यादी.

विशेष म्हणजे भारतीय खगोलज्ञही स्वतंत्रपणानं अधिक्रमणाची मोजमापं करत होते – –रघुनाथचारी यांनी तर सर्वसामान्य लोकांच्या माहितीसाठी पत्रकही काढलं, आणि त्याचं अनेक भाषांमधे भाषांतरही करून घेतलं.

रघुनाथचारी यांनी काढलेल्या पत्रकाची उर्दू प्रत

मुद्दापूर वेधशाळा

१८७४ आणि १८८२ या दोन अधिक्रमणांवरून पृथ्वी–सूर्य अंतराचा अंदाज १४९.५९ अधिक/उणे ०.३१ दशलक्ष किलोमीटर इतका नेमका झाला. गेल्या ५० वर्षांत तंत्रज्ञान पुष्कळ पुढे गेलं आहे, आणि शुक्राचं अधिक्रमण मोजण्याची गरज आता उरलेली नाही. रेडियो लहरींना शुक्रावर आपटून परत यायला लागणाऱ्या वेळावरून शुक्र–पृथ्वी अंतर थेट मोजता येतं,आणि त्यावरून सूर्य–पृथ्वी हे अंतर १४९.५९७८७०७०० दशलक्ष किलोमीटर अधिक/उणे ३ मीटर इतक्या नेमकेपणानं आता ठाऊक झालं आहे.



१९६१ सालापासून अमेरिका आणि रशिया यांनी अनेक अवकाशयानंही शुक्रावर पाठवली आहेत. यांतली काही शुक्राभोवतीच फिरत राहिली, तर काही शुक्रावर उतरवलीही गेली.

अलीकडे युरोप आणि जपान यांनीही यानं पाठवली आहेत. शुक्राचं वातावरण आणि हवामान, तिथली जमीन, इत्यादी बऱ्याच गोष्टींबद्दल आपल्याला आता पुष्कळच माहिती आहे.

AU या एककाच्या ऐतिहासिक अंदाजांचा तक्ता (पृथ्वीची त्रिज्या या एककात)

३०० ख्रिस्तपूर्व	१००००
२०० ख्रिस्तपूर्व	४९०
१८० ख्रिस्तपूर्व	१२१०
१६३५	१४०००
१६३९	१५०००
१६५९	२४०००
१६७२	२१७००
१७७१	२४०००
१८९५	२३४४०
१९०९	२३४२०
१९४१	२३४६६
आधुनिक	२३४५५

सर्वत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु न कश्चित् दुःखमाप्नुयात् ।। (संस्कृत)

बाबिलोनिअन लोक त्याला ईश्तार म्हणत,
सुमेरिअन इनाना, प्राचीन इजिप्तमधे उवेती
आणि तिऊमुतिरी, ग्रीक आफ्रोडायटी,
रोमन लोक व्हीनस, माया लोक नोह एक,
प्राचीन पर्शिअन लोक अनहिता,
ऑस्ट्रेलियामधले आदिवासी बार्नुम्बीर म्हणत,
आणि अर्थातच आपण भारतीय शुक्र म्हणतो.

जगभरच्या बहुतेक सर्व संस्कृतींमधे शुक्राला सौंदर्याचं प्रतीकही मानलं गेलं आहे. शुक्राची चांदणी दिसायला किती सुरेख आणि देखणी असते, हे प्रत्येकानंच कधी ना कधी अनुभवलेलं असतं. शुक्र या ग्रहाचा आकार जवळजवळ पृथ्वी एवढाच आहे. पण प्रत्यक्षात शुक्रावरचं वातावरण अतिशय विषारी आणि घातक आहे. तिथे सल्फ्युरिक अम्लाचा पाऊस पडतो, तपमान ४६० सेल्सिअस असतं, बरेच आग ओकणारे ज्वालामुखी आहेत, ३०० किलोमीटर ताशी वेगानं वारे वाहतात, आणि कायम विजांचं थैमान चालू असतं. आपण तिथे जाऊन राहू शकू अशी परिस्थिती तिथे अजिबात नाही.



गेल्या काही वर्षांमधे जवळपासच्या ताऱ्यांच्या आसपास वेगवेगळ्या किचकट प्रयोग आणि निरीक्षणांमधून सुमारे ७६३ ग्रहांचा शोध लागला आहे. यापैकी २३० हून जास्त शोध त्यांची अधिक्रमणं बघून लागलेले आहेत. ग्रहाच्या अधिक्रमणामुळे ताऱ्याचा प्रकाश किंचित -- म्हणजे अगदी एखाद्या टक्क्यानं -- मंद होतो. अशी अधिक्रमणं शोधण्यासाठी ताऱ्याच्या प्रकाशाची फार नेमकी मोजमापं करावी लागतात.

येत्या शुक्राच्या अधिक्रमणाच्या निरीक्षणातून प्रकाशाची अशी मोजमापं करायच्या सुधारित किंवा नवीन पद्धती शोधायचा खगोलज्ञांचा बेत आहे. उदाहरणार्थ, निव्वळ सूर्यप्रकाशाच्या मोजमापांवरून शुक्राचं अधिक्रमण सांगता येतं का, हे ते बघतील. त्यांना आपल्या शुक्राचा अशा पद्धतीनं पुन्हा एकदा शोध लागेल, अशी आपण आशा करू या!



ही शंभर-एक वर्षांमधून दोनदाच होणारी घटना चुकवू नका ...
या पुढचं शुक्राचं अधिक्रमण आजपासून १०५ वर्षांनी होणार आहे!

प्राणिमात्र ह्या जगती व्हावा, सर्वसुखी अन् निरोगिही।
शुभ व्हावे सर्वांचे देवा, दुःख नसावे कुणासही ।। (मराठी)



शुक्राचं अधिक्रमण
६ जून २०१२ ला होणार आहे.
या दिवशी भारतात सूर्य उगवेल
तोपर्यंत शुक्राची मिरवणूक निम्म
सूर्यबिंब पार करून गेलेलीही असेल.
तरीही आपल्याला अधिक्रमण बघायला
जवळपास ४ तास मिळतील. सकाळी ७
वाजून २ मिनिट हा अधिक्रमणाचा
मध्यबिंदू असेल.

शुक्र
सूर्याच्या कडेला
आतल्या बाजून १०:०५ ला
स्पर्श करेल, आणि १०:२२ ला तो सूर्यबिंबाच्या पूर्ण बाहेर पडलेला असेल.

अधिक्रमण बघण्यासाठी आपण सूर्योदयाच्या वेळी पूर्वेला स्वच्छ आभाळ मिळेल अशा ठिकाणी जाऊ या.



या दिवशी सूर्योदयाची वेळ -- उदाहरणादाखल -- आसाममधे गुवाहाटीला ४:३०, महाराष्ट्रात नागपूरला ५:३०, आणि गुजराथमधे बडोद्याला ५:५२ असेल.

सूर्याकडे थेट कधीच बघू नये, कुठल्याही प्रकारच्या आरशातून किंवा भिंगातूनही बघू नये, कारण तसं करण्यामुळे डोळ्यांच्या आतल्या पटलाला कायमस्वरूपी इजा होते.एवढंच काय, दृष्टी पूर्णपणे कायमची जाऊही शकते.

अधिक्रमण कसं बघावं याचं मार्गदर्शन जवळपासचं खगोलविज्ञान मंडळ/क्लब, कॉलेज, किंवा तारांगण/प्लानेटेरियम अशा ठिकाणी मिळू शकेल. हे अधिक्रमण सुरक्षित पद्धतीनं बघण्याचा कार्यक्रमही ते आयोजित करू शकतील.

अधिक्रमण सुरक्षितपणे बघायच्या पद्धती



१. सूर्याकडे ज्यातून बघणं सुरक्षित असतं असे खात्रीचे सौर चष्मे तारांगण/प्लानेटेरियम कडून मिळवा.



२. छोटी दुर्बीण वापरून सूर्याची प्रतिमा कागदावर/भिंतीवर आणा. दुर्बिणीतून सूर्याकडे थेट कधीही आणि कुठल्याही कारणास्तव बघू नये.



३. बॉल-आरसा वापरून अंधाऱ्या खोलीत सूर्याची प्रतिमा तयार करा. हे करण्याची एक पद्धत अशी :

१५-३० सेंटीमीटर व्यासाचा प्लास्टिकचा बॉल थोडासा कापून त्यावर सुमारे १ इंचाचं भोक पाडा. या भोकावर एक सपाट आरशाचा तुकडा सेलोटेपनं चिकटवा. कुठल्याही टेकूच्या उदाहरणार्थ, स्वैपाकाचं भांडं -- आधारानं हा बॉल-आरसा उन्हात स्थिर राहील असा ठेवा, आणि योग्य दिशेला फिरवून उन्हाचा कवडसा अंधाऱ्या खोलीत पाडा. सूर्यबिंबाची प्रतिमा स्पष्ट होण्यासाठी आरशासमोर काही मिलिमीटर आकाराचं भोक पाडलेला अपारदर्शक कागद धरा -- याला पिन-होल कॅमेरा म्हणतात; याच पिन-होल परिणामामुळे झाडांच्या पानांमधून पडणाऱ्या कवडशातही कदाचित शुक्राचा ठिपका दिसू शकेल.

अधिक माहितीसाठी : nirujmohanr@gmail.com

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी
राष्ट्रीय सौर ११ ज्येष्ठ, शके १९३४, १ जून २०१२ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे-२
येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे - ३० येथून प्रसिद्ध केले.

स्वदेश विदेश (बंगाली रचना)

स्वदेश विदेश उछलि उठिछे तोमार नवीन तंत्र
आकाश बाताश ध्वनिया तुलिछे तोमार मोहन मंत्र ।।ध्रु. ।।

नंदित-धरा-मंदिर माझे धर्मेर स्त्रक्-गंध
मोदेर विवेकानंद तुमि गो, विश्व विवेकानंद ।।१ ।।

अरुणकिरण उछलि उठिलो उदिले जे दिन वंगे
स्वरग करिलो सुरभि वृष्टि, वर्षि आशीश संगे
प्रेमेर पुण्य-प्रवाहे साजिलो गौर नित्यानंद
मोदेर विवेकानंद तुमि गो, विश्व विवेकानंद ।।२ ।।

द्युलोकेर छबि हेरिले पुलके गुरुर चरणतले
आर्तेर सेवा मर्त्ये आनिले भासिया नयन जले
विश्वप्रेमेर विकसित खनि चित्ते हरषानंद
मोदेर विवेकानंद तुमि गो, विश्व विवेकानंद ।।३ ।।

''भूधरे सागरे गहने कानने जापिले कतो ना निशि,
तुषार हिमानि गिरिकंदर भ्रमिले कतो ना दिशि,
अंकुर पुन: शंकर ज्ञान शाक्येर त्यागानंद,
मोदेर विवेकानंद तुमि गो, विश्व विवेकानंद ।।४।।

ज्ञानेर गरिमा गौरव गान भारत - मर्मवाणी,
पाश्चात्य शेखा वेदान्तगाथा शुनि विस्मय मानि
स्निग्ध भावेर शक्ति माधुरि मुग्ध नूतन छंद
मोदेर विवेकानंद तुमि गो, विश्व विवेकानंद ।।५ ।।

शिकागो संघे संगीत तव शीर्ष उठिलो भासि
शुनिलो विश्व शुनिलो नि:स्व शुनिलो प्रासादवासी
सृजिले 'श्रीमठ' कुंजकुटिर तीर्थ मुखरानंद
मोदेर विवेकानंद तुमि गो, विश्व विवेकानंद ।।६ ।।

स्वामी विवेकानंद
शतकोत्तर सुवर्णजयंतीनिमित्त
त्यांच्या विचारांवर आधारित
गीतमाला - ६

(स्वामी विवेकानंदांचे गुरूबंधू स्वामी अभेदानंद यांच्या
या बंगाली गीताचा स्वैर अनुवाद पान क्र. ४८ वर पाहा.)

स्वामी विवेकानंदांचे विचार आचरणात आणूया!... ६

कुणाचाही द्वेष करू नका. हे जग चांगल्या वाईटाचे मिश्रण आहे.
दुर्बल आणि वाईट मार्गाला लागलेल्यांनाही प्रेम करून बदलण्याचा प्रयत्न करा.

- चेष्टेतही मी कुणाची टिंगल टवाळी करणार नाही.
- कुणाबद्दल काही मत बनवण्याच्या आधी मी अंत:र्मुख होऊन विचार करीन.
- अभ्यासात मागे असणाऱ्या किंवा दुर्लक्ष करणाऱ्या वर्गमित्राला, चांगला अभ्यास करण्यासाठी मी प्रवृत्त करीन.

सौर ज्येष्ठ, शके १९३४/ जून २०१२, पंजीकृत नियतकालिक (Registered Newspaper)
पंजीकरण क्रमांक (RNI NO.) MAHMAR/2000/5636 **घोषणापत्र क्रमांक :** (PHM/SR/201/VIII/2001)
L-2 / RNP / PNW/M / 94 / 2012 - 2014, **Posted at S.P. Post Office On 1st of Every Month.**

क्लिक करण्यापूर्वी !

(पान क्र. ४८)

सौर दिनदर्शिका शके १९३४

जून २०१२		ज्येष्ठ / आषाढ
शु.	1	११
श.	2	१२
र.	3	१३
सो.	4	१४
मं.	5	१५
बु.	6	१६
गु.	7	१७
शु.	8	१८
श.	9	१९
र.	10	२०
सो.	11	२१
मं.	12	२२
बु.	13	२३
गु.	14	२४
शु.	15	२५
श.	16	२६
र.	17	२७
सो.	18	२८
मं.	19	२९
बु.	20	३०
गु.	21	३१
शु.	22	आ. १
श.	23	२
र.	24	३
सो.	25	४
मं.	26	५
बु.	27	६
गु.	28	७
शु.	29	८
श.	30	९

पत्त्यामध्ये वर्गणीचा कालावधी 12-9/June 12 असल्यास तुमची वर्गणी संपली आहे, ती त्वरीत भरावी. पत्त्यामध्ये चुका असल्यास तातडीने कळवा.

संपर्क पत्ता :
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०)२४२०७ १७४/१७९

या अंकाची किंमत : ₹ २०/-
वार्षिक वर्गणी : ₹ १८०/-
प्रकाशन दिनांक :
सौर ११ ज्येष्ठ, शके १९३४
१ जून २०१२

www.chhatraprabodhan.org
chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

प्रिय पोस्टमन,

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना !

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (⟶) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा-संपादक, छात्र प्रबोधन.

प्रति -